# महाभारत

## खंड १९ : अज्ञातवासपर्व २

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड एकोणीसावा

## अज्ञातवास पर्व भाग दुसरा

## उद्योग पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

## ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० ऑगस्ट २०१९**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा एकोणीसावा खंड आपण आता वाचणार आहात, त्यात सैन्योद्योग पर्व, संजय ज्ञान पर्व आणि प्रजागर पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात,

वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी

डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# अज्ञातवास पर्व दुसरा भाग

# उद्योग पर्व

# सैन्योद्योग पर्व सुरू

## भाग पहिला

ओम, नारायणाला लवून नमन करून नर जो श्रेष्ठ पुरूष आहे, त्याचप्रमणे माता सरस्वतीचे स्मरण करून जय असा घोष करून वैशंपायन ऋषी पुढील भाग जनमेजयाला सांगू लागतात.

वैशंपायन सांगतात, ते शूरयोद्धे आता उत्तरा-अभिमन्यू विवाहामुळें विराटाच्या घरचे व्याही झाल्यानें मोठ्या आनंदाने ती रात्र घालवतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ते विराटाच्या राजसभेत येतात. जे वैभव श्रीमंतीने प्रसन्न दिसत हेतो. रत्नानी सजवलेल्या आसनांवर ते बसतात, जी आसनं व्यवस्थितपणे रांगेत ठेवलेली होती. सुगंधी फुलांच्या माळा त्यांनी घातलेल्या होत्या. त्या सभेत मोठे शक्तीशाली राजे उपस्थित असतात. त्यातील राजा विराट आणि राजा द्रुपद समोरासमोरच्या आसनांवर बसतात. वयोवृद्ध व सर्वमान्य असे नृप बलराम आणि कृष्ण त्यांच्या पित्यासह तेथे उपस्थित होते. द्रुपदाच्या जवळ बसले होते सिनी वंशाचे महान राजा त्याच्या पुत्रांसह बसलेले होते. राजा विराटाच्या बाजूला कृष्ण आणि युधिष्ठीर बसले होते. द्रुपदाचे सगळे पुत्र, भिम व अर्जुन, माद्रीचे दोन पुत्र, प्रद्युम्न, संब असें योद्धे तेथे उपस्थित होते. त्याशिवाय अभिमन्यू त्याच्या साळयाबरोबर म्हणजे भूमिंजयासह बसलेला होता. द्रौपदीची मुलं त्यांच्या पित्या इतकेच शूर असलेले तेथे सोन्याने मढवलेल्या आसनांवर बसलेले होते. ते सभागृह असें वाटत होते जणू काय आकाशातील तारे येऊन बसले आहेत. त्यांच्या निरनिराळया मुद्द्यावर चर्चा होत होत्या. ते सगळे राजे अधून मधून कृष्णाची काय प्रतिक्रीया आहे ते अजमावत होते. त्या चर्चेच्या अखेरीस पांडवांचा प्रश्न उपस्थित होतो.

त्यावेळी कृष्ण त्याचे भाषण मुद्द्याला धरून करतो. कृष्ण बोलतो, "आपण सगळे जाणता आहात कीं, युधिष्ठीराला द्युतात सुवलाच्या मुलांच्या मदतीने फसवून त्याचे राज्य कौरवांनी गिळंकृत केले आहे. त्यानंतर पांडवांना वनवास व अज्ञातवास भोगावा लागला आहे. त्या सगळया अडचणीच्या काळात त्यांनी आपली एकी कायम ठेवून त्या परिस्थितीला यशस्वीरित्या तोंड दिले ते आपण सगळे जाणता आहात. अतिशय कठीण परिस्थितीतून ते गेले व शेवटचे वर्ष तर फारच बिकट होते. त्यातून ते यशस्वीरित्या बाहेर पडलेले आहेत. आता आपल्या सगळयांना टरवावयाचे आहे, दुर्योधन व युधिष्ठार ह्यांच्यातील समझौता कसा साध्य करावयाचा. चांगुलपणा आणि नैतिक अधिकार ह्याची सांगड घालून त्यांच्यातील दुरावा कसा नष्ट करावा हा आपल्या सगळया राजांच्यापुढे विषय आहे. सत्त्वगुणी युधिष्ठीराला अयोग्य मार्गाने कांहींही साध्य करावयाचे नाही. न्यायाने जे त्यांच्या हक्काचे आहे ते त्यांना मिळाले पाहिजे. कांही नाही तरी एक गांव मिळाले तरी चालेल असें तो पांडव बोलत आहे. कौरवांनी पांडवांची वारसा हक्काची मालमत्तासुद्धा लुबाडली आहे. त्यांना हालअपेष्टा सहन करावयाला लागल्या आहेत केवळ कारण ते नैतिकतेच्या मार्गानेच जाण्याचा निर्धार करून आहेत. धृतराष्टाराचे मुलगे पांडवांना सरळ लढाईत तोंड देण्यास तयार नाहीत. म्हणून हे सगळे होत आहे. पांडव मात्र त्यांच्या बाहूबळाने त्यांची मिळकत वाढवू शकतात. हा त्या दोन चुलत भावंडात फरक आहे. आपण सगळे चांगलेच हे सगळे जाणता आहात. कौरव त्यांच्या लहानपणापासून पंडुच्या मुलांचा द्वेष करत आहेत हे सगळयांना माहीत आहे. भिमाला मारण्यासाठी किती योजना दुर्योधनाने आखल्या त्याची माहीती सगळया राजांना माहीत आहे. कपट कारस्थान करण्याशिवाय कौरव दुसरे कांहीं करत नव्हते. तुम्ही सगळे राजे सूज्ञ आहात म्हणून मी तुम्हाला विनंती करतो कीं, तुम्ही एकटे व एकत्र असें विचार करून ठरवा कीं, पांडवांनी त्यांची मिळकत मिळवण्यासाठी काय केले पाहिजे. पांडवांचा सत्त्वशिल मार्गावर गाढ विश्वास आहे. जे त्यांनी द्युतात हरल्यावर कबूल केले त्याप्रमाणें

त्यांनी सगळे केले आहे तेव्हां आता कौरवांची पाळी आहे कीं, त्यानी त्यांची सत्त्वशिलता दाखवावी. जर कौरव त्याप्रमाणे वागले नाहीत तर त्यांचा विनाश करण्या शिवाय पांडवांना दुसरा पर्याय उरणार नाही. त्याची जबाबदारी संपूर्णपणे धृतराष्ट्रावर असेल. आपण समजत असाल कीं, ते संख्येने फार कमी आहेत व कौरवांची संख्या अधिक आहे तर असें समजण्याचे कारण नाही कारण आजपर्यंत जे सत्त्वशिल कार्य पांडवांनी केल आहे त्यामुळें त्याच्या बाजूने बरेच सत्यावर विश्वास असलेले राजे लढण्यासाठी तयार होतील असें एकंदर चित्र आहे. त्याशिवाय पांडवाचे युद्ध सामर्थ्य मोठे आहे. त्यांच्या कडे असलेली विविध अस्त्रे व शस्त्रे ज्याचा अनुभव आपण विराटाच्या जनावरांना वाचवण्यासाठी जे अर्जुनाने पराक्रम दाखवले ते पाहून स्पष्ट होते. तो एकटा सगळया कौरवांच्या सैन्याला ज्यात भिष्म, द्रोण, कृप आणि कर्ण होते त्या सगळयांना भारी गेला आहे. त्याशिवाय सगळे कौरव सैन्य हतबल झाले होते. त्यामुळें पांडव कौरवांना सहजपणे पराजित करू शकतील, त्यानंतर कौरवांचे राज्य सुद्धा ते ताब्यात घेतील हे सगळे कौरवांना जर समजत नसेल तर त्यात त्यांच्या अदूरदृष्टीचा प्रभाव आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. परिस्थिती त्या थराला जाऊ नये अशी युधिष्ठीराचा फार इच्छा आहे. म्हणून आपण येथे जमलो आहोत कीं, काय करावे म्हणजे मोठा नरसंहार टाळता येईल. त्या कामासाठी कोणी प्रतिष्ठीत सर्वमान्य राजा जर कौरवांना चांगल्या प्रकारे समजावून सांगत असेल किं, त्यांनी पांडवांचे गिळंकृत केलेले राज्य त्यांना प्रतिष्ठीतपणे देऊन टाकावे. तर आपल्यातील कोण त्यासाठी तयार आहे ते ठरवण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. कृष्णाच्या त्या मुद्देसूद भाषणानंतर त्याची ज्येष्ठ बंधू बळराम कांहीं बोलण्यासाठी उठतो.

अशारितीने उद्योग पर्वातील सैन्योद्योग पर्व भाग पहिला संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग दुसरा

बळराम बोलण्यास उठतो. "आपण सगळयांनी गदाच्या ज्येष्ठ भावाचे भाषण ऐकले आहे. शहाणपणा आणि गुणवत्ता ह्याने ते परीपूर्ण होते. त्यांचे भाषण युधिष्ठीर आणि दुर्योधन ह्या दोघांच्या दृष्टीने योग्य वाटत होते. त्याप्रमाणें हे शूरयोद्धे पंडुची मुलं त्यांच्या वारसाहक्कातील अर्धे राज्य सोडावयाला तयार आहेत दुर्योधनासाठी. त्या न्यायाने कौरवांनीसुद्धा त्यांच्या हक्कातील अर्धा भाग पांडवांसाठी सोडावयाला पाहिजे असे अपेक्षित आहे. अशा प्रकारे त्यांच्यातील तेढ मोठ्या आनंदाने संपुष्टात येईल असें अपेक्षित आहे. असे अपेक्षित आहे कीं, ते झाल्यानंतर जर दोघे त्यात समाधान मानून शांत राहिले तर उत्तम परंतु, जर ते तसे नाही झाले तर काय? मला वाटते ते शक्य आहे कीं, नाही ते तपासण्यासाठी कोणीतरी हस्तिनापुरी गेले पाहिजे व दुर्योधन काय समजतो ह्या प्रस्तावाबद्दल ते आपण जाणून घेतले पाहिजे. तेथे जाऊन त्या प्रतिनिधीने पांडवांची बाजू धृतराष्ट्रापुढे मांडली पाहिजे. तो इसम असा असेल कीं, जो तेथे जाऊन भिष्माचार्यांचा आदर करील, द्रोण, कृपाचार्य, कर्ण, विदूर, गांधारचा मुलगा शकूनी आणि सगळया कौरव बंधूंचा समाचार घेईल सन्मानपूर्वकपणे. ते सगळे मोठे बलाढ्य आहेत. ते त्यांचे हित पाहून जो निर्णय घेतील तो आपल्याला समजला पाहिजे. तेथे सगळे सभेत जमल्यावर आपला प्रतिनिधी त्या सगळयांना युधिष्ठीराची बाजू स्पष्टपणे समजावून देईल. आपल्याला माहित आहे कीं, जेव्हां युधिष्ठीर द्युत खेळावयाला बसला होता तो त्याची राजा म्हणून जी नैतिक जबाबदारी असते ती विसरून वाटेल तसे डाव मांडत होता, जे एका चांगल्या राजाला न शोभणारे होते. त्याची त्याच्यावर विसंबून असणाऱ्या कोणाचीही पर्वा न करता कोणालाही पणाला लावत होता ते आपण सगळयांनी पाहिले आहे. त्यावेळी त्याची एक राजा म्हणून जी जबाबदारी असते ती तो पूर्णपणे विसरून एकाद्या मतलबी इसमासारखा

त्याच्या राज्यातील गोष्टी पणात लावत होता. असे करूनही आमचे बंधू त्याला मोठा नैतिक तत्त्व पाळणारा असें कौतुक करत आहेत ह्याचे मला मोठे आश्चर्य वाटते. स्वतःला मोठा नितीतत्त्वनिष्ठ समजणारा, ब्राह्मणांच्या बरोबर सतत बसण्याचा शोक असलेला हा सगळे घालवून बसला त्याचे का समर्थन होत आहे. प्रथम आपल्याला पाहिले पाहिजे कीं, हा पांडव खरोखरच तत्त्वनिष्ठ आहे कीं, फक्त त्याचे सोंग करत आहे व अंतर्यामी तो कोणी वेगळाच इसम आहे. आपल्याला द्युत खेळता येत नाही असें असतांना तो त्या खेळाचे आव्हान का घेतो? कोणत्या अहंकारापायी तो तसा वागला ते पाहिले पाहिजे. त्याचे बंधू त्याला धरून आहेत त्याचा ह्या माणसांने कोठल्या थरापर्यंत गैर फायदा उठवला ते आपण सगळयांनी पाहिले आहे. तसे पाहिले तर आपण पहातो कीं, त्याने जे घालवले ते त्यांनी मिळवलेले नव्हते. त्याच्यासाठी ते सगळे फुकटचे आलेले होते. ते त्याने बेजबाबदारपणे फुकले आहे. इतर पांडवांवर अन्याय झाला आहे तो कौरवांनी केला कां त्यांच्याच बेजबाबदार भावांने केला ते प्रथम आपल्याला स्पष्ट झाले पाहिजे. असें म्हणण्याचे कारण त्या सभेत आपला प्रतिनिधी युधिष्ठीराच्या वतीने बोलणार आहे. जर युधिष्ठीराचा हा बेजबाबदारपणा असाच रहाणार असेल तर तो पुन्हा कशावरून द्यूताला बसणार नाही व पुन्हा सगळे घालवणार नाही? हे आपल्याला समजले पाहिजे. अन्याय जो झाला आहे तो कौरवांनी इतर पांडवांवर केला आहे कां त्यांच्याच मोठ्या भावांनी केला आहे त्याबद्दल पांडव काय समजतात तेसुद्धा आपल्याला पाहिले पाहिजे. कौरवांनी कांहींही डाव मांडला, तो त्यांच्या दृष्टीने रास्त होता. परंतु, युधिष्ठीराने त्यात अडकणे किती योग्य होते ते स्पष्ट झाले पाहिजे. ह्या चार पांडवांवर अन्याय झाला आहे ते निश्चित पण कोणी केला ते स्पष्ट झाले पाहिजे कारण ते स्पष्ट न करता कांहीं तत्त्वे गृहीत धरूनच आपण कौरवांशी बोलणी करू लागलो तर कदाचित आपण तोंडघशी पडण्याची मला भिती वाटते. मला असें वाटते कीं, द्युत खेळून तो युधिष्ठीर त्यात जिंकून आपल्या भावांना अप्रत्यक्षपणे शह देण्याचा प्रयत्न करत होता परंतु, तो त्यात सपशेल

पडला. जर आपल्याला द्युत खेळता येत नाही तर न खेळण्याने असा कोणता कमीपणा त्याला येणार होता ते ह्या सभेला समजले पाहिजे. त्यांने त्याचे बंधू, दास, सैनिक, धनदौलत एवढेच नाही तर त्याची पत्नी जी त्यांने आणलेली नव्हती पणाला कशी लावली? कोणत्या नैतिक तत्त्वात ते सगळे बसत होते ते युधिष्ठीराने सगळयांना सांगितले पाहिजे. राजा त्याच्या अखत्यारात असलेले त्याची स्वताची मिळकत कसा समजू शकतो कां? जेव्हां ते त्याच्याकडे एक विश्र्वस्थ म्हणून सोपवलेले होते. ते करतांना युधिष्ठीराने कोणते नैतिक मुल्य अजमावली ते सगळयांना समजले पाहिजे. कोणाच्या परवानगीने पणाला लावले ते स्पष्ट झाले पाहिजे. युधिष्ठीराने खरेतर नैतिकतेच्या सगळया मर्यादा ओलांडल्या होत्या ते करतांना, त्याची कबूली त्यांने भर सभेत दिली पाहिजे. चूक ते चूकच असते, त्याची भलामण करण्यात कोणालाही फायदा नसतो. हे सगळे येथेच स्पष्ट होणे अगत्याचे आहे कारण, हे सगळे मुद्दे कौरव मांडणार आहेत तेव्हां आपल्या प्रतिनिधीला त्याची पटतील अशी उत्तर देता आली पाहिजेत. माझ्यामते पूर्व तयारीच्या दृष्टीने येथेच ते सगळे मुद्दे स्पष्ट झाले पाहिजेत. माझ्यामते जे घडले त्या अन्यायाला सर्वस्वी युधिष्ठीर व त्याचा मिथ्या अहंकार कारणीभूत आहे. शकूनीला किंवा दुर्योधनाला आपण दोष देऊ शकणार नाही. प्राप्त परिस्थितीचा फायदा जर ते घेतात तर त्यात त्यांना आपण कसे दोष देऊ शकतो, जेव्हां आपलेच नाणे खोटे आहे तेथे इतरांना तुम्ही कसे अपराधी ठरवणार? उलट कौरवांच्या चातुर्याचे आपण कौतुक केले पाहिजे आणि पांडवांच्या मूर्खपणाची निंदा झाली पाहिजे. पांडवांचा नेता जर युधिष्ठीर असेल तर आपण म्हणून शकतो कीं, त्यांचा नेता कुचकामी आहे. नेता नेहमीच वडीलभाऊ असला पाहिजे असें समजण्याचे कारण नाही. नेता लायक असला पाहिजे. येथे आपण पहातो कीं, पांडवांचा नेता नालायक आहे. म्हणून त्यांना ह्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. तरीसुद्धा जर पांडव त्यालाच ह्यापुढे सुद्धा नेता मानत असतील तर आणखीन किती संकटं त्यांना युधिष्ठीराच्या मूर्खपणामुळें सहन करावी लागणार आहेत ते एक ईश्र्वर जाणे.

जर तसे झाले तर मी म्हणेन कीं, कुंतीची मुलं मूर्ख आहेत व त्यांना जे भोगावे लागत आहे त्या बद्दल इतरांना खंत करण्याचे कांहीं कारण नाही. मला वाईट वाटते ते त्या मांद्रीच्या मुलांचे व द्रौपदीचे कारण ते ह्या तीन कुंतीपुत्रांच्या मूर्खपणात अडकले आहेत. ते कांहीं असले तरी जो समझौता झाला आहे त्याप्रमाणे पांडव यशस्वीरित्या वनवास व अज्ञातवासातून आलेले असल्यामुळे ठरल्याप्रमाणें त्यांचे राज्य त्याना मिळाले पाहिजे हे मात्र निश्चित. त्याकरता मोठ्या खुबीने आपला प्रतिनिधी त्याचे मुद्दे मांडेल व जे झाले त्यावर दोषारोप करण्यात समय फुकट न घावलता सरळ त्यांचे राज्य त्यांना देऊन टाकावे नाहीतर युद्धाला सज्ज व्हावे असा रोख ठेवावा असें मला वाटते. पांडव युद्ध करू इच्छित नाहीत पण वेळ आली तर त्याला ते तयार आहेत व त्यामुळें जो नरसंहार व कुळनाश होणार आहे त्याची जबाबदारी धृतराष्ट्राची असेल असे सांगावे. जमेल तेवढे सामोपचाराने करावे, ह्यासाठी मी आलो आहे असे तो त्या सभेत सांगेल असें मला सुचवावयाचे आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, बलराम अशारितीने त्याचे मुद्दे मांडत असतांना सिनी घराण्याचा पुत्र एकदम उठतो व बलरामाला विरोध करू लागतो.

अशारितीने उद्योग पर्वातील सैन्योद्योग पर्व भाग दुसरा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग तिसरा

सत्यकी ओरडून बोलतो, "माणसाचे जसे मन तसे तो बोलत असतो असे समजतात तेंच खरे आहे. जगात शूर लोक आहेत तसेंच भित्रे सुद्धा असतात. पुरूषांची विभागणी ह्या दोन वर्गात होत असते. एकाद्या मोठ्या झाडाला दोन फांद्या आहेत, एकावर फुल फळं येतात तर दुसऱ्यावर येत नाहीत. त्याच प्रमाणे माणसांच्या घराण्यातसुद्धा शूर आणि भित्रे असे दोघे जन्मू शकतात. मी बलरामाने जे विवेचन केले त्याची धिक्कार करत नाही कारण त्याच मांडलेले मुद्दे चुकीचे नाहीत परंतु, जेव्हां आपण एकत्र रहाण्याचे ठरवले आहे तेव्हां त्यात भेद करणारी कोणतीही गोष्ट मला मंजूर नाही. अरे कृष्णा, युधिष्ठाराचा अशारितीने तिरस्कार करणारे भाषण ह्या सभेत कसे होऊ दिले ते सांगा. तसे ऐकून आपण काय मिळवणार आहोत? द्युतात तरबेज असणाऱ्या सकूनीनी युधिष्ठीराला आव्हान दिले ते त्यांने स्वीकारले ते अयोग्य होते कसे ते स्पष्ट झाले पाहिजे. तो हरणार ते उघड होते. परंतु, जर जिंकला असतां तर ते चांगल्या मार्गाने झाले असे  दाखवता आले असते. पांडवांना त्यांच्याकडे बोलावून त्या दबावाखाली त्याला खेळावयाला लावले ते अयोग्य होते. एका क्षत्रियाला शोभेल असें युधिष्ठीर वागला असें मला वाटते. त्यात त्या लोकांनी कावेबाजपणा केला असें सिद्ध होते. युधिष्ठीर खेळाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करत होता मग तो चुकीचा कसा? त्याशिवाय आता ते सर्व नियमांचे पालन करून आले आहेत तेव्हां त्यांना त्यांचा हक्क न देण्याने कौरव कोणती नैतिकता दाखवत आहेत? इतर पांडवांच्या कमाईला तो पणाला लावतो तेव्हां त्या पांडवांपैकी कोणाही कांहीं आक्षेप घेत नाहीत म्हणजे त्याने कांहीं अयोग्य केले असें कसे म्हणता येईल? द्रौपदीच्या आक्षेपाला महत्व दिले जात नाही

कारण पत्नी पुरूषाची मालमत्ता असते असें समजले जाते. त्यामुळें युधिष्ठीराने जे केले ते कसे चुकीचे ठरते? जर बऱ्या बोलांनी कौरव पांडवांची मालमत्ता त्यांना देतात तर ते योग्य होईल अथवा ते अयोग्य ठरणार आहे आणि त्यासाठी पांडवांनी शस्त्र उगारले तर ते योग्यच ठरणार आहे. भिष्माने व द्रोणांनी मान्य केले आहे कीं, द्युताच्या अटीनुसार पांडवांनी सगळया शर्थी योग्य प्रकारे पूर्ण केल्या आहेत तरी दुर्योधन ते मानत नाही ह्याचा अर्थ काय? अशा लोकांना जर फक्त बाणांची भाषा समजत असेल तर त्या भाषेच आम्ही सगळे कौरवांशी बोलायला तयार आहोत. आम्ही त्यांना जमिनीवर आडवे पाडून पांडवांची माफी मागण्यास भाग पाडू. जर तरी त्यांनी त्यांचा हट्ट सोडला नाही तर त्यांना आम्ही यमाकडे पाठवून देऊ. परंतु, त्यासाठी युधिष्ठीराने तो युद्धाचा निर्णय घ्यावयाला पाहिजे. पांडवांच्या वज्रास्त्रांपुढे ते टिकणार नाहीत. अर्जुनापुढे कोण उभा राहू शकतो? कृष्णाच्या सुदर्शन चक्रापुढे कोण राहू शकतो? कोण भिमापुढे उभा राही शकतो? ज्या कोणाला त्याच्या जीवाची कदर आहे ते कोणीही नकूल व सहदेवांच्या वाटेला जाणार नाहीत हे सगळे जाणतात. त्याशिवाय मित्रांपैकी, दृष्टद्युम्न, अभिमन्यू, गद, प्रद्युम्न, शम्व असें आम्ही सगळे आहोत कौरवांना जाब विचारण्यासाठी. आम्ही धृतराष्ट्राचे सगळे पुत्र मारून टाकू. पांडवांना त्यांचा हक्क मिळवून देऊ. जे आम्हाला मारण्यासाठी येत आहेत त्यांना मारण्यात आम्हाला पाप लागत नाही. परंतु, ह्यापुढे शत्रूपक्षाकडे भिक मागण्याचे विचारसुद्धा पांडवांच्या मनात आले नाही पाहिजेत. मला खात्री आहे सगळे माझ्या मताशी सहमत होतील. आम्ही शकूनीला, कर्णाला त्या युद्धात मारणार आहोत. पांडवांना त्यांचे राज्य मिळेल नाहीतर कौरव धारातीर्थी पडलेले दिसतील".

अशारितीने उद्योग पर्वातील सैन्योद्योग पर्व भाग तिसरा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग चौथा

आता द्रुपद बोलण्यास उठतो. तो सभेला सांगतो, "अहो महा योद्ध्यानो, जसे तुम्ही सगळे समजता हा दुर्योधन पांडवाची त्याला आयती मिळालेली संपत्ती सहसा सोडणार नाही हे प्रथम लक्षात घ्या, तरी एक उपचार म्हणून आपण शिष्टाई करण्याच्या गोष्टी करत आहोत. तसेच आपण लक्षात घेतले पाहिजे कीं आज जो राजा म्हणून कुरु राज्यात बसला आहे तो धृतराष्ट्र त्याच्या लाडक्या मुलाच्या तालावरच चालणार आहे. त्याच प्रमाणे, भिष्म व द्रोण सुद्धा त्याच्या म्हातारबुद्धीने तसेंच करणार आहेत. कर्ण व शकूनी त्यांच्या पापबुद्धीने दुर्योधनाला सल्ला देणार आहेत. बलराम जे बोलला ते मला पटते व त्या प्रमाणे हा मामला सोटवला गेला पाहिजे. तरी तो जे बोलला कीं, कौरवांशी गोड भाषा वापरावी ते मला मान्य नाही कारण, त्यांना ती भाषा समजणार नाही. द्या नाहीतर युद्धाला तयार व्हा अशीच भाषा सुरूवातीपासून असावी असे मला सुचवावयाचे आहे. सज्जनांशी जी भाषा वापरात असते ती दुर्जनांत वापरली तर ते मूर्खपणाचे ठरते त्यासाठी कौरव हे दुर्जन आहेत म्हणून त्यांच्याशी तशीच भाषा शिष्टाई करतानासुद्धा असावी. दुर्जनाशी समजावण्याच्या भाषेत सांगितले तर तो आपल्याला कमजोर समजतो म्हणून त्यांच्याशी दादागिरीचीच भाषा सुरूवातीपासून ठेवावी असे माझे म्हणणे आहे. त्याशिवाय उद्याच्या लढाईची तयारी करण्यास सुरूवात केली पाहिजे. आपल्या दोस्त राज्याना त्याबद्दलचे निरोप पाठवण्यास सुरूवात केला पाहिजे. सल्य, धृष्टकेतु, जयत्सेन, केकय ह्यांना त्याबद्दलचे निरोप गेले पाहिजेत. आपण लक्षात ठेवले पाहिजे कीं, कौरवसुद्धा युद्धाची तयारी करत असणारच. समविचाराचे लोक जो प्रथम बोलावेल त्याला मदत करतात. ते आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणून आपण सगळयांना प्रथम संपर्क केला पाहिजे. माझ्या मते शल्यला आपण प्रथम संपर्क करावा. त्या शिवाय त्याच्या मांडलिक

राजांनासुद्धा संपर्क केला पाहिजे. पूर्व किनारावर असलेला भागदत्त, हारदिक्य, अहूक, मल्य देशाचे राजे जे आपल्याला समजून घेतात, रोचमन, वृहंत, सेनाबिंदू ह्यांना निरोप गेले पाहिजेत. वल्हिक, मुद्‌जकेश, छेडीचा राजा, सुपरश्व, सुवाहू आणि महान योद्धा पौरव हे आपल्या बाजूने असले पाहिजेत. त्याशिवाय पश्चिमेकडील शक राजे, पल्हव, दर्दर, सुररी, नदीज, राजा कर्णवेस्त, नील, वीरधर्म, दुर्जय, दंतवक्र, रुक्मी आणि जनमेजय आपल्या बाजूला असले पाहिजेत. अशद, वायूवेग, राजा पूर्वपाली, भुरीतेज, देवक, एकल्य, त्याचे सगळे पुत्र, क्रौश राजे आपल्याकडे पाहिजेत. क्षेममूर्ती, कंबोज राजा, पश्चिम किनाऱ्यावरील रीचीक टोळया आपल्या बाजूला असल्या पाहिजेत. काशी नरेश, वायव्येस असलेल्या पांच नद्यांचे सगळे राजे आपल्याकडे पाहिजेत. कृथ राजा व त्याचा पुत्र आपल्याला पाहिजे. त्याशिवाय उत्तरेकडील पर्वतराशीत असलेले राजेसुद्धा आपल्या बाजूला असले पाहिजेत. जनक आणि शुशर्मन राजा आपल्या बाजूला येईल कारण आपण त्याला क्षमा केली होती. मनीमन, पोतीमत्स्यक, धृष्टकेतू, पंसूचा राजा, पौंड्र, दंडधर, बृहत्सेन, अपराजित, निशाद, श्रेनीमत, वसुमत, बृहद्बल, वाहू, राजा समुद्रसेन, त्याचा पुत्र, उद्धव, क्षेमक, राजा वतधन, श्रुतायूस, धृधायू, शल्वाचा मुलगा, कलिंग देशाचा राजा, कुमार, हे सगळे लढण्यात अव्वल आहेत म्हणून त्यांना कौरवांच्या आधी आपले निमंत्रण गेले पाहिजे. मला सुचली ती सगळी नांव येथे सांगत आहे. त्यासाठी आपला एक ज्ञानी ब्राह्मण त्या कामासाठी पाठवण्याची व्यवस्था करा. त्याने कशाप्रकारे ह्या राजांना युद्धासाठी सामील होण्यासाठी पडवावयाचे ते चांगले शिकवून ठेवावे.

शिष्टाई करतांना भिष्माशी कसे बोलायचे, द्रोणाशी कसे बोलायचे, आणि दुर्योधनाशी कसे बोलायचे ते चांगले ठरवून घ्यावे.

अशारितीने उद्योग पर्वातील सैन्योद्योग पर्व भाग चौथा संपला.

## सैन्योद्योग पर्व

# भाग पांचवा

त्यानंतर कृष्ण बोलावयाला उठतो, सोमक टोळीच्या ह्या विचारांशी मी सहमत आहे. पंडुंच्या मुलांचे हित त्यात आहे. ज्या आर्थी आपण मुत्सद्देगिरीने पहिले पाऊल टाकण्याचे ठरवले असल्याने, त्याशिवाय केवळ बोलणी करण्यास जाणे केवळ मूर्खपणाचे होईल. कारण कीं, आपले हितसंबंध पांडवांशी व कौरवांशी समसमान आहेत जो प्रथम बोलावेल त्याच्याकडे आपल्याला जावे लागणार आहे. ही आजची युद्धनिती आहे. आपण (द्रुपद) एक अग्रेसर राजे आहात व धृतराष्ट्र आपला नेहमी सन्मान करत असतो तसेंच आपण सगळयात ज्येष्ठ आहात, मला वाटते कीं, आपण पांडवांच्या वतीने भिष्म, द्रोण आणि कृप ह्यांना सामील होण्यासाठी बोलावे. तुम्ही त्यांना विनंती करावी कीं, ते ज्याअर्थी दोघांचे सारखे आहेत, म्हणून जर युद्ध झाले तर कोणाचीही बाजू न घेता तटस्थ रहातील, अशी विनंती आपण त्यांना करावी. शक्यतर सामोपचाराने हा मालमत्तेचा प्रश्न सुटावा ह्यासाठी प्रयत्न चालू असतील तरी जर तसे नाही झाले तर ते कोणाचीही बाजू घेणार नाहीत असें त्यांना आपण सांगावे. जर सामोपचाराने सगळे झाले तर कौरव आणि पांडव ह्यांचे बंधूभाव कायम रहाणार आहेत. जे कुरु वंशासाठी चांगले असेल. परंतु, दुर्योधन त्याच्या अट्टाहासास चिकटून राहिला व युद्ध झाले तर अर्जुनाचे गांडीव कौरवांचा नाश करण्यास तयार आहे. त्याची जबाबदारी सर्वस्वी कौरवांची व त्यांची बाजू घेणाऱ्यांची असेल.

वैशंपायन बोलतात, राजा विराट कृष्णाचे आदरतीथ्य करतो व त्याला द्वारकेला पाठवतो. इतर राजे आपापल्या ठिकाणी जातात व राजा विराट आणि पांडव उद्याच्या युद्धासाठी तयारी करण्यास सुरूवात करतात. त्यामध्यें ते ठरलेल्या सगळया राजांना युद्धात सामील होण्यासाठी बोलवण्याचे निरोप पाठवतात. त्यामुळें पांचाल नरेश, मत्स्य देशांचे राजे, आणि इतर मित्र राजे ते

निमंत्रण मोठ्या आनंदाने स्वीकारतात. त्याची वार्ता कौरवांना कळते. त्यांना समजते कीं, फार मोठा फौजफाटा पांडवांनी एकत्र करण्यास सुरूवात केली आहे, कौरवसुद्धा त्यांच्या दोस्त राज्यांना आमंत्रण पाठवण्यास प्रारंभ करतात. त्यामुळें पृथ्वीवरील राजांत कोणी कोणाकडे जायचे त्याबद्दल चर्चा होऊ लागते. सगळे वातावरण आधीच युद्धमय होऊन जाते. सैन्यांमी जमवाजमव सुरू होते. त्यांच्या हालचालीमुळें पृथ्वी हादरून जाते.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने युद्धाची तयारी होत असतांना पांचाल नरेश, राजा द्रुपद त्यांचा एक ज्येष्ठ आणि अशा कामाचा अनुभव असलेला, दर्जाचा ब्राह्मण युधिष्ठीराच्या परवानगीने कौरवांकडे बोलणी करण्यासाठी पाठवतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग पांचवा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग सहावा

द्रुपद त्यांच्याकडे असलेल्या एका अनुभवी ज्येष्ठ ब्राह्मणाला बोलतो, "वस्तूंमध्ये सचेतन वस्तू श्रेष्ठ असतात, सचेतनात बुद्धीमान श्रेष्ठ असतात, बुद्धामंतांत मनुष्य श्रेष्ठ असतो, माणसात द्विज श्रेष्ठ असतो, द्विजात वेदाचा अभ्यास करणारा श्रेष्ठ असतो, त्यात जो सुसंस्कारीत आहे तो श्रेष्ठ असतो, त्यांच्यात जो व्यवहार जाणणारा असतो तो श्रेष्ठ असतो, त्यांच्यात जो परमेश्र्वराला जाणतो तो श्रेष्ठ समजला जातो. आपण माझ्या माहीतीनुसार त्या श्रेष्ठतम श्रेणीचे आहात. आपले वय व अनुभव सर्वांनी ज्ञात आहे. ज्ञानात आपण शक्र किंवा बृहस्पती अथवा अंगिरसा सारखे आहात. आपण जाणता युधिष्ठीर कसा आहे व कौरव कसे आहेत. आपण जाणता कीं, धृतराष्ट्राच्या सम्मतीने पांडवांची फसवणूक झाली आहे. असें सांगण्याचे कारण विदूराने सावध केले होते तरी त्यांने युधिष्ठीराला द्युत खेळावयास भाग पाडले होते व काकाची आज्ञा म्हणून तो तेथे खेळला व कसा फसवला गेला ते आपण जाणता आहात. जो खेळ त्याला चांगला माहीत नव्हता त्या खेळात तो एका तरबेज माणसाबरोबर खेळावयास बसला होता. त्याचा जो परिणाम व्हावयाचा तो झाला तेसुद्धा आपण पाहिले आहे. चांगल्या प्रकारे धृतराष्टाराला सांगितले तर तो त्याची चूक सुधारण्यासाठी शांततामय तोडगा मान्य करण्यास तयार होईल असें तुला करावयाचे आहे. त्यात विदूर त्याच्यापरीने भिष्म, द्रोण व कृपांना पटवण्याचा प्रयत्न करणार आहेच. जर ते जमले तर शांततामय समझौता शक्य होईल. त्याच वेळी पांडव युद्धाची तयारी करत रहाणार आहेत. तेथे तू समझौत्याच्या गोष्टी करत असशिल तर त्यामुळें ते कौरव त्यांच्या कडून युद्धासाठीच्या पुरेशा तयाऱ्या करू शकणार नाहीत. तेवढा वेळ पांडवांना त्यांची तयारी करण्यासाठी मिळणार आहे. समझौत्याची आपल्याला गरज नाही, आपल्याला कौरवांना युद्धाच्या तयारीत वेळ न मिळावा असे पहावयाचे

आहे. तू धृतराष्ट्राला भेटत गेल्यास तो तुझ्याशी सामोपचाराच्या गोष्टी करत राहील त्यामुळें आपल्याला आपली तयारी करण्यास जास्त वेळ मिळेल हा डाव आहे. आपण सज्जन आहात तेव्हां आपण त्यांच्याशी तशाच गोष्टी करणार आहात. पांडवांना ह्या सगळयामुळें किती त्रास झाला ते त्याला खुलवून सांगावे लागेल असें कीं, त्याच्या मनात पांडवांबद्दल सहानुभूती उत्पन्न होईल. मला खात्री आहे कीं तू हे काम उत्तम प्रकारे करशील. तसे करत असतांना तुला त्यांच्याकडून कांहीं धोका होण्याची शक्यता नाही फक्त ते सगळे करतांना दुर्योधन तेथे असता कामा नये. कारण, तो तुला हे काम करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न जरूर करील. आपण ब्राह्मण आहात व वेदाचे जाणकार आहात. आपण पांडवांचे वकील म्हणून तेथे जात आहात. आपल्या वयाचा मान ते ठेवतील. तेव्हां आपण लवकरच कौरवांच्या कंपूत जाण्याची तयारी करावी. पुश्य नक्षत्राच्या मुहूर्तावर ज्याला जय असं नांव आहे आपण निघणार आहात".

वैशंपायन पुढे सांगतात, अशा रितीने पढवून तयार केलेला तो चतूर ब्राह्मण हस्तिनापुराला निघतो. मुत्सद्देगिरीत प्रवीण असा तो वयोवृद्ध ब्राह्मण त्याच्या शिष्यगणाबरोबर कुरु घराण्याच्या अड्ड्यावर पांडवांचे भले करण्यासाठी निघतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग सहावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग सातवा

वैशंपायन पुढे सांगतात, द्रुपद राजा त्या ब्राह्मणाला हस्तिनापुरी पाठवल्यानंतर त्याचे संदेशवाहक निरनिराळ्या देशांच्या राजांकडे युद्धात सामील होण्याचे आमंत्रण देण्यासाठी पाठवतो. अर्जुन द्वारकेकडे निघतो. त्याबरोबर कृष्ण, बलराम, इतर वृश्नी योद्धे, अंधक, भोज असें बरेच क्षत्रिय जे पांडवांशी युती करून असतात, ते सुद्धा जातात. कौरवांचे गुप्तहेर त्या सगळया गोष्टींची इत्तंभूत माहिती दुर्योधनाला देत असतात. कृष्ण द्वारकेला गेला आहे हे समजल्यावर दुर्योधन उत्तम घोडे व बरोबर मोजके सैन्य घेऊन स्वतः द्वारकेला निघतो. अर्जुन आणि दुर्योधन दोघे साधारणपणे एकाच वेळी तेथे पोहोचतात. जेव्हां ते दोघे कृष्णाच्या घरी पोहोचतात ते पहातात कीं, कृष्ण निजलेला आहे. ते दोघे त्याच्या शय्येजवळ बसतात. दुर्योधन तेथे असलेल्या उच्च दर्जाच्या आसनावर बसतो जे कृष्णाच्या डोक्याच्या बाजूला असते. त्यानंतर थोड्या वेळांनी धनंजय त्या खोलीत येतो व कृष्णाच्या पायाजवळ असलेल्या बिछान्याच्या कोपऱ्यावर बसतो. ते तसे बसलेले असतांना कृष्णाला त्याची चाहूल लागते व तो जागा होतो. जसा जागा होतो तो प्रथम त्याच्या पायाकडे बसलेल्या अर्जुनाला पहातो. तो अर्जुनाला त्याचा प्रवास कसा झाला ते विचारतो. ते होत असतांना दुर्योधन जो डोक्याकडे व कृष्णाच्या मागे बसलेला होता तो पुढे होऊन त्याची चौकशी करतो. त्यांच्या एकत्रपणे येण्याचे कारण तो त्या दोघांना विचारतो. त्याबरोबर दुर्योधन मोठ्या आनंदाने आपल्या येण्याचे कारण सांगतो. "लवकरच एक युद्ध होण्याची मोठी शक्यता आहे त्यासाठी मला तुझी मदत पाहिजे. अर्जुन व मी तुझे सारखेच मित्र आहोत आणि तू सुद्धा आम्हाला सारखाच मित्र समजतोस, आणि मी तुझ्याकडे अर्जुनाच्या आधी आलो आहे. त्याप्रमाणे चांगली माणसें नेहमी पहिला येणाऱ्याला पहिला संधी देतात त्या न्यायाने, कारण तू त्या उत्तम चांगल्या

माणसांपैकी एक आहेस, मला तुझ्याकडे मांगण्याची पहिला संधी दिली पाहिजेस. ते ऐकल्यावर कृष्ण बोलतो, "अरे मित्रा, तू माझ्या खोलीत प्रथम आला असशील ह्याबद्दल मला शंका नाही परंतु, माझी नजर प्रथम धनंजयावर पडल्यांमुळें तो माझ्यासाठी पहिला ठरतो. तरी जर तू बोलतोस कीं, तुला मी पहिला ऐकले पाहिजे तर बोल मित्रा तुला काय पाहिजे? तरीसुद्धा वयांने कनिष्ठाना नेहमी प्रथम संधी देतात त्या नियमाचे काय? त्या दुसऱ्या नियमाप्रमाणे कुंतीच्या मुलाला मी पहिला विचारणार आहे कीं, तो का आला आहे? माझ्याकडे दहा कोटी गुराखी आहेत. ते सगळे युद्धकलेत प्रवीण आहेत. ज्याला ते पाहिजेत त्याला मी ते देण्यास तयार आहे. मी लढणार नाही. मी शस्त्र उचलणार नाही. ज्याला मी पाहिजे त्याला मी मिळेन. तुमच्या पैकी कोणाला ते सैन्य पाहिजे व कोणाला मी निःशस्त्र असा पाहिजे ते ठरवा. जो प्रथम बोलेल त्याची मांगणी स्वीकारली जाईल". ते बोलल्यानंतर कृष्णा अर्जुनाला विचारतो, "बोल पार्था, तुला कोण पाहिजे, मी कां ते सैन्य? तू लहान आहेस म्हणून माझ्या नियमानुसार तुला मांगण्याचा हक्क पहिला आहे".

वैशंपायन पुढे बोलतात, ते ऐकल्यावर धनंजय बोलतो कीं, त्याला केशव पाहिजे जो त्या युद्धात लढणार नाही. त्यानंतर दुर्योधन ते गुराख्यांचे सैन्य मांगतो. कृष्ण त्यांची मांगणी मान्य करतो. दुर्योधनाला ते अफाट सैन्य मिळाल्यामुळें तो फार खूष होतो. ते मिळवल्यानंतर तो धृतराष्ट्राचा मुलगा रोहीणीच्या मुलाला, बळरामाला जाऊन भेटतो. त्याला त्याच्या येण्याचा उद्देश सांगतो. ते ऐकल्यावर बलराम त्याला सांगतो किं, विराटाच्या मुलीच्या लग्नाच्या समयी मी जे कृष्णाच्या मताविरुद्ध बोललो ते तू मनावर घेऊ नकोस कारण, मी कृष्णाच्या बरोबरच नेहमी रहाणार आहे. म्हणून जर कृष्ण पांडवांच्या बरोबर रहाणार असेल तर मी कोणाच्याही बरोबर जाणार नाही.

मी त्या समरात तटस्थ रहाणार आहे. त्यासाठी तू माझ्याकडे कोणतीही अपेक्षा ठेवून राहू नकोस. ते युद्ध योग्य नियमानुसार तुम्ही करावे अशी मी तुला विनंती करत आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या बलरामाच्या बोलण्यामुळें दुर्योधन जास्तच खूष होते व बलरामाला कडकडून मिठी मारतो. त्याला वाटत असते कीं, अर्जुनाचा पराभव झाल्यात जमा आहे. त्यानंतर तो गांधारीचा मुलगा कृतवर्मनकडे जातो. तो राजा त्याला त्याचे सैन्य देतो ज्याची संख्या अक्षौहणी असते. ते झाल्यामुळे कौरवाचा मुख्य आणखीनच आनंदात जातो. दुर्योधन गेल्यानंतर पितांबर नेसलेला कृष्ण किर्तीला बोलतो, "मित्रा मला सांग तू मला कां पसंत केलेस? मी तर लढणार नाही, तुझा हेतू मला समजला नाही".

अर्जुन त्याला सांगतो, "मला माहीत आहे कीं, तू त्या सगळयांना एका झटक्यात मारू शकतोस, मी सुद्धा त्यांना तसेंच मारू शकतो, परंतु, तू एक ख्यातनाम व्यक्ती आहेस व तू आमच्याबरोबर आहेस हे माझ्यासाठी पुरेसे आहे. मला तुझी साथ आवडते, लढण्यासाठी मला तुझी गरज नाही. मला तू माझा सारथी व्हावा असें वाटते. ती माझी फार  दिवसाची मनोकामना आहे".

वसुदेवाचा मुलगा त्यावर बोलतो, "मला तुझी मनोकामना आवडली आहे, मी तुझा सारथी होईन".

वैशंपायन नंतर सांगतात, कुंतीचा पुत्र मोठ्या आनंदाने कृष्ण व त्याच्या इतर दशरथ सोबत्यांबरोबर युधिष्ठीराला भेटण्यासाठी निघतात.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग सातवा संपला.

## सैन्योद्योग पर्व

# भाग आठवा

वैशंपायन पुढे सांगतात, संदेशवाहकाकडून समजल्यावर सल्य त्याच्या मुलांसह त्याचे मोठे सैन्य घेऊन पांडवांच्या दिशेने निघतो. त्याचा तळ पडतो त्याचे क्षेत्रफळ असते अर्ध्या योजना एवढे असते. त्यातील प्रत्येक वीर योद्धा युद्ध कलेत प्रवीण होता. त्यांच्या अंगावरील विविध रंगाच्या गणवेषामुळें तो परिसर सुंदर दिसत होता. निरनिराळया रथांवरील झेडे फडकत होते. त्या योद्ध्याच्या कपड्यावरून ते कोणत्या प्रदेशातील आहेत ते समजत होते. त्यांचा प्रवास सावकाशपणे होत होता. त्यांच्या चालण्यामुळें पृथ्वी थरथरत होती. दुर्योधनाला समजते कीं, तो महावीर त्यांच्या दिशेने येत आहे, तो त्वरेने त्याला जाऊन भेटतो व त्यांचे स्वागत करतो. त्याच्या सैन्याच्या स्वागतासाठी तो जिकडे तिकडे स्वागताच्या कमानी ऊभारतो. त्या सैन्याच्या मनोरंजनासाठी तो कलाकारांच्या प्रयोगांचे आयोजन करतो. त्यांच्या स्वागतासाठी असलेल्या मांडवात विविध पेये, मांसाचे पदार्थ, रुचकर इतर खाण्याचे प्रकार असे सगळे ठेवलेले होते. सैनिकांचे तंबू प्रशस्त व हवेशीर होते. त्यांचे स्वागत करण्यासाठी दुर्यौधनाचे सेवक देवाची सेवा करावी अशाप्रकारे त्यांची सेवा करण्यासाठी सज्ज होते. सल्य दुसऱ्या दालनात जातो जेथे स्वर्गीय व्यवस्था केलेली होती. त्याची व्यवस्था अशी होती किं, इंद्रसुद्धा चकीत होईल. सल्य त्याच्यासेवेत असलेल्या सेवकांना विचारतो, "मला त्या युधिष्ठीराला भेटावयाचे आहे ज्याने ही सगळी व्यवस्था माझ्यासाठी केली आहे. त्यांच्या अशा आदरतीथ्यासाठी मी त्याला कांहीं देऊ इच्छितो. त्यामुळें तो कुंतीपुत्र निश्चितच माझ्यवर संतुष्ट होईल". ते ऐकून ते सेवक त्याला सांगतात कीं, "महाराज ही व्यवस्था दुर्योधनाने आपल्या स्वागतासाठी केली आहे".

त्यानंतर ते दुर्योधनाला जाऊन ते सांगतात. तेव्हां तेथे लपलेला दुर्योधन बाहेर योतो व आपल्या मामाला भेटतो. त्याला पाहिल्यावर त्या मद्रदेशाच्या राजाला समजते कीं, ही व्यवस्था कौरवांनी केली आहे. ते समजल्यावर सल्य

दुर्योधनाला मिठी मारतो व बोलतो, "बोल तुला काय पाहिजे? मी तुझी इच्छा पुरी करीन". दुर्योधन त्यावर बोलतो, "अहो आदरणीय, आपण मला एक आशिर्वाद द्या, आपण माझ्या सेनेचे प्रमुख व्हावे".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून सल्य त्याला आश्र्वासन देतात की ते त्याची मागणी मान्य करत आहेत. त्यानंतर तो सल्य त्याला विचारतो, त्यानंतर तो गांधारपुत्र त्याच्या सगळया मागण्या मान्य करतो. त्यानंतर तो सल्य दुर्योधनाला सांगतो कीं, त्याने त्याच्या गांवी जावे. त्यानंतर सल्य युधिष्ठीराला भेटण्यासाठी निघतो. त्यानंतर तो हस्तिनापुराला निघणार असतो. सल्य दुर्योधनाला बोलतो, कीं, तो कुतीच्या मुलांना भेटणे अगत्याचे आहे. ते ऐकून तो थोडा नाराज झालेला त्याला बोलतो, कृपया त्यांना भेटल्यानंतर त्यानंतर लवकर हस्तिनापुरी यावे. कारण कौरव पूर्णपणे त्यांच्यावर विसंबून आहेत. आपण मला वचन दिले आहे ते लक्षात असू द्यावे. त्या संभाषणानंतर ते एकमेकाला मिठी मारतात. त्यानंतर दुर्यौधन त्याच्या घरी निघतो.

सल्य युधिष्ठीराला भेटून जे घडले ते सगळे त्यांना सांगतो. पांडवाच्या राज्यात, उपलव्य मध्ये तो पोहोचतो. तेथे पांडवांचा तळ असतो. तेथे त्याला पांडव मुखमार्जनार्थ जल देतात. ते तो स्वीकारतो. तो त्याचे हातपाय धुतो. त्यानंतर पांडव त्याला रिवाजाप्रमाणें भेटी देतात. त्यात एक गाय असते. ते प्राथमिक झाल्यावर तो पांडवांचे क्षेमकुशल विचारतो. तो सांगतो कीं, त्याला पांडवांना भेटून संतोष झाला आहे. भिम, अर्जुन व दोघे माद्रीचे पुत्र अशा सगळयांची तो जातीने विचारपुस करतो. ते एकत्र बसतात व इतर गप्पा सुरू होतात. सल्य कुतीपुत्र यधिष्ठीराला बोलतो, "अरें कुरुघराण्याच्या सुपुत्रा, आपले कसे आहे"? तुम्ही सुदैवाने त्या सगळया अरिष्टांतून पार पडला आहात. त्या निबिड अरण्यात रहाणे म्हणजे सोपे नव्हते ते तुम्ही मुकाट्याने सहन केले ह्याचे मी कौतुक करतो. त्यात तुमची पत्नीसुद्धा होती हे सगळे आम्हा लोकांना

फार विलक्षण वाटते. क्षत्रिय असून तुम्ही ब्राह्मणांना लाजवेल असें तेथे रहात होता, तपस्या करत होता. मला त्याचा अभिमान वाटतो. तुमचा अज्ञातवास तर सगळयांच्या चर्चेचा विषय झाला आहे. आता आपण आणखीन अवघड कार्य आरंभू इच्छित आहात. सिंहासनावरून खाली पडलेल्या राजाला हे सगळे सोसावे लागते. काकाला तू नाही म्हणून शकत नव्हतास म्हणून तू द्युतास बसला होता असें सगळे सांगतात. एवढा नितीमान तू आहेस त्याचे मला आश्र्चर्य वाटते. इतर कोणी असता तर तो नाही म्हणाला असता पण तू व तुझे बंधू त्या सगळया गोष्टी एकदिलाने करत होता, हे सगळे मला मोठे कौतुकास्पद वाटते. मला विश्र्वास आहे कीं, ह्या सगळया त्रासातून तुम्ही गेल्यावर व कौरवांचा विनाश केल्यावर तुम्ही मोठे सुख प्राप्त करणार आहात असें माझे मन सांगते. एवढी संकट आली परंतु, तुम्ही कधी चुकीच्या मार्गाने गेला नाहीत हे कमालीचे नवल करणारे आहे. इतर कोणी असतां तर क्रोधाच्या आहारी जाऊन त्याने अनेक कृष्ण कृत्य केली असती. परंतु, तुम्ही तसे कांहीं केले नाही. तुमचे विधाता नेहमी भले करील ह्याबद्दल मला शंका नाही. तुमची दयाबुद्धी, करुणा, सत्यशिलता, शांतपणा, सर्व प्रकारच्या मर्यादा ह्याचे करावे तितकी तारीफ कमी होईल. क्वचितच एकादा क्षत्रिय मिळेल ज्याच्याच हे सगळे गुण एकत्रपणे असतील. तुम्ही पांच भाऊ सत्गुणाचे पुतळे आहात. त्याबद्दल शंका नको.

वैशंपायन पुढे बोलतात, त्यानंतर सल्व युधिष्ठीराला सांगतो दुर्योधन त्याच्याशी काय बोलला. त्यांने मागितलेली वचनं कोणती ते सांगतो.

ते ऐकून युधिष्ठीर त्याला बोलतो, "आपण जी वचनं त्याला दिली त्याबद्दल माझी कांही तक्रार नाही परंतु, जर तुमच्या मनात आमच्या बद्दल एवढा सन्मान असेल तर मला एक वचन द्या कीं, जेव्हां अर्जुन व कर्ण लढत असतील तेव्हा तुम्ही कर्णाचे सारथ्य घ्यावे व अर्जुनाला संरक्षण मिळेल अशाप्रकारे तो रथ चालवावा. मला ते आश्र्वासन आपण देणार कां"? "आपण रथ असा चालवाल कीं, राधेयाचे मनोबल कमी होईल व विजय आमचा

होईल". ते ऐकून सल्व बोलतो, त्याला मी मंजूरी देतो. पण ऐक, कुंतीपुत्रा, कर्म मला कृष्णाच्या बरोबरीचा सारथी मानतो त्यामुळें तो मला सारथ्य देईल त्याबद्दल शंका नाही. त्याकरता मी त्याला तसे सांगिन कीं त्याच्या रथाचे सारथ्य मला द्यावे व ते तो मान्य करेल असें मला वाटते. त्याचे सारथ्य करत असतांना मी असें कांहीं बोलत असेन कीं, त्यामुळें त्याचे चित्त विचलित होईल व त्याच्या शत्रूला त्याला मारणे सोपे होईल. ते करण्यास मी तयार आहे कारण तुमचा विजय हा सत्याचा विजय असेल व त्यात माझी भागिदारी असल्याने मला स्वर्गाचे दरवाजे उघडे होतील. इतर कांहीं करण्यासारखे असेल तर तेसुद्धा मी तुमच्यासाठी करणार आहे. सभेत तुमचा जो विनाकारण अपमान होत होता, तुमच्या पत्नीचा मर्यादाभंग होत होता, त्यात त्या सुतपुत्राचा मोठा कार्यभाग आहे म्हणून त्याला योग्य शासन होणे स्वाभाविक आहे. जत, किचक ह्यांचा उपद्रव तिने सहन केला ते सगळे मी जाणून आहे. तुम्हाला माझ्या सहानुभूती पूर्णत्वाने मिळाणार आहेत. प्राचीन काळी जसें दमयंतीने भोगले तसे तुमच्या कृष्णानें भोगले आहे. ते मी समजून आहे. परंतु, अखेरीस तुम्हास मोठे सुख प्राप्त होईल असें माझे मन सांगते. तुमच्या सारख्या विभूतीना नेहमी अशा हालअपेष्टा सहन कराव्या लागतात असे इतिहास सांगतो. मला माहीत आहे, इंद्र, जो आज स्वर्गाचा धनी झाला आहे, त्यांने व त्याच्या बायकोने किती त्रास सहन केला होता. तसे तुम्ही भोगत आहात. ते ऐकून युधिष्ठीर सल्वाला बोलतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग आठवा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग नववा

युधिष्ठीर विचारतो, "अहो सम्राट, मला सांगा इंद्र व त्याच्या पत्नीने असें कोणते दुःख सहन केले"? सल्व सांगू लागतो, "अरे राजा, ऐक मला जशी समजली तशी मी तुला सांगणार आहे". "एकदा, त्वश्त्री जो सगळया प्राणिमात्रांचा प्रमुख आणि स्वर्गीय आहे, तो तपस्या करण्यासाठी बसला होता. त्याने इंद्रावरील रागामुळें एक तीन तोंडं असलेला मुलगा उत्पन्न केला. तो त्याच्या तेजामुळें चमकत होता असा तो तीन तोंडाचा, इंद्राच्या स्थानाची अभिलाषा धरून त्याप्रमाणे वागू लागतो. त्याची तीन तोंडं तेजस्वी होती. त्यातील एक तोंड सूर्यासारखे तेजस्वी होते, दुसरे तोंड चंद्रासारखे व तिसरे तोंड साक्षात अग्नी अशी ती तीन तोंड होती. तो एका तोंडाने वेद वाचत होता. दुसऱ्या तोंडाने अमृत पित असें, तिसऱ्या तोंडाने दहाही दिशांचा वेध घेत असे. त्याचा बहुतेक समय तपस्या करण्यात जात असें. त्याचे सगळे जीवन तपस्या आणि वैराग्य ह्याच्या पालनात व्यतीत होत होते. त्याचे तपोश्चरण फार तीव्र असें. त्याची तपस्या, वैराग्य आणि सत्त्वशिलता पाहून इंद्राला त्याच्याबद्दल कुतूहल उत्पन्न झाले. त्याला त्याची भिती सुद्धा वाटू लागली. त्याविचाराने प्रेरीत असा इंद्र ठरवतो कीं, त्याच्या वासना जागृत कराव्यात म्हणजे त्याचे तपोश्चरण संपुष्टात येईल. त्याला भोग घेण्यास प्रवृत्त करावे असें तो ठरवतो. आता प्रश्न असतो कीं, ते कसे साध्य करावे? मोठा प्रश्न असा होता कीं जर तो चिडला तर तो त्याच्या तीन तोंडाने सगळी सृष्टी खाऊन टाकील. इंद्र विचार करत असतो. अरे कुरुवंशी भरता, पुढे काय झाले ते ऐक, इंद्र कांहीं अप्सरांना ते काम सोपवतो. तो त्याना सांगतो कीं, ते काम लवकरात लवकर झाले पाहिजे. त्या त्रिमुखाला जास्तीत जास्त वासनामय करण्याचे आदेश तो देतो. त्यांना तो जास्त सुंदर रुप देतो. आकर्षक कपडे दागदागिने देतो. त्यांना सांगतो

किं त्या जाऊन त्याच्यापुढे कामुक नृत्य करतील. त्याला प्रेमासाठी आकर्षित करण्याचे आदेश तो देतो. त्या मादक मदनिका त्याला अशारितीने वासनांत फसवतील कीं, इंद्राची भिती नष्ट होईल. तो सांगतो कीं, त्याची झोप उडाली आहे जेव्हापासून तो त्रिमुख तपोश्र्चरण करू लागला आहे. त्या अप्सरा त्याला आश्र्वासन देतात कीं, त्या तसे अशाप्रकारे करतील कीं, त्याची धास्ती कमी होईल. त्याचा तपोभंग आम्ही करून दाखवू असें त्या सांगतात.

सल्व पुढे सांगत असतो, इंद्राच्या आज्ञेने प्रेरीत त्या अप्सरा त्रिमुखाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. तो त्यांच्याकडे पहातो, परंतु, त्याच्यावर त्यांचा कांहींही परिणाम होत नाही. त्या अप्सरा बराच प्रयत्न करतात पण व्यर्थ. शेवटी कंटाळून त्या इंद्राकडे जातात. त्या सगळया एका सुरात त्या शक्राला सांगतात कीं, तो ऋषी आम्हाला दाद देत नाही. आमचे सगळे प्रयत्न वाया गेले. तेव्हां आता काय करावयाचे ते बोला. इंद्र समजतो कीं तो मार्ग चालणार नाही. त्यानंतर तो त्या सगळया अप्सरांना परत पाठवतो व विचार करतो कीं, ह्याचा नाश करणे हा एकच मार्ग उरला आहे व त्यासाठी तो त्याचे अंतिम अस्त्र वज्र वापरावयाचे ठरवतो. त्याच्या आघाताने तो पटकन मरून जाईल असें त्याला वाटत असते. असें म्हणतात, कितीही शक्तिमान असलात तरी उठणाऱ्या शत्रूकडे दुर्लक्ष करणे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे असते त्याप्रमाणें, त्रिमुख इंद्राच्या हालचालीबद्दल जागृत होतो. इंद्र त्या जबरदस्त त्रिमुखावर वज्र फेकतो. त्यामुळें तो मरून पडतो. तो प्रचंड आकाराचा पृथ्वीवर मरून पडल्यानंतर इंद्राची भिती आणखीन वाढते, त्याला बेचैनी सतावू लागते. त्याच्या मृतदेहातून प्रकाश येत असतो. त्याचा इंद्राला त्रास होऊ लागतो. तो मेला नसून फक्त पडला आहे कीं, काय असें त्याला वाटू लागते. त्याची तीन तेजस्वी मुख आजूबाजूच्या शेतात प्रकाश टाकत असतात. त्याच सुमारास एक सुतार त्याला काम करण्यासाठी लाकडे पाहिजेत म्हणून कुऱ्हाड घेऊन त्या भागात येतो. तो ते चमकणारे मुख पाहून तो घाबरून जातो. त्याला इंद्र तेथे दिसतो. इंद्र त्या सुताराला सांगतो कीं, हे डोके कापून काढ. सुतार सांगतो कीं,

ते डोके त्याच्या कुऱ्हाडीने तुटणार नाही खूप मोठे आहे. त्याशिवाय असें मेलेल्या माणसाचे डोके कापणे नियमाबाहेर आहे. ते ऐकल्यावर इंद्र त्याला सांगतो, "त्याबद्दल घाबरू नकोस, मी जे सांगतो ते कर, माझ्या कृपेने तुझी कुऱ्हाड वज्रासारखी होईल. तो सुतार इंद्राला विचारतो, हे कृत्य करणारे आपण कोण आहात"? मला सगळे समजले व ते योग्य आहे असें पटले तरच मी तुला मदत करील नाही तर नाही. इंद्र त्या सुताराला सांगतो, "मी साक्षात इंद्र आहे, देवांचा राजा. हे समजून तू माझ्या आज्ञेचे पालन कर. कांहीं चिंता करू नकोस".

ते ऐकून तो सुतार इंद्राला बोलतो, "तू इंद्र म्हणवतोस व अशी अमानुष कृत्यं करतोस, तुला लाज वाटत नाही कां? एका ब्राह्मणाचा तू खून केला आहेस". इंद्र त्याला सांगतो कीं, तो प्रायश्चित्ताचे यज्ञ नंतर करणार आहे. त्यामुळें ते पाप धुतले जाईल. हा माझा फारमोठा शत्रू होता म्हणून मी त्याचा खून केला आहे. त्याचा खून मी माझ्या वज्राने केला आहे. मी अजून बेचैन आहे. त्याची डोकी पाहून मला अजून खूप घाबरल्यासारखं होत आहे. ती डोकी चटकन त्याच्या धडापासून वेगळी करून टाक. तसें कलेस तर मी तुला आशिर्वाद देईन व तुझे भले करीन. त्यामुळें यज्ञात वध केलेल्या जनावराचे डोके तुला ते देतील. तो तुझा मान असेल. परंतु, आता वेळ न घालवता पटकन ती डोकी वेगळी करून टाक. सल्व पुढे सांगतात, त्यानंतर तो सुतार त्याच्या कुऱ्हाडीने ती तीन डोकी धडापासून वेगळी करतो. त्याबरोबर त्या वेदाचे वाचन करणाऱ्या आणि अमृत पिणाऱ्या मुंडक्यांतून विविध प्रकारचे पक्षी बाहेर येऊ लागतात. ज्या मुखातून तो दहादिशा न्याहाळत असें त्यातून सुद्धा कांहीं पक्षी येतात. ती तिनही डोकी धडापासून वेगळी केल्यानंतर तो इंद्र शांत मनाने त्याच्या घरी जातो. सुतार त्याच्या घरी जातो. त्या असुरांच्या दुष्मनाला वाटते कीं ते जिंकला आहे. परंतु, जेव्हां त्वश्त्री समजतो कीं, त्याच्या तपस्वी मुलाचा

अंत इंद्राने अशाप्रकारे केला आहे, तो रागांने लालबुंद झाला. तो इंद्राला शाप देतो कीं, माझा मुलगा ज्यांने कोणाला कांहीं इजा केलेली नाही त्याला इंद्राने आकसापोटी मारले आहे म्हणून मी इंद्राचा नाश करण्यासाठी वृत्राची निर्मिती करत आहे. जगाला दिसू दे माझी काय ताकद आहे. तपश्चर्या करणाऱ्यांचा अशाप्रकारे नाश करणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे. त्या विकृत मन असलेल्या देवांच्या राजालासुद्धा तसेंच भोगावे लागेल जे माझ्या निष्पाप त्रिमुखने भोगले. असे बोलून तो ऋषी उठतो व आचमन घेतो व अग्नीत आहुती देतो व वृत्राची निर्मिती करतो. त्या भयंकर वृत्राला तो सांगतो, "तू इंद्राचा नाश करण्यासाठी आला आहेस. माझ्या तपोबलातून तू मोठी शक्ती मिळवशिल ज्यामुळें तू त्या देवांच्या राजाचा नाश करशिल. त्यानंतर तो असुर वाढत जातो. त्याचा आकार आभाळाला मिळण्या इतका मोठा होतो. ते सूर्य चंद्राला भिडतो. तो दुसरा सूर्य जणू असा तेजस्वी होतो. प्रलय काळात सूर्य कसा दिसतो तसा तो दिसू लागतो. तो विचारतो, "आता मी काय काम करावयाचे ते सांगा". त्याला जाब मिळतो, "जा इंद्राला ठार मार".

ती आज्ञा मिळाल्यावर तो स्वर्गाकडे जाऊ लागतो. त्या नंतर इंद्र आणि वृत्र ह्यांच्यात मोठी लढाई होते. ते दोघे एकमेकांवर रागावलेले असतात. वृत्र शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्राला धरतो. त्याचा गोल गोल फिरवून मग स्वताच्या तोंडात घालतो. तो इंद्राला गिळून टाकतो. ते पाहून घाबरलेले स्वर्गीय ऋषी वृत्राला मारण्यासाठी त्रिंबकाला आवाहन करतात. तेथे वृत्र जांभई देतो तेव्हां इंद्र त्याचा आकार लहान करून त्याच्या तोंडातून बाहेर येतो. तेव्हापासून जांभई देणे तिनही जगासाठी चांगले समजले जाऊ लागले. सगळे देव इंद्र बाहेर आला म्हणून खूप खूष होतात. वृत्राला समजते कीं, इंद्र त्याच्या तोंडातून बाहेर आला आहे तेव्हां पुन्हा लढाई सुरू होते. ते युद्ध अनेक युग चालू आहे. त्वश्त्रीच्या व त्याच्या स्वतःच्या बळावर इंद्राला नमवतो, इंद्र परत फिरतो. ते पाहून सगळे देव पुष्कळ नाराज होतात. ते सगळे देव इंद्रासह त्वश्त्रीने दाबून टाकलेले

असतात. ते मोठ्या संतांना त्यांचा सल्ला विचारतात. ते मंदार पर्वताच्या माथ्यावर बसून योजना आखत असतात कीं, त्वश्त्रीला व वृत्राला कसे पराजित करावयाचे. त्यांना आता फक्त एकाचीच आशा होती व तो होता विष्णू. तोंच केवळ ह्यातून मार्ग काढेल असें ते समजतात.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग नववा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग दहावा

इंद्र त्या सगळया देवांना सांगतो, "अहो देवांनो, हे अविनाशी विश्र्व वृत्राने व्यापले आहे. त्याला हरवणे वाटते तितके सोपे नाही. मी त्याचा मुकाबला करण्यात असमर्थ ठरलो आहे. मी आतापर्यंत तुमचे संरक्षण ह्या असुर शक्तींपासून करत आलो पण आता ह्यापुढे ते शक्य होईल असें वाटत नाही. मी हरलो आहे असें उद्गार तो हताशपणे सगळया देवांपुढे काढतो. त्या वृत्राची ताकद अशी आहे कीं, तो सगळी तीन जगं एका घासात खाऊ शकेल. म्हणून मी ठरवले आहे कीं, आपण सगळे एकत्रपणे विष्णूच्या मदतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्याच्या मदतीने वृत्राला आवरता येईल, एरवी ते केवळ अशक्य आहे. ह्यापुढे विष्णू जसें सांगतील तसे आपण सगळे करणार आहोत".

सल्यपुढे सांगतो, इंद्र अशाप्रकारे बोलल्यानंतर सगळे देव आणि देवर्षी विष्णूकडे जाण्याचे ठरवतात. त्याच्या संरक्षणात सगळे विश्र्व आणण्याचे ते ठरवतात. वृत्राच्या धास्तीने अस्वस्थ झालेले ते सगळे विष्णूला सांगतात, "अहो भगवंत, आपण ह्याआधीसुद्धा अशाप्रकारच्या परिस्थितीत देवांना मदत करण्यासाठी धावून आलेले होते. एकदातर आपण तीन पावलात सगळी तिनही जग पादाक्रांत केली होती, आपण अमृत देवांसाठी मिळवण्यात मदत केली होती, आपण अनेक असुरांचा नाश युद्धांत केला आहे. आपण इंद्राचे स्थान त्याच्यासाठी टिकवण्यात नेहमी मदत केली आहे, आपण देवांचे अंतिम आशास्थान आहात. हे सगळे विश्र्व आपण व्यापून आहात, आज पुन्हा वेळ आली आहे कीं, आपण इंद्राला व इतर सगळया देवांना मदत कराल व त्या वृत्राचा बंदोबस्त कराल". ती प्रार्थना ऐकून विष्णू त्यांना सांगतो, "मी तुमच्यासाठी ते सगळे करण्यास तयार आहे. मी तुम्हाला एक योजना सांगतो

जी केल्याने त्या महाबली वृत्राचा बंदोबस्त निश्चितपणे होईल. त्या योजनेनुसार तुम्ही सगळे ऋषी, गंधर्व, यक्ष इत्यादी तो वृत्र जेथे आहे तेथे जाल. त्याच्याशी सामोपचाराच्या गोष्टी करू लागाल. त्या बोलण्यात तुम्ही त्याला अडकवू शकाल त्यासाठी मी माझी सिद्धी पणाला लावीन. त्या तहाच्या बोलण्यात तो फसेल व इंद्र पुन्हा जिंकेल. मी अदृष्यपणे इंद्राच्या वज्रात राहीन. अहो देवांनो आता त्वरा करा व जे सांगितले ते करा". असें विष्णू त्यांना सांगतो. त्या तहाच्या बोलण्यास ताबडतोब सुरूवात करा असा आदेश विष्णू त्या सगळया गंधर्व, यक्ष, ऋषी व इतर देव ह्यांना देतो.

सल्य पुढे सांगत असतो, त्या आदेशानुसार ते सगळे स्वर्गीय इंद्राला त्यांचा मुख्य म्हणून नेमून निघतात. ते वृत्राकडे जातात. ते पहातात कीं, वृत्र त्याच्यातून बाहेर येणाऱ्या तेजांनी सगळया दाहीदिशा उजळून टाकत असतो. त्याने सगळी जगं गिळंकृत केलेली असतात. त्यानंतर कांहीं देवर्षी वृत्राला भेटतात व तहाची बोलणी करू लागतात. ते त्याला बोलतात, "तू सगळी तिनही जगं ताब्यात घेतली असलीस तरी खऱ्या अर्थाने तू अजून इंद्राला जिंकू शकलेला नाहीस. तुमच्या युद्धामुळे सगळया देवांना, असुरांना, राक्षसांना फार त्रास होत आहे. म्हणून आमचा असा तुला सल्ला आहे कीं, तू इंद्राशी समझौता करावा व हे तुमचे भांडण मिटवावे". वृत्र त्या ऋषींचे बोलणे ऐकून त्यांना अभिवादन करतो  व त्याचे स्वागत करतो. पुढे ते देवर्षी त्याला बोलतात, "समझौता झाल्यानंतर तू इंद्राच्या राज्यात सुखाने राहू शकशिल व इंद्र त्याचे काम करू शकेल ह्यात दोघांचा फायदा आहे". ते ऐकल्यावर वृत्र त्यांना सांगतो, "तुम्ही जे बोलता तो मला पटते, परंतु, असा शांतता करार कसा शक्य आहे तुमच्या इंद्रात व माझ्यात, हाच तर प्रश्न आहे. दोन परस्पर विरोधी शक्तींमध्ये समझौता कधीही होत नाही. हे तुम्ही चांगलेच जाणता आहात". ते ऐकल्यावर

ऋषी त्याला सांगतात, "चांगल्या लोकांत समझौता एका भेटीत होऊ शकतो. त्यानंतर जे दैवात आहे ते होत रहाणार आहेच". सात्त्विक माणसांची मैत्री होत असेल ते मोठे भाग्याचे समजतात. तशी मैत्री एक संपत्तीसारखी असते. खरे मित्र नेहमी सार्थ मार्गदर्शन करतात. म्हणून चांगल्या माणसांचा नाश होणार नाही असें वागले पाहिजे. सात्त्विक इंद्राला मानतात. कारण इंद्र निर्दोष असतो, त्याचे निर्णय बिनचुक असतात.म्हणून त्याची व तुझी कायम दोस्ती झाली तर त्यात सगळया चांगल्या लोकांचे भले होणार आहे. अशाप्रकारे ते वृत्राला पटवण्याचा प्रयत्न करत असतात.

सल्व पुढे सांगत असतो, ते ऋषींचे बोलणे ऐकल्यावर वृत्र त्यांना सांगतो, "आपण पुण्यप्रभावी आहात म्हणजे तुम्ही कधी खोटे लांगणार नाही हे मी समजू शकतो. परंतु, जर मला जे पाहिजे तसे हे देव करणार असाल तर मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे करण्यास तयार आहे. अहो ब्रह्मर्षीनो, तुमचा इंद्र अथवा कोणीही देव मला कोणत्याही गोष्टीचा उपयोग शस्त्रासारखा करून मारण्याचा प्रयत्न करणार नाही जी ओली आहे, सुकी आहे, जी दगडाची आहे, जी लाकडाची आहे, जी कोणत्याही धातूची आहे, त्याच प्रमाणे रात्री अथवा दिवसा, फेकून अथवा हाणून, वापरली जाणार आहे. जर तसे आश्र्वासन मला देवांच्या आणि इंद्राच्या वतीने देत असाल तर मी तुमच्या इंद्राशी कायम समझौता करण्यास तयार आहे. ते ऐकून ऋषी आनंदी होतात. अशा अटीवर तो करार संपन्न होतो. त्यामुळें वृत्र फार खूष होतो. इंद्रसुद्धा वरपांगी खूष झाल्याचे दाखवतो व आतल्या आत तो वृत्राचा वध कसा करावयाचा ह्या अटी पाळून त्यावर विचार करत असतो. कोठे खोट मिळते कां त्या अटींतून बाहेर पडण्यासाठी ते तो शोधू लागतो. खोट दिसत नसल्यामुळें इंद्र बेचैन झालेला असतो. एक खोट त्याला सांपडते कीं, संध्याकाळ हा समय न रात्र व दिवसात येत म्हणजे वृत्राला संध्याकाळी अथवा पहाटे मारता येईल हे तो समजतो. त्या प्रचंड आकाराच्या असुरास मारण्यासाठी असे कोणते शस्त्र शक्य आहे जे न

दगडाचे, धातूचे, लाकडाचे बनवलेले आहे हे तो पाहू लागतो. इंद्र समजत असतो कीं, जर वेळीच ह्या प्रचंड आकाराच्या असुरास मी मारले नाही तर यथावकाश सृष्टीच्या नियमांनुसार माझे स्थान विचलीत होणार, ह्याची चिंता त्याला खात असते. असा विलक्षण परिस्थितीत विष्णू कशी त्याला मदत करू शकेल त्याचा तो विचार करत असतो. पाणी किंवा फेस वापरून त्याला मारावे तर ते कसे हा प्रश्न त्याला सतावत असतो. पाणी अथवा फेस हे शस्त्र म्हणून वापरता येणार नाही. म्हणजे संध्याकळी अथवा पहाटे आणि पाणी अथवा फेस वापरून वृत्राला मारले तर ते त्या अटींत बसते पण ते कसे शक्य आहे? असा प्रश्न त्याला सतावत असतो. इंद्र अशाप्रकारे विविध पर्याय अजमावत असतो. फेस अथवा पाणी हे शस्त्र समजले जाणार नाही त्यात जर वज्राचा मंत्र भरला व ते फेकले तर तो निश्चितपणे मरेल असा कयास तो करत असतो. शेवटी असें ठरते कीं, इंद्र फेसाचा गोळा वज्राच्या मंत्राने भारून व त्याशिवाय विष्णूची शक्ती त्यात भरून ते वृत्रावर टाकले तर तो महाबली असुर खात्रीने ठार मारला जाईल असें ठरते.

त्याप्रमाणें तो देवांचा राजा त्याची त्वरित अंमलबजावणी करतो. त्या अपेक्षे प्रमाणे खरेखरच वृत्र मरतो. त्याच्या मृत्यूमुळें दहादिशा त्याच्या ताब्यातून मुक्त होतात. त्यामुळें सगळे मोसम पूर्वीप्रमाणें पुन्हा सुरू होतात. वारे वाहू लागतात, पाऊस पडू लागतो. सगळी ऋतुचक्र पूर्ववत होतात. सगळे चराचर आनंदी होतात. सृष्टीचे चक्र सुरळीतपणे चालू लागते. सगळे देव, राक्षस, यक्ष, नांग उरग, गंधर्व इंद्राची स्तुती करू लागतात. त्याच्या स्तुतीचे साम गाईले जाऊ लागतात. त्याच्या चतुराईचे सर्वत्र कौतुक होऊ लागते. इंद्रसुद्धा त्या यशामुळें उत्साहीत झालेला सगळयांशी उत्साहाने बोलू लागतो. त्यानंतर तो शक्र विष्णूची पुजा करू लागतो कारण त्याच्या कृपेमुळें ते शक्य झालेले असते हे तो जाणून असतो. वृत्राच्या वधानंतर इंद्राचा अंहंकार वाढतो. त्याला वाटते कीं तो कोणी मोठा झाला आहे. तरी तो खिन्न सुद्धा होतो कारण

त्याला ब्रह्महत्त्येचे पाप लागलेले असते कारण त्वश्त्रीचा मुलगा त्रिमुख हा निष्पाप ब्राह्मण होता. केवळ संशयावरून त्याने त्याची हत्त्या केलेली असते. त्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी तो वनात तपस्या करण्यासाठी निघतो. त्याच्या पापकृत्याचा परिणाम स्वरुप तो त्याचा विवेक हरवून बसतो. तो पाण्यात जावून लपून बसतो. अशाप्रकारे देवांचा राजा त्याच्या पापकृत्यामुळें लपून बसतो तो कोणालाही दिसत नाही. त्याच्या तशा हरवण्यामुळें सगळीकडे अराजक माजते. पृथ्वीवरूल ॠतु काम करेनासे होतात. अरण्ये ओस पडतात, नद्यांतून पाणी नाहीसे होते. तळी, सरोवरं सुकी होतात. वरुणदेव नाहीसा होतो. पाण्याच्या अभावामुळें सगळे चराचर अस्वस्थ होतात. असे झाल्यामुळें सगळे देवर्षी, देव चिंतीत होतात. इंद्र नसल्यामुळें सगळी सृष्टी अनाथ झालेली असते. पुढे काय होणार असा प्रश्न सर्वांना पडलेला असतो. कोणालाही इंद्राची जागा घेण्याची इच्छा नसते.

अशा रितीने सैन्योद्योग पर्व भाग दहावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग अकरावा

सल्य पुढे सांगतो, सगळे देवर्षी आणि ज्येष्ठ देव ठरवतात कीं, इंद्राच्या अनुपस्थितीत आपण राजा नहुषाला इंद्रपदी नेमू. त्याची योग्यता इंद्र बनण्याची आहे असे सगळयांचे मत बनते. ते नहुषाला भेटतात. त्याला बोलतात कीं, "ह्यापुढे तू आमचा स्वर्गाचा राजा म्हणून आम्ही घोषित करत आहोत, तरी तुला कांहीं आक्षेप आहे कां"? ते ऐकून राजा नहुष त्यांना सांगतो कीं, "मी इंद्र बनण्याच्या योग्यतेचा नाही. मी त्या जागी बसू इच्छित नाही कारण मी तुमचे त्याप्रकारे संरक्षण करू शकणार नाही. तुमचा राजा बनण्यासाठी माझ्यापेक्षा जास्त सामर्थ्य असलेला कोणी पहावा. मी इंद्राची बरोबरी करू शकणार नाही. ते ऐकल्यावर तेथे जमलेले संत, ऋषी त्याला सांगतात कीं, प्राप्त परिस्थितीत आमच्या तपोबळांने आम्ही तुला त्या योग्यतेचे करू. जे कोणी पुण्यप्रद आहेत मग ते देव, राक्षस, ऋषी, यक्ष, पितर गंधर्व असतील ते त्यांची शक्ती तुला देऊन तुझे कार्य सुलभ करतील पण तू एकदाचा राजा बनून घे. सर्व गोष्टीत चांगुलपणा श्रेष्ठ असे धोरण ठेवून तू ते राज्य करशिल असे बघ. अशारितीने त्यांच्या आग्रहाने तो नहुष राजा इंद्राच्या ठिकाणी बसतो. परंतु, त्याच्या वासना त्याचा पिच्छा सोडत नाहीत. देवांचा राजा झाल्यानंतर त्याच्या सभोवार स्वर्गीय अप्सरा वावरू लागतात. तो त्यांच्या बरोबर त्याचा काळ नंदनवनात व कैलासात, हिमालयात, मंदीर पर्वतावर, सह्य पर्वतावर, महेन्द्र आणि मलय पर्वतांवर मजेत घालवू लागतो. त्याच्या सेवेत विश्ववसु, नारद, सहाऋतु मानवीरुपात, आणि गंधर्व व अप्सरा, त्याची बडदास्त पाहू लागतात. ते मजा करण्याचे चालू असतांना एकदा त्याची नजर इंद्राची पत्नी सांचीवर पडते. त्याची वासना जागृत होते. तो त्याच्या सेवकास विचारतो, "ती इंद्राची बायको माझी सेवा करण्यासाठी कां येत

नाही"? मी आता नवीन इंद्र झालो आहे तुमच्या सगळयांच्या मर्जीने तेव्हां, आता ती माझी बायको झाली पाहिजे. तिला लवकरात लवकर मलाकडे पाठवून द्या. ते सांचीला समजते, ती दुःखी होते. ती बृहस्पतीला विचारते, "आता काय करावयाचे? मला आपल्याकडे आश्रय द्याल तर बरे होईल". आपण नेहमी सांगता कीं, माझ्या अंगावर ती सगळी शुभ लक्षणं आहेत ज्यांमुळें मी इंद्राची पत्नी झाली आहे व मी कधीही दुसऱ्या कोणालाही जवळ येऊ देणार नाही आणि मी कधीही विधवा होणार नाही. माझी शुद्धता आपण सांभाळा".

"हे सगळे आपणच मला सांगत होता, मग आता हे कोणते अरिष्ट येत आहे. आता तुम्ही माझे संरक्षण करा". ते ऐकून बृहस्पती तिला आश्वासन देतात कीं तिचा राजा त्याची तपस्या उरकून लवकरच येणार आहे. "तू निश्चिंत रहा, मी जे बोलतो ते नेहमी खरे होत असते. त्या नहुषापासून तुला कांहीं बाधा होणार नाही. मी लवकरच तुझी व तुझ्या पतीची भेट घडवून आणीन".

तेथे नहुषाला समजते कीं, इंद्राच्या पत्नीला बृहस्पतीने आश्रय दिला आहे. जो ऋषी अंगिरसाचा मुलगा आहे. ते समजल्यावर राजा नहुषाला त्याचा राग येतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग अकरावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग बारावा

सल्य पुढे सांगता, नहुष रागावला आहे ते पाहून सगळे देव व संत त्याला सांगतात, "अहो नृप जरा शांत व्हा. जर तुम्ही रागावलात तर असुर, गंधर्व, राक्षस, उरग, किंन्नर, सुद्धा त्यांचे ताळतंत्र सोडतील, त्यासाठी तुम्ही रागावता कामा नये. आपण सात्त्विक राहिले पाहिजे, तुमच्या वासनांवर तुमचे नियंत्रण असले पाहिजे. ती सांची देवता दुसऱ्याची पत्नी आहे. तिचा लोभ आपण करू शकत नाही. आपल्या वासना शरीराच्या बंधनात आहेत ते तुमच्या योग्यतेत बसत नाही. हे विसरून चालणार नाही आपल्याला कीं, आपण आता देवांचे राजे झाला आहात. जर आपणच सात्त्विकता सोडली तर तुमच्या प्रजेचे कसे होणार"?

नहुष त्याच्या वासनांत अडकलेला, त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो. आणि बोलतो, "तुमच्या इंद्राने अहिल्याला नासवले होते त्याचे काय? तेव्हां तो देवांचा राजा नव्हता कां? दुसऱ्यांच्या बायकांवर तो नजर टाकत होता तेव्हां त्याला तुम्ही काय सल्ला देत होता? तुमच्या इंद्राने अनेक अमानुष कृत्य केली आहेत, त्यांने चांगुलपणा सोडून लुच्चेगिरी केली आहे, त्या वृत्राचा नाश सुद्धा त्याने कपट कारस्थानानेच केला आहे. त्या त्रिमुखाचा वध केला तेव्हां तुम्ही त्याला कां सल्ला देत नव्हता? मला कां हे सगळे शहाणपण सांगत आहात"? ते देवतेने मला स्वीकारावे त्यातच तिचे भले आहे".

देव त्याला सांगतात, "आपण आज्ञा करता तेव्हां आम्ही तुमच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी त्या देवतेला तुमच्याकडे आणून सोडणार. परंतु, कृपया रागावणे बंद करा. शांत व्हा".

सल्य पुढे सांगतो, ते बोलल्यानंतर सगळे देव आणि संत बृहस्पतीकडे जातात. तिला ते दुःखदायक सांगतात. ते बोलतात, आपल्या आश्रयात सांची आहे हे आम्ही जाणतो परंतु, आम्ही तुम्हाला विनती करतो कीं, सांचीला नहुषाकडे पाठवण्याशिवाय दुसरा पर्याय दिसत नाही. आजच्या घडीला राजा नहुष इंद्रापेक्षा जास्त शक्तिमान आहे. सांचीने नहुषाला तिचा पती म्हणून स्वीकारावे त्यातच सगळया देवांचे भले आहे. ते ऐकून सांची जोराजोरांने रडू लागली. ती बृहस्पतीला बोलते, "मला तो नहुष अजिबात आवडत नाही. मी त्यासाठीच आपले संरक्षण मागितले होते व हे आता काय होत आहे? आता तुम्ही माझे संरक्षण करण्यास बांधलेले आहात. मला त्याच्याकडे आपण पाठवू शकत नाही".

बृहस्पती तिला सांगतो, "माझा निर्णय असा आहे, मी ज्याला संरक्षणाचे आश्वासन देतो त्याला मी संरक्षण देणारच. तू गुणी आहेस तुझ्यावर असा अन्याय मी होऊ देणार नाही. मी ब्राह्मण आहे म्हणून मी कोणतेही अयोग्य कृत्य करू देणार नाही. त्यानंतर तो ब्रह्मदेवांना सांगतो, तुम्ही जा. ती देवता त्याला मिळणार नाही हे त्याला सांगा. मी जर ह्यावेळी त्याच्या पापकारक मागणीपुढे झुकलो तर पुढे चुकीचा पायंडा पडेल ते होणे कोणाच्याही हिताचे नाही. ब्रह्म नहुषाला शाप देतो कीं, हा इंद्राची जागा घेण्यास लायक नाही म्हणून तो स्वर्गातून खाली फेकला जाईल. देवांना तो जाण्यास सांगतो.

सल्य पुढे सांगतो, देव ब्रह्माला बोलतात कीं, "असें तडकाफडकी करता येणार नाही. कांहीं मध्य मार्ग काढावा लागेल". त्यावर ब्रह्म सांगतो कीं, त्याला सांगा कीं, सांचीला विचार करण्यास अवधी पाहिजे त्यानंतर ती काय योग्य ते करेल. त्याशिवाय दुसरा मार्ग सांचीला आणि आपल्याला नाही, असें ब्रह्म बोलतो. त्या मधल्या काळात कांहीं उपाय सुचू शकतो. नहुष त्याला मिळालेल्या आशिर्वादामुळें विवेकी आहे तेव्हां त्याच्यात कांही बदल होईल असे आपण समजू.

सल्य पुढे सांगत असतो, देव ते ऐकून संतुष्ट होतात व बोलतात, "आपण योग्य तेंच समजता. त्यातच आपल्या सगळयांचे भले आहे". त्यानंतर अग्नीदेवाच्या नेतृत्वाखाली ते देव सांचीला सांगतात समजावणीच्या सुरात, आपण पवित्र आहात. जगातील चराचरांचे आपण आधार आहात. तो अपवित्र वासनांध झालेला नहुष तुमच्यापुढे टिकाव धरू शकणार नाही. नियती आपल्याला सांभाळून घेईल. लवकरच इंद्र त्याच्या जागी येईल व सगळे व्यवस्थित होईल. ते ऐकून सांची नहुषाला भेटण्यासाठी जाते. तिचे सौंदर्य पाहून तो वासनांध झालेला राजा फार खूष होतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग बारावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग तेरावा

सल्य पुढे सांगतो, नहुष देवांचा राजा तिच्याकड् पहात म्हणूतो, "अहो सुंदरी, मी आता नवा इंद्र झालो आहे, मला सगळ्या देवांनी व ऋषींने त्या जागेसाठी निवडले आहे. त्यामुळें मी आता ह्या तिनही जगांचा अधिपती झालो आहे. म्हणून माझा तू तुझा पती म्हणून स्वीकीर करावयाला कांहीं हरकत नसावी".

ते त्याचे बोलणे ऐकून ती घाबरून जाते. ती त्यामुळें थरथरू लागते. सांची मनाने ब्रह्माला वंदन करून नहुषाशी बोलते, "अहो देवांचे राजे, मला तुमच्या प्रस्तावावर विचार करावा लागेल. त्यासाठी मला कांहीं अवधी पाहिजे. माझ्या इंद्राचे काय झाले आहे ते मला ठाऊक नाही. ते समजल्याशिवाय मी आपल्याला कांहीं उत्तर देऊ शकत नाही. ते समजल्यावरच मी तुमच्या प्रस्तावाबद्दल विचार करू शकेन".

ते ऐकल्यावर नहुष खूष होतो व त्यासाठी तिला वेळ देतो. तो बोलतो, "मी समजू शकतो तुझी काय अवस्था झाली आहे. तू एक पतिव्रता आहेस त्यासाठी जर तू विधवा झाली आहेस असें समजले तरच तू माझा विचार करू शकतेस हे मी समजू शकतो". त्यानंतर तो तिला जाण्यास सांगतो.

तेथून ती इंद्राची पत्नी थेट बृहस्पतीच्या घरी जाते. तिच्या बरोबर इतर देव अग्नीदेवाच्या नेतृत्वाखाली तेथे जातात. त्यानंतर तो इंद्राचे कशात भले आहे ते लक्षात घेऊन विष्णूचा सल्ला घेण्याचे ठरवतात. ते देवादि देव विष्णूला सांगतात, ब्रह्महत्त्येमुळें व्यथित झालेला त्यांचा राजा इंद्र कोठेतरी गायब झाला

आहे. आपण सर्व ज्ञानी आहात तेव्हां त्याला त्या ब्रह्महत्त्येच्या पापातून मुक्त करण्याचा कांहीं मार्ग आपण सुचवू शकाल तर बरे होईल.

ते ऐकल्यावर विष्णू त्यांना सागतात, इंद्राने मला शरण जाणे आवश्यक आहे. त्यांनी माझी पुजा करावयाला पाहिजे तरच मी त्याला त्या पापातून मुक्त करू शकेन. तसे झाले तर तो पुन्हा त्याच्या स्थानी विराजमान होऊ शकतो. त्यासाठी त्यांने एक अश्वमेध यज्ञ केला पाहिजे. त्यानंतर तो नहुष त्याच्या कर्माची फळ भोगण्यासाठी फेकला जाईल. परंतु, ते सगळे सावधगिरीने केले पाहिजे. ते विष्णूचे शब्द त्या सगळयांना अमृतासारखे वाटतात. त्यानंतर ते सगळे ऋषी व देव इंद्र जेथे गेला आहे तेथे जाण्याचा विचार करतात. ते घाबरलेले असतात. सल्य युधिष्ठीराला सांगतो, त्याचे पाप विष्णूच्या कृपेने झाडे, नद्या, पर्वत आणि महिला ह्यांत वाटले जाते. त्यामुळें तो त्या पापातून मुक्त होतो. तो असुरांचा नाश करणारा नहुषाला ज्याला सगळे घाबरत असतात, पहातो, त्याला कोणी बाधा करू शकत नसते कारण तो ऋषीच्या आशिर्वादाने सुरक्षित झालेला असतो. त्याच क्षणी तो एकदम अदृष्य होतो. तशा अदृष्य अवस्थेत तो भटकत रहातो. सांची त्यामुळें फार दुःखी होते. ती इंद्राच्या नांवाने शोक करू लागते. ती रात्रदेवतेला आळवते, "जर माझ्या पदरी कांहीं पुण्य असेल, जर मी देवांना प्रसाद दिले असतील, जर माझ्यात कांहीं पावित्र्य असेल तर माझी शुद्धता कोणी भ्रष्ट करू शकणार नाही. अशारितीने ती शोक करत असते. ती नंतर रात्रदेवीला पुन्हा आळवते कीं, माझी इच्छा पूर्ण हो. सांची तिच्या शुद्धतेच्या जोरावर अंतरज्ञानाच्या देवतेला हांका मारू लागते. अंतरज्ञानाच्या देवीला ती विचारते, "मला सांग, माझा इंद्र आता कोठे आहे? मला सगळे खरे समजले पाहिजे कारण माझ्याकडे फार कमी वेळ आहे".

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग तेरावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग चौदावा

सल्य पुढे सांगतो, अशाप्रकारे ती अंतरज्ञानाच्या देवीला विचारत असते. ती देवी तिच्या बाजूला उभी असते. तिला पाहून सांचीला आनंद होतो. ती त्या देवतेची पुजा करते. सांची तिला विचारते, "तू कोण आहेस"? देवी अंतरज्ञान तिला सांगते, मी ती देवी आहे जिला तू आळवत आहेस. तू पवित्र आहेस म्हणून मी तुला मदत करण्यासाठी आले आहे. माझ्या जवळ ये म्हणजे मी तुझ्यात शिरून तुला तुझा इंद्र कोठे आहे ते दाखवीन. त्यानंतर त्या दोघी निघतात. अंतरज्ञान देवता जात असते व तिच्या मागे मागे सांची जात असते. त्या दोघी स्वर्गातून बाहेर येतात, अनेक डोंगर पर्वत व नद्या ओलांडत त्या हिमालयाच्या उत्तरेकडील भागात पोहोचतात. तेथे एक समुद्र तिला दिसतो. त्याचा विस्तार अनेक योजने होता. त्या समुद्रात असलेल्या एका द्वीपात त्या जातात. त्या बेटावर अनेक झाडे असतात, त्यावर पक्षी फिरत असतात. त्यात असलेल्या सरोवरात सुंदर कमळं असतात. ती कमळं फार मोठी असतात. त्यांच्यावर मधमाशा गोंगावत असतात. त्या मोठ्या कमळांत एक फार मोठे कमळ असते ज्याचा देठ उंच वर आलेला असतो. त्या मोठ्या कमळात असलेल्या परागात इंद्र अडकलेला असतो. त्याला पहाताच ती सांची सुद्धा लहान आकार घेते व त्याला भेटण्यास जाते. तिच्या बरोबर अंतरज्ञान देवतासुद्धा सुक्ष्म आकार घेते व तेथे जाते. तेथे गेल्यावर सांची इंद्राला त्याच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगू लागते जेणे करून तो सावध होईल.

ते ऐकल्यावर इंद्र तीला विचारतो, "तू येथे कशाला आली आहेस? मला तू कसे शोधलेस"? सांची त्याला नहुषाच्या कारवाया सांगू लागते. ती सांगते कीं, त्यांने मला तुझ्याकडे जाण्यास सांगितले व तुझी परवानगी घेण्यासाठी कीं, मी त्याची पत्नी व्हावी म्हणून तू मान्यता देशिल. त्यासाठी त्यांने मला

कांहीं निश्चित समय दिला आहे. तर सांग आपण काय करावयाचे"? जर तू माझे संरक्षण करण्यात असमर्थ असशिल तर तो मला बळजबरीने त्याची बायको करण्याचे सांगत आहे. तुला नहुषाला ठार मारावे लागेल जर तू खरोखरच माझ्यावर प्रेम करत असशिल. तू स्वतःला पुन्हा आठव व माझे संरक्षण कर. सांची त्याला आव्हान देते.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग चौदावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग पंधरावा

सल्य सांगत असतो, ते सांचीचे ऐकल्यावर इंद्र तिला बोलतो, ही ताकद दाखवण्याची वेळ नाही. नहुष फार ताकदवान आहे. त्याला देवर्षींच्या तपोबळाची साथ आहे. त्याला त्या सगळयानी आग्रह करून तेथे बसवलेले आहे त्यामुळें तेसुद्धा आता बुचकळयात पडल्या सारखे झाले आहेत. मी तुला सांगतो त्यासाठी तू काय करावयाचे ते, ते नीट ऐक. मी सांगतो तसे तू केलेस कि, तुझी त्याच्या तावडीतून सुटका होईल. मी जे सांगतो ते करतांना कोणालाही कांहीं सांगू नकोस. सगळे गुप्तपणे झाले पाहिजे. तू नहुषाला एकांतात भेट व सांग कीं, तू त्याला स्वीकारायला तयार आहेस परंतु, त्यासाठी त्यांने त्याचे सामर्थ्य शाबीत केले पाहिजे. त्यासाठी तो अशा पालखीतून माझ्याकडे येईल जी ते देवर्षी वाहत असतील त्यांच्या खांद्यावरून. जर तसे तो करील तर तू त्याची होण्यास तयार आहेस असें त्याला सांग. सांची ते ऐकते व त्याप्रमाणे करण्याचे आश्र्वासन देते. नंतर ती नहुषाकडे जाते व त्याला तिची अट सांगते. तो तिला आश्र्वासन देतो कीं, तिची ती इच्छा तो केव्हांही पूर्ण करण्यास तयार आहे. ते ऐकल्यावर सांची त्याला बोलते, ते केल्यानंतर मी कांहीं काळ गेल्यावर तुझ्याशी लग्न करण्यास तयार आहे. ते ऐकून नहुष फार उत्तेजित होतो. तिचे सौंदर्य न्याहाळत रहातो. सांची त्याला पुन्हा सांगते, "आतापर्यंत कोणीही ऋषींना त्यांची पालखी न्यावयाला लावले नाही ते तू करून मला सिद्ध कर कीं, तू खरोखरच जगाचा धनी आहेस. विष्णू, रुद्र, असुर असें कोणीही ते आजवर करू शकलेले नाहीत ते तू करून माझ्यावरील प्रेम सिद्ध कर. स्वर्गातील उच्चतर ऋषीना ते करावयाला लाव म्हणजे मी तुझ्यावर विश्र्वास ठेवीन. केवळ एकदाच नाही तर नेहमीच तू सभेत किंवा माझ्याकडे येतांना तसा ऋषींनी वाहिलेल्या पालखीनेच येशिल. जर तू तसा एकाद्या दिवशी नाही आलास तर मी तुला माझे तोंड दाखवणार नाही. थोडक्यात काय कीं,तू त्यांना तुझे वाहक

करून ठेवशिल. जे ऋषी पालखी वाहतांना थकतील त्यांना तू लाथ मारशिल असें सगळे करून दाखव म्हणजे मी त्या इंद्राला साफ विसरून जाईन कारण तो इंद्र असें करू शकत नव्हता. ह्या एका परीक्षेने तू माझ्याकडे सिद्ध करशिल कीं, तू त्याच्यापेक्षां श्रेष्ठ आहेस. ते ऐकून नहुष तिला आश्वासन देतो कीं, तो ते सगळे करून दाखवेल व तिचे मन जिकून दाखवेल. त्या गुप्ततेत झालेल्या संभाषणानंतर सांची पुन्हा ब्रह्माकडे जाते.

सल्य पुढे सांगत असतो, त्या गुप्त संभाषणानंतर नहुष फार उत्तेजित झालेला असतो. त्याचा विवेक पुरता नष्ट झालेला असतो. तो सांचीला सांगतो, तिने ज्याप्रकारे ऋषींना वाहक करण्याचे सांगितले आहे तसे आधी कोणीही केले नसावे. ते उघड आहे कीं, जो देवर्षींना वाहक करतो त्याची श्रेष्ठता निर्विवाद सिद्ध होते. नहुषाला तिची योजना आवडते. नहुष विचार करतो कीं, त्यानेसुद्धा घोर तपस्या केली आहे. त्यामुळें तो कांहीं कमी नाही. तसे केल्याने मी सर्वकाळासाठी जगाचा राजा होऊन बसेन. त्यामुळें सांची मिळेलच त्याशिवाय सगळे जग मला घाबरून राहिल ते विशेष महत्वाचे होईल. सगळे जग माझ्याशिवाय अधूरे असेल. मी रागावले तर देव, राक्षस, गंधर्व, असुर, उरग, एकत्र आले तरी मला विरोध करू शकणार नाहीत. अशाप्रकारे विचार करत तो अविवेकी नहुष तिला सांगतो कीं, तो तिची इच्छा पूर्ण करील. मी सगळया सात ऋषींना बोलावून त्यांना माझी पालखी उचलण्यास आज्ञा करीन आणि जर त्यांनी ते नाही केले तर मी त्यांना लाथ मारीन असें तो मोठ्या दिमाखात तिला ऐकवतो.

सल्व पुढे सांगतो, ती गेल्यावर नहुष सगळया ऋषींना सांगतो कीं, ते त्याची पालखी उचलण्यास तयार होतील. तपस्येला बसलेल्या ऋषींना तो जबरदस्तीने उठवतो व त्या कामाला लावतो. त्यात कित्येक तपोनिधी ब्राह्मण होते. त्याचा माज अमर्याद झाला होता. ते संयमी ब्राह्मण बिनातक्रार त्याची

पालखी उचलण्याचा प्रयत्न करत असतात. ते ऋषी ओळखतात कीं अशांने हा नहुष फार काळ देवांचा राजा म्हणून राहू शकणार नाही.

सांची तेथून निघते व ब्रह्माकडे जाते. त्याला जे घडले ते सगळे सांगते. ते ऐकून बृहस्पती तिला सांगतो, तो नहुष ब्राह्मणांना पालखी उचलावयाला लावून त्याची स्वर्गात रहाण्याची क्षमता आधीच घालवून बसला आहे. तरी मी एक यज्ञ करतो ज्यामुळें तुझा पती आपण पुन्हा शोधू शकू. बृहस्पती तिला आश्र्वासन देतो कीं, तिने निर्धास्त रहावे.

त्याच्या त्या यज्ञात तो उत्तम सरपण वापरतो व अग्नीला आवाहन करतो कीं, त्याने इंद्राला शोधून काढावे. त्या बरोबर अग्नी एका स्त्रीचे रुप धारण करतो. त्या रुपात तो अदृष्य होतो. सर्व ठिकाणी शोध घेत असतो, वने, तळी, सरोवर, पहाड, पृथ्वी आणि आकाश असें सगळे तो शोधतो परंतु त्याला इंद्र कोठे सांपडत नाही. अग्नी परत बृहस्पतीकडे येतो व सांगतो की, "त्याला इंद्र कोठेही सांपडत नाही". बृहस्पती विचारतो, "समुद्रात पाहिलेस कां"? अग्नी सांगतो कीं, समुद्रात माझा अंत होईल त्यासाठी तेथे तो जाऊ शकत नाही. ते ऐकल्यावर प्रजापती त्याला बोलतो कीं, तू समुद्रात जाशिल त्यासाठी मी एक व्यवस्था करतो. ते ऐकल्यावर अग्नी त्याला बोलतो, "मी मला तुमच्या हाती सोपवत आहे, जे योग्य ते करावे". अग्नी त्यानंतर पाण्यातून बाहेर येतो जसें ब्राह्मणांतून क्षत्रिय उत्पन्न झाले. त्यावर ब्रह्म अग्नीला सांगतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग पंधरावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग सोळावा

बृहस्पती अग्नीची स्तुती करू लागतो, "अरे अग्नी तू देवांचे मुख आहेस. तू सगळया देवांसाठी आहुती स्वीकारत असतोस. तू सगळया जीवांच्या आंत असतोस व त्यांच्या अंतरमनाचा ठाव घेत असतोस. तू त्या जीवांच्या सगळया विचारांचा साक्षीदार असतोस. ऋषी तुला एकटा व त्याच वेळी तिहेरी असें मानतात. जर तू त्या यज्ञातील आहुत्या स्वीकारल्या नाहीस तर हे जग निष्प्रभ होईल इतका तू महत्वाचा आहेस. सगळे ब्राह्मण तुझ्यापुढे झुकतात. त्यामुळें त्यांना व त्यांच्या परिवाराला उच्च गती प्राप्त होते. तुझ्या शिवाय देवांचे काम पूर्ण होऊ शकत नाही. सर्व यज्ञांत तुझीच सर्वप्रथम पुजा होत असते. तुलाच आहुत्या दिल्या जातात. जेव्हा विश्वाचा अंत समय येतो तेव्हां तूंच हे जग भस्मसात करत असतोस. ह्या सृष्टीची सुरूवात व अंत तुझ्याकडूनच होत असतो इतके तुझे महत्व आहे. सगळे पाणी तुझ्यातून उत्पन्न होत असते. म्हणून तू पाण्यात बिनधास्तपणे जा. असें ब्रह्मदेव त्याला सांगतात. ऋग्वेदातील गाणी गाऊन मी तुला शक्ती मिळवून देईन. अशारितीने स्तुती झाल्यामुळें अग्नी पाण्यात जाण्यास तयार होतो. मी तुम्हाला इंद्राचे दर्शन देईन असे अग्नी त्यांना सांगतो.

सल्य पुढे सांगतो, त्यानंतर अग्नी सगळया प्रकारच्या पाण्यात घुसतो. समुद्र, तलाव, सरोवरं नद्या अशा सगळया प्रकारच्या पाण्यात तो जातो व इंद्राचा शोध घेऊ लागतो. त्या पाण्यात असलेल्या कमळांत जे पराग असतात त्या परागात इंद्र अडकून पडलेला तो पहातो. ते पाहिल्यावर अग्नी त्वरित पाण्याबाहेर येतो व बृहस्पतीला जाऊन सांगतो कीं, इंद्र कमळाच्या परागात अडकलेला आहे. अतिशय लहान आकार घेऊन तो तेथे लपून बसलेला आहे. बृहस्पती संत आणि ऋषींना घेऊन त्या जागी जातात. त्या तेथे गेल्यावर ते

सगळे इंद्राची स्तुती करू लागतात. त्याला त्याच्या पूर्वीच्या कर्तबगारीची आठवण करून देतात. त्यांने मारलेल्या राक्षसांच्या गोष्टी ते त्याला सांगून त्याचा उत्साह वाढवण्याचे काम करतात. त्याने केलेल्या शंभर यज्ञांची त्याला आठवण करून देतात. त्याला सांगतातकीं, त्याने पहावे कीं, त्याला भेटण्यासाठी किती देव आलेले आहेत. उठ राजा उठ, असें त्याला ते सगळे बोलतात. सगळे जग तुझी आठवण करत आहे असें ते त्याला सांगतात. तुझ्या सारखा समर्थ दुसरा कोणी नाही असें ते त्याला बोलतात. त्या स्तुतीमुळें इंद्राचा आकार सावकासपणे वाढू लागतो. यथावकाश तो त्याचा मूळ आकार धारण करतो. त्यानंतर तो रागांने त्या ऋषींना बोलतो तुमच्यासाठी मी ह्या अवस्थेत गेलो आहे. आता तुम्हाला आणखीन काय पाहिजे? मी त्वश्त्रीच्या मुलाला मारले तुमच्यासाठी, वृत्राला मारले तुमच्यासाठी मी आणखीन काय करावे तुमच्यासाठी ते सांगा. बृहस्पती त्याला शांत होण्यास सांगतात. त्यानंतर ते सांगतात कीं, नहुष जो त्याच्या जागी बसला आहे त्याची सांचीवर वाईट नजर आहे व जर तू त्याला नाही मारलेस तर तो तुझी बायको ताब्यात घेईल. त्याने आधीच्या काळात जे तप केले आहे त्यामुळें त्याची क्षमता फार वाढलेली आहे. त्यामुळें त्याचा फार त्रास सगळयांना होत आहे. त्याला कोणी संताने अशी ताकद दिली आहे कीं त्याला कोणी कांहीं करू शकत नाही. इंद्र त्यांना विचारतो अशी कोणती तपस्या त्याने केली कीं, देव त्याला घाबरू लागले ते मला सांगा. वृत्राच्या वधानंतर तू अचानकपणे गायब झाला होतास त्यामुळें जगाच्या कारभारासाठी देवांनी व ऋषींनी नहुषाला तुझ्या जागी नेमले. ते त्याच्या डोक्यात गेले आहे. आता तो तुझी सांची मागत आहे. तिला त्याच्याकडे जावयाचे नाही. प्रथम तो तयार नव्हता तेव्हा देवांनी व ऋषींनी त्याला आश्र्वासन दिले कीं, ते त्याची ताकद वाढवतील. त्याप्रमाणे तो तुझ्या जागी बसण्यास तयार झाला. आता तो सगळयांना भारी जात आहे. त्यांने ऋषींना त्याची पालखी उचलावयास सांगितली आहे. त्याच्या नजरेतून विष वहात

असते अशी त्याची नजर झाली आहे. देवसुद्धा त्याच्याकडे पहाण्यास घाबरतात.

सल्य पुढे सांगतो, अंगिरसाची वंशज त्याच्याशी बोलत होता. त्याचवेळी तेथे कुबेर आला. आणि यमसुद्धा आले. त्यांच्या बरोबर सुर्य आणि चंद्रसुद्धा तेथे पोहोचले. सगळे लोकपाल इंद्राला सांगतात कीं, त्याने परत यावे. त्याना काळजी वाटत होती किं, वृत्राने कांही केले काय पण त्याला सुस्थितीत पाहून ते सगळे आनंदीत झाले. त्यांच्या त्या सभेत नहुषाचे काय व कसे करावयाचे त्यावर खलबत होते. ते इंद्राला सांगतात, कीं,जर त्याने नहुषाला उचवले तर त्यांचा यज्ञातील हिस्सा जो तो खातो तो आम्हाला आमचा मिळू लागेल. इंद्र त्यासाठी तयार होतो. ते सगळे लोकपाल ठरवतात कीं, ते एकत्रपणे त्या नहुषाचा काटा काढणार. इंद्र अग्नीला सांगतो, तू मला शोधून काढले आहेस म्हणून माझ्या वाट्यात तुझा हिस्सा मी ठेवणार आहे.

सल्य पुढे सांगतो, त्यानंतर इंद्र कुबेराचा हक्क वास्तविक संपत्तीवरील मान्य करतो, त्याचा यक्षावरील अधिकारसुद्धा तो मान्य करतो, यमाचे मृत्यूवरील व पितरांवरील हक्क तो मान्य करतो, आणि वरुणाचा पाण्यावरील हक्क तो मान्य करतो. अशारितीने सगळे लोकपाल आपापल्या अधिकारात पुन्हा बसतात.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग सोळावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग सतरावा

सल्य पुढे सांगतो, इंद्र व इतर मोठे देव नहुषाचे पारिपत्य कसे करावयाचे त्यावर खल करत असतांना तेथे तेजस्वी आदपणीय ऋषी अगस्त्य हजर होतात. अगस्त्य ऋषी इंद्राचे अभिनंदन करतात व विचारतात, "वृत्राच्या वधानंतर तू काय करत आहेस? तुझ्या जागी तो नहुष कसा ठेवला गेला? तो त्याच्या उद्धटपणामुळें त्या आसनावरून खाली पृथ्वीवर फेकला गेला आहे? हे काय होत आहे स्वर्गामध्ये"?

त्यावर इंद्र त्यांना विचारतो, "ऋषी महोदय, आपला प्रवास कसा काय चालला आहे? आपल्याला पाहून मला संतोष झाला आहे. मी आपल्याला पाय धुण्यासाठी पाणी देत आहे. ते स्वीकारावे. त्याच प्रमाणे मी अर्घ्य आणि एक गाय आपल्याला खाण्यासाठी देत आहे. तीसुद्धा स्वीकारावी". सल्य पुढे सांगतो, अगस्त्याचे यथास्थित स्वागत झाल्यानंतर इंद्र त्यांना बसण्यासाठी आसन देतो. त्यांचे क्षेमकुशल विचारत असतो. त्यानंतर कुतूहलाने प्रेरीत झालेला इंद्र अगस्त्य ऋषींना विचारतो कीं, त्या नहुषाचे उच्चाटन कसे झाले ते सांगा. अगस्त्य सांगू लागतात. ऐक इंद्रा त्या नालायक नहुषाचे तुझ्या गादीवरून कसे मी उच्चाटन केले. नहुष त्याच्या मस्तीत ऋषीवर्गाशी अमर्यादा करू लागला होता. पवित्र ब्राह्मण आणि संत ह्यांची अवहेलना करत असें तो त्यांना त्याची जडभारी पालखी उचलावयास जबरदस्ती करत असें. ते त्याची पालखी वाहत असतांना ते ब्राह्मण त्याला विचारतात, "वेदातील साम, जे गाई धुतांना गावयाचे असतात, गाईले जातात ते रास्त आहेत कां"? नहुष त्याच्या तामसी मस्तीत सांगतो कीं, ते अयोग्य आहेत. ते ऐकल्यावर त्याची पालखी

वाहणारे ब्राह्मण त्याला बोलतात कीं, असें बोलून आपण चांगुलपणाचा अपमान करत आहात. मोठे तपस्वी सांगत आहेत कीं, ते योग्य आहेत असें असतांना आपण त्यांना अयोग्य कसे ठरवता? ते ऐकल्यावर तो मला रागाने लाथ मारतो, जेव्हां ते सांची पहात असते, कदाचित त्याला दाखवावयाचे होते सांचीला कीं तो मलासुद्धा लाथ मारू शकतो. मला लाथ मारल्याबरोबर त्याची स्वर्गात रहाण्याची सद्द संपते. तो पृथ्वीवर फेकला जातो. त्या बरोबर त्याला त्याची चूक समजते व तो घाबरून जातो. मी त्याला त्याप्रसंगी शाप देतो, कारण तू वेदातील ऋचांचा अपमान करत आहेस, तसेंच ह्या पवित्र ब्राह्मणांना जनावराचे काम करण्यास भाग पाडत आहेस आणि माझ्या डोक्याला लाथ मारत आहेस तू पुढची दहा हजार वर्षे एक मोठा अजगर बनून पृथ्वीवर भटकत रहाशिल. त्या नंतर तू पुन्हा स्वर्गात येशिल. असें बोलून अगस्त्य इंद्राचे अभिनंदन करतात कीं, तो आता पुन्हा त्याच्या आसनावर जाऊन बसू शकतो.

सल्य पुढे सांगतो, इंद्र परत आल्यामुळें सगळे देव आणि ऋषीवर खूप आनंदी होतात. त्याच प्रमाणे पितर, यक्ष, उरग, राक्षस, गंधर्व आणि अप्सरा आनंदाने जल्लोष करतात. तेथे पर्वत, नद्या, समुद्र असें सगळे समाधान व्यक्त करतात. त्यांतीव देवता इंद्राचे त्याच्या स्थानावर स्वागत करतात. बुद्धीमान अगस्त्यांनी नहुषाचे पारिपत्य केले म्हणून सगळे त्यांचेसुद्धा अभिनंदन करतात.

[ह्या अजगर रुपातील नहुषाची मुक्तता युधिष्ठीर व भिम करतात ते आपण मागे पाहिले आहे]

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग सतरावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग अठरावा

सल्य पुढे सांगत असतो, त्यानंतर इंद्र त्याच्या वाहनावर, ऐरावतावर बसून व त्याचे भाट असलेले गंधर्व आणि अप्सरा त्याच्या भोवती गात नृत्य करत असें मिरवणूकींने त्याच्या स्थानी येतात. त्याच्या बरोबर इतर लोकपाल कुबेर, यम, वरुण असतात. तो तसा त्याच्या अर्धांगिनीला, सांचीला भेटण्यास जातो. त्यानंतर पुन्हा त्याचे जगाला सांभाळण्याचे काम तो पूर्ववतपणे सुरू करतो.

इंद्राच्या सभेत संत अगिरस येतात. इंद्र त्याची पुजा अथर्ववेदातील कवनं गाऊन करतात. त्यानंतर इंद्र अंगिरसांचा सन्मान करण्यासाठी त्याला अथर्वंगिरस असे नांव देतात. त्यानंतर तो बोलतो कीं ह्यापुढे अथर्ववेद तुमच्या नांवांने ओळखतील. त्या वेदाच्या यज्ञातील हिस्सा तुला मिळेल. त्यानंतर तो साधू निघून जातो. त्यानंतर तेथे असलेल्या सगळया साधूसंतांचा तो सन्मान करतो. त्यानंतर तो नित्यनेमाने त्याचे काम करू लागतो. असारितीने तो त्याच्या अरिष्टाचा काळ त्याच्या पत्नीबरोबर काढतो. त्याच्या शत्रूला मारण्यासाठी इंद्रालासुद्धा अज्ञातवासात रहावे लागले होते. असें सल्व युधिष्ठीराला समजावतो. त्या प्रमाणे तुम्ही व तुमची पत्नी असें सगळे अरिष्टाला तोंड देत आहात. ज्याप्रमाणें इंद्रालात्याचे राज्य मिळाले त्याचप्रमाणें तुम्हालासुद्धा तुमचे राज्य मिळेल. ज्याप्रमाणें नहुष अनेक वर्षासाठी गर्तेत फेकला गेला त्याप्रमाणें कर्ण आणि दुर्योधनसुद्धा नष्ट होतील. त्यानंतर तुम्ही पांडव पृथ्वीचे राज्य उपभोगणार आहात. इंद्राची हि कथा मी तुला सांगितली कारण ती ऐकण्यांने युद्धावर निघालेला राजा विजयी होतो.

लवकरच मोठे मोठे क्षत्रिय दुर्योधनाच्या अविचारामुळें नाहक मारले जाणार आहेत. त्यात भीम आणि अर्जुन भाग घेणार आहेत. ही इंद्राची कथा

एकण्याने पापक्षालन होते म्हणून ती कथा सगळयांनी ऐकावी. त्याला त्याच्या वैऱ्याची भिती रहात नाही. मृत्यूनंतर तो स्वर्गात जातो. तिनही जगातील सुखं त्याला मिळतात. त्याच्याव कोणतेही संकट येत नाही व तो दीर्घायुष्य अनुभवतो. तो अजिंक्य होतो.

वैशंपायन पुढे सांगतात, सल्वाची कथा ऐकल्यावर समाधान पावलेला पांडव त्यांचा यथोचित सन्मान करतो. ती कथा ऐकल्यावर युधिष्ठीर मद्रदेशाच्या राजाला, सल्वाला, आठवण करून देतो कीं, तो कर्णाचे सारथ्य करील जसे ठरले आहे. ते करत असतांना तू त्याच्यापुढे अर्जुनाची स्तुती करत रहावे त्यामुळें कर्णाचे चित्त विचलित होईल व तो चापल्याने युद्ध करू शकणार नाही. सल्व बोलतो, "तसेंच होईल कांहीं चिंता करू नकोस. त्याशिवाय इतर कांहीं करावयाचे असेल तर सुद्धा सांग".

तसे बोलून तो देखणा शूरयोद्धा कौरवांच्या तळाकडे त्याचे सैन्य घेऊन निघतो.

अशा रितीने सैन्योद्योग पर्व भाग अठरावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग एकोणीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, युयुधन सतवत घराण्याचा राजा युधिष्ठीराला भेटतो. त्याचे मोठे पायदळ, घोडदळ असें सैन्य असते. त्याबरोबर हत्तीदळ आणि रथ असतात. त्याच्या सैन्यात असलेले सैनिक विविध देशातील होते. त्यांच्या शौर्यासाठी ते ख्यातनाम होते. त्यातील सैनिक देखणे होते. त्यामुळें पांडवांची सेना देखणी दिसू लागली. त्यांच्याकडे कुऱ्हाडी, भाले, अग्नीबाण, तलवारी, सोटे, साखळया, दांडपट्टे, धनुष्यबाण अशी आयुध होती. ते सैन्य त्यांच्या गणवेषाने चमकत होते. सैनिकांचे मनोबळ चांगले होते. त्याचे सैन्य कांहीं अक्षौहिणी होते. ते सैन्य पांडवांच्या सैन्यात मिसळून गेले. त्याच प्रमाणें छेड्डीचा राजा धृष्टकेतु पंडुला भेटतो. त्याच प्रमाणें मगध देशाचा राजा जयत्सेन त्याचे एक अक्षौहिणी सैन्य आणतो. पांड्य राजा ज्याचे राज्य समुद्रकिनारी होते तो सुद्धा त्याचे सैन्य घेऊन येतो. त्या सैन्याचा रुबाब कांहीं वेगळाच होता. त्या बरोबर द्रुपद राजाचे सैन्य सामील होते. त्याच्या सैन्यातील योद्धे विविध देशांतून आलेले होते. त्यांबरोबर त्याचा सामर्थ्यवान मुलगा दृष्टद्युम्न होता. विरट राजा त्याचे सैन्य घेऊन आलेला असतो. त्याच्या सैन्यात पहाडी इलाख्यातील योद्धे होते. अशाप्रकारे पांडवांचे सात अक्षौहिणी सैन्य तयार होते. त्यांचे विविध झेंडे फडफडत होते. त्याशिवाय बाजारबुणगे त्यांचा धंदा करत होते त्यामुळें त्या परिसरात मोठ्या प्रमाणात हालचाल होत होती. ते सगळे योद्धे कौरवांशी लढण्यासाठी उत्सुक होते. त्यांच्यामुळें पांडवांचा उत्साह वाढला होता. त्याप्रमाणे भागादत्त कौरवांना त्याचे अक्षौहिणी सैन्य देतो. त्याच्या सैन्यात चीनी व किराट सैनिक होते. भुरिश्रव, सल्य दुर्योधनाला त्यांच्या सैन्यानिशी मिळतात. त्यानंतर हृदिकाचा मुलगा कृतवर्मन त्याच्या बरोबर भोज, अंधक आणि कुरुस कौरवांना मिळतात. त्या सेनिकांच्या गळयात फुलांच्या माळा होत्या. त्यांच्या अंगावरील रंगीबेरंगी कपड्यामुळें ते सुशोभित

दिसत होते. त्यांच्या सैन्यातील हत्तींच्या धावण्यामुळें धरणी थरथरत होती. जयद्रथ सिंधू सौराष्ट्रचे एक अक्षौहिणी सैन्य घेऊन येतात कौरवांकडे. सुदक्षण कंबोजचा राजा त्याच्या यवन आणि शक सैनिकांसह आलेला असतो. त्यांचे अक्षौहीणी सैन्य असते. ते सैन्य कौरवांच्या अफाट सैन्यात मिसळून जाते. राजा नील दक्षिणेकडून त्याचे सैन्य एक अक्षौहिणी त्यांच्या विषिष्ट आयुधांसह येऊन कौरवांना मिळतात. केकया घराण्याचे पांच शूरवीर भाऊ कौरवांना सामील होतात. अशारितीने कौरवांकडे पांडवाशी लढण्यासाठी अकरा अक्षौहिणी लष्कर तयार होते. त्याच्या तळावरसुद्धा त्यांचे विविध झेंडे फडकत होते. वातावरण युद्धाचे तयार होत होते. त्या सगळया पाहुण्यांमुळें हस्तिनापुरात उभे रहाण्यास जागा नव्हती. ते जमलेले सैन्य पाहून दुर्योधन फार समाधानी वाटत होता. सगळे कुरुजंगल व रोहीतकाचे वन गजबजून गेले होते. त्याशिवाय अहिचत्र, कलकुट, गंगेचे किनारे, वरण देश, वटधन, त्या भोवतीचे डोंगरी इलाखे जेथे धान्य मोठ्या प्रमाणात पिकवले जाते तो सगळा प्रदेश कौरवांच्या दोस्तांच्या सैनिकांनी भरला होता. ते सगळे अजस्र सैनिक संभार द्रुपदाने पाठवलेला धूर्त ब्राह्मण पहातो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग एकोणीसावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग विसावा

वैशंपायन सांगत असतात, द्रुपदाचा पुरोहित कौरवांना भेटतो. त्याचे स्वागत धृतराष्ट्र करतो. त्याशिवाय भिष्म, विदूर सुद्धा त्याचे चांगले स्वागत करतात. तो ब्राह्मण त्यांना पांडवांचे कुशल सांगतो. त्यानंतर कौरवाच्या भल्यासाठी प्रार्थना करतो. त्यानंतर तो तेथे असलेल्या कौरवांच्या सगळया दोस्तांपुढे असें सांगतो कीं, "आपण सगळे जाणता खऱ्या क्षत्रियाचे कार्य काय असते. तरीसुद्धा मी त्यांची माहीती पुन्हा सांगणार आहे कारण त्यांशी माझ्या येण्याचा संबंध आहे. आपण जाणता कीं, धृतराष्ट्र आणि पंडु हे दोघे एकाच पित्याची मुलं आहेत. त्यामुळें त्यांच्या वडीलांच्या मालमत्तेत त्यांचा हिस्सा समान असला पाहिजे. धृतराष्ट्राच्या मुलांना त्यांचा हिस्सा मिळाला आहे. पंडुच्या मुलांना त्यांचा हिस्सा का नाकारला जात आहे. आपण सगळे जाणता कीं, पंडुच्या मुलांची वारसाहक्काची मालमत्ता युद्धा कौरवांनी हडपली आहे. लहानपणापासून पांडवांच्या विनाशाच्या अनेक योजना दुर्योधनाने अजमावून पाहिल्या होत्या पम त्यात तो यशस्वी झाला नाही. कारण त्यांच्या आयुष्याची दोरी फार मजबूत आहे. म्हणून पंडुची मुलं यमाकडे ते पाठवू शकले नाहीत. त्यानंतर ते पवित्र पांच भाऊ त्यांचे राज्य तयार करतात व राजसूय यज्ञ करतात त्यांना प्रेमाचे नाटक करून तुम्ही द्युताच्या डावात फसवले व तेरा वर्ष वनवासात पाठवले. त्या निबिड अरण्यात ते त्यांच्या एकुलत्या एक पत्नीसह कसे रहात होते त्याची आपण नुसती कल्पनासुद्धा करू शकणार नाही. धृतराष्ट्र ते सगळे थांबवू शकला असता परंतु, तो त्याच्या लाडक्या मुलाच्या आग्रहाकरता ते करत नाही. त्याशिवाय त्या राजसभेत पांडवांचा व विशेष म्हणजे त्यांच्या पत्नीचा जी एका राजाची कन्यासुद्धा आहे, कारण नसतांना नको तसा अपमान केला गेला. ते जरी शूरयोद्धे होते त्यानी नैतिक मुल्याप्रमाणें आपल्या काकाच्या आदेशांचे पालन करणे श्रेयस्कर समजून ते सगळे सहन केले

जे त्यांना सहन करण्याची गरज नव्हती जर ते तितके नितीमान नसते. त्यांच्या त्या व्रतस्थेचा किती भयंकर प्रकारे गैरफायदा उठवला गेला ते येथे जमलेले सगळे जाणतात, म्हणून त्यावर मला वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता वाटत नाही. त्यानंतर पुन्हा त्यांना त्याच नैतिक बंधनाचा गैरफायदा घेऊन बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास असें भोगावे लागले. त्या अज्ञातवासाच्या काळात ते राजा विराटाकडे गुप्तरुपात एक वर्ष राहिले. त्या सगळया अवघड काळात त्यांची पतिव्रता पत्नी त्यांना साथ देत असल्यामुळे ते सगळे भोगत होती जसे एक पतिव्रता करते. त्यांना असे दुःख भोगावे लागले जसे पुष्कळ पाप केलेल्या एकाद्याला भोगावे लागते. अशारितीने सगळे सोसावे लागले तरी काकांला माफ करून ते सज्जन पांडव शांततामय समझौता करू इच्छित आहेत व त्या प्रित्यर्थ मी आपल्याकडे त्यांचा वकील म्हणून आलो आहे. आपण पांडवांचे आणि कौरवांचे असे दोघांचे वागणे पहावे. पांडवांना त्यांच्या न्याय्यहक्कासाठी युद्ध करण्याची खरोखरच इच्छा नाही. त्यांना फक्त न्याय हवा आहे. जर दुर्योधन युद्धाच्या गोष्टी करू इच्छित असेल तर ते योग्य होणार नाही. कारण त्यामुळे ख्यातनाम कुरुवंशाची बदनामी व कदाचित नाश सुद्धा होऊ शकतो. मी पाहून आलो आहे कीं, कौरवांची युद्धाची तयारी होत आहे. मला येत असतांना ते सगळे जमलेले योद्धे दिसत होते त्यांची संख्या कदाचित कांहीं अक्षौहिणी असू शकेल. आपण जाणता आहात कीं, पांडवांकडेसुद्धा मोठे शौर्य आहे जे कांहीं अक्षौहिणी सैन्या इतके असू शकते. त्यात सत्यकी, भिम व अर्जुन आणि त्यांचे दोन धाकटे बंधू आहेत. मला समजते कीं, कौरवांकडे अकरान अक्षौहिणी सैन्य आहे परंतु, पांडवांकडे त्यांच्या दोस्तांचे व स्वतःचे असें सात अक्षौहिणी सैन्य आहे त्याशिवाय अनेक योद्ध्यांच्या बरोबरीचा असा एकटा धनंजय आहे. त्याबरोबर वासुदेव त्यांना मिळाला आहे. हे सगळे पहाता असें युद्ध जर झाले तप कोणाची जीत होणार हे उघड आहे. म्हणून मी आपल्याला विनंती करतो कीं, युद्धाच्या भानगडी करण्यापेक्षा त्यांना त्यांचा न्याय्य हक्क देऊन टाका व हा वाद संपवावा.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग विसावा संपला.

# सैन्योद्योग पर्व

## भाग एकविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्या विद्वान ब्राह्मणाचे बोलणे शांतपणे ऐकल्यावर कौरवांच्या बाजूने असलेले भिष्म जे सगळयात ज्येष्ठ सुद्धा होते ते त्यांचे अभिनंदन करतात कीं ते असा चांगला प्रस्ताव घेऊन आले आहेत. ते त्यावेळी त्या प्रसंगानुरूप पुढे सांगतात, "आम्हाला संतोष आहे कीं, पांडव खुषाल आहेत. एवढ्या त्रासांतून ते त्यांच्या पत्नीसह सहिसलामत वाचले, त्याबद्दल मला व्यक्तिशः फार आनंद झाला आहे. त्याशिवाय मी ऐकतो कीं त्यांना मोठे दोस्त राजे मिळत आहेत. तरीसुद्धा ते शांततामय समझौता करत आहेत हे त्यांच्या सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. आपण जे बोललात ते सगळे खरे आहे. परंतु, आपली भाषा फार तीखट होती. कदाचित आपण ब्राह्मण आहात म्हणून तशी भाषा आपण वापरली आहे. पंडुच्या मुलांचा येथे व अरण्यात फार छळ झाला हे मी मान्य करतो. तुम्ही म्हणता ते बरोबर आहे कीं, न्यायाने त्यांना त्यांचा वारसा हक्क मिळाला पाहिजे. त्यांच्यांतील अर्जुन सगळया युद्धकलांत प्रवीण झाला आहे. आणि तो एक महान योद्धा शाबीत झाला आहे. इंद्रसुद्धा त्याच्यापुढे फारकाळ टिकू शकणार नाही. इतरांचा उल्लेखसुद्धा करू नये". असें कौतुकाचे भिष्म बोलत असतांना कर्णाला राग येतो. तो मध्येच बोलतो उद्धटा सारखा, "अहो ब्राह्मण, आपण जे बोलत आहात ते सगळयांना आधीपासून माहीत आहे. ते येथे येऊन पुन्हा पुन्हा सांगण्यात काय अर्थ आहे? द्युतात हरल्यानंतर तो युधिष्ठीर व त्याचे भाऊ ठरलेल्या अटीनुसार वनवासात व नंतर अज्ञातवासात गेले होते. आता तो उलटावयाला मागत आहे. त्यांना मत्स्य व पांचाल राज्यांकडून पाठबळ मिळत आहे. म्हणून त्याला त्याची पुर्वापार मालमत्ता परत पाहिजे आहे असे दिसते. परंतु, आता दुर्योधन एक पाउल ठेवण्याइतकीही जमीन त्यांना देण्यास बाधलेला नाही. परंतु, न्यायासाठी तो सगळी पृथ्वी देण्यास तयार आहे. त्यांनी पुनः वनवासात जाऊन

रहावे न नंतर ठरलेला काळ संपल्यावर दुर्योधनाचे चाकर म्हणून ते परत येऊन राहू शकतात. त्यांना जर ते मान्य नसेल व ते युद्ध करू इच्छित असतील तर त्यांना माझे हे शब्द आठवतील अशी परिस्थिती ते पहातील".

भिष्म कर्णाला अडवतात व बोलतात, "तू हे असे  कशाला बोलत आहेस? अरे राधासुता, तू विसरला आहेस कां, जेव्हां एका हाती अर्जुनाने आपल्या सगळया कौरव सैन्याला बाद केले होते व तुझे आणि द्रोणाचार्य व कृपांचे सगळे कपडे काढून घेतले होते. असा उताविळ होऊ नकोस. आपण जर ह्या वकीलाचे ऐकले नाही तर जे युद्ध होईल त्यात आपण सगळे ठार मारले जाणार आहोत हे तुझ्या कसे लक्षात येत नाही. तुझा तुझ्या धनुर्विद्येवर फार विश्र्वास आहे म्हणून तू पुन्हा पुन्हा अर्जुनाला आव्हान देत असतोस व प्रत्येक वेळी मार खात असतोस".

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र भिष्माला शांत करतात व कर्णाला दम भरतात कीं, तो मध्येच बोलणार नाही. तो अंधराजा बोलतो, "आता जे शंतनुचे पुत्र आपल्या सगळयांना बोलले ते आम्हा सर्वांना उपयोगाचेच असें होते. त्यांचे बोलणे आपल्या प्रमाणे पांडवाना आणि सगळया जगाला मार्गदर्शक असेंच होते. मी सगळयांशी चर्चा करून त्यानंतर जे ठ्रेल ते पांडवांना सांगण्यासाठी माझा प्रतिनिधी संजय ह्याला पांडवांकडे पाठवीन". असें बोलून तो धृतराष्ट्र त्या वृद्ध ब्राह्मणाला सांगतो कीं, त्याने जास्त वेळ येथे थांबण्याची आवश्यकता नाही. त्याने त्वरित परत पांडवांकडे जावे.

त्यानंतर धृतराष्ट्र संजयाला सभेत बोलावतो व सांगतो.

अशारितीने सैन्योद्योग पर्व भाग एकविसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व

## भाग बाविसावा

धृतराष्ट्र संजयाला बोलतो, "अरे संजया, आपले पांडव उपप्लव्य मध्ये आहेत. तेथे त्यांना जाऊन भेट व त्यांची चौकशी कर. तू अजातशत्रूचे अभिनंदन मी सांगतो त्याप्रमाणे करशिल. त्याना प्रथम अभिनंदन कर कीं, ते अज्ञातवासातून सहिसलामत बाहेर आले. आपल्याला जो त्रास झाला तो त्यानी भोगणे हे एक फार वाईट झाले. त्यांची फसवणूक झाली असें असले तरी ते त्याची चांगुलपणाची वृत्ती सोडायला तयार नाहीत हे मोठे कौतुकास्पद आहे. त्याना सांग कीं, त्यांच्या काकांने कधी त्यांच्याकडून छल कपट झाल्याचे पाहिलेले नाही. त्यांची जी संपत्ती हडप केली गेली ती त्यांच्या मेहनतीची होती हे सगळे जग जाणून आहे. युधिष्ठीर माझ्या शब्दाखातर द्युत खेळला हे मी जाणून आहे. त्यांच्या वर्तणूकीचे जेव्हां मी निरीक्षण करतो मला एकही दोष त्यांच्यात आढळत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांचे वागणे हित आणि पुण्य ह्या दृष्टीने निर्दोष असें आढळते. त्यांच्यात वासनिकता, भोगीवृत्ती, आळस, बेजबाबदारपणा आणि निद्रासक्ती मला कधी आढळली नाही. त्यांचे सगळे जीवन पुण्य आणि चांगुलपणा ह्याला वाहिलेले असें आहे. त्यांनी नेहमी सगळयांना आनंद दिला आहे. ते सच्ची मैत्री करण्याच्या योग्यतेचे आहेत हे मी मान्य करतो. त्याने जी दानं केली व लोकांचे आदरतीथ्य केले ते विलक्षण अवर्णनीय असें होते. साऱ्या अजमिदा घराण्यातील सगळे नातेवाईक त्यांचे चाहते आहेत. एक दुर्योधन, माझा करंटा मुलगा, सोडला तर इतर सगळे त्यांच्यावर प्रेम करतात ज्यात मी आणि माझी गांधारीसुद्धा आहेत. त्याला पुन्हा पुन्हा पांडवांच्या विरुद्ध भडकवणारा त्याचा मित्र कर्ण फक्त कुंतीच्या मुलांचा द्वेष करत आहेत. पांडवांचे नैतिकबळ त्यामुळें वाढत आहे ते ह्या दोघांना समजत नाही. लहानपणापासून लाडात वाढल्यामुळें दुर्योधनाची सारासार बुद्धी विकसित झालेली नाही. त्याला वाटते कीं, तो अशा मार्गाने

पांडवांचा नाश करू शकेल. म्हणून युधिष्ठीराला व त्याच्या भावंडांना त्यांचा न्याय्य वाटा देणे हेंच योग्य आहे असे माझे मत आहे. त्यासाठी त्यांना युद्ध करावयाला लावून कौरव कांही साध्य करू शकणार नाहीत असें माझे मत आहे. युधिष्ठीराचे चार बंधू तसे सहजासहजी हार मानणारे नाहीत व त्यांना कोणीही चाकर करू शकणार नाही जसे तो मूर्ख राधेय समजतो. पांडवांच्या भावंडांबरोबर कृष्ण आहे, त्याशिवाय सत्यकी, श्रींजय वंशाचे योद्धे आहेत. एकटा अर्जुन कौरवांना भारी पडेल हे सगळयांना माहीत आहे पण विवेकाचा नाश झालेला असल्यामुळें ह्या गोष्टी माझ्या दुर्योधनाला समजत नाहीत. त्याशिवाय कृष्ण त्याच्या दैवी शक्तीमुळें पांडवांसाठी कौरव सेनेचा नाश सहज करू शकतो ते मी जाणून आहे. अशा सामर्थ्यवान लोकांशी, जे चांगुलपणाचे आदर्श आहेत, विनाकारण वैर करणे कोणत्याही नैतिक तत्त्वात बसत नाही हे सुद्धा मी जाणतो. एकटा धनंजय त्याच्या गांडीवाने त्या न संपणाऱ्या भात्यातील बाण फेकू लागल्यानंतर त्यापुढे कोणता वीर उभा राही शकतो"?

राजसूय यज्ञाच्या निमित्ताने तो सगळा उत्तर भाग जिंकून अगणित संपत्ती मिळवणाऱ्या किर्तीबरोबर लडण्याच्या गोष्टी करणे हे एक मूर्कपणाचे लक्षण आहे हे त्या राधेयाला समजत नाही व त्याच्या भडकवण्याने दुर्योधनसुद्धा तशा विचारात अडकलेला आहे. अर्जुन एकटा सगळया सैन्याशी लढू शकतो त्याच्या दैवी आयुधांच्या मदतीने जी कोणत्याही कौरवांच्या दोस्तांकडे नाहीत. हे मी जाणून आहे. जेव्हां खांडव वन अर्जुनानी कृष्णाच्या मदतीने अग्नीला खाऊ घातले तेव्हां सगळया देवांनी अग्नीसह, त्याची पुजा केली होती ते मी विसरू शकत नाही. गदायुद्धात सगळया योद्ध्यात भिम श्रेष्ठ आहे त्याच्याबरोबर माझा दुर्योधन सुद्धा टिकाव धरू शकणार नाही हे मी ओळखून आहे. भिमाच्या शक्तिचे काय वर्णावे. त्याने आधी कित्येक राक्षसांना लिलया ठार मारले आहे हे दुर्योधन लक्षात घेत नाही. हे आमचे दुर्दैव आहे. जर भिम रागावला तर त्या क्रोधाच्या आवेगात तो मलासुद्धा खाऊन टाकू शकतो.

माद्रीचे दोघे कोणाही शत्रूला जीवंत सोडणार नाहीत हेसुद्धा दुर्योधन ओळखतो तरी त्याची पांडवांशी वैर करण्याची हौस कमी होत नाही. मला माहीत आहे कीं, माझे सज्ज सैन्य पांडवांच्या पुढे कुचकामी आहे हे मी जाणतो. त्याशिवाय पांडवांच्या बाजूने दृष्टद्युम्न आहे. तो एक दुसरा पांडवच आहे. तेथे सोमक आहे तो राजा युधिष्ठीराला एवढा मानतो कीं, तो त्याचे सर्वस्व पांडवांसाठी द्यायला कमी करणार नाही. त्याशिवाय वृश्नी वंशाचे कृष्ण त्यांते नेते आहेत. मी ऐकतो कीं, विराट राजा मत्स्य देशाचा पांडवांशी सोयरीक केल्याने त्यांच्या बाजूने रहाणार आहे. त्याचे पशुधन वाचवण्यासाठी पांडवांनी मोठी सेवा त्या राजाला दिली होती. केकया राज वंशाचे पांच महारथी पांडवांबरोबर आहेत. मी ऐकतो कीं, डोंगरदऱ्यातील पहाडी जाती पांडवांशी हात मिळवत आहेत. कांहीं म्लेच्छ जमाती पांडवांच्या वरील प्रेमामुळे त्याच्यासाठी जानकुर्बान करण्यासाठी तो तयार आहे. पांड्या राजा सुद्धा पांडवांसाठी लढण्यास तयार आहे. द्रोणांकडून धनुर्विद्या संपादन केलेला सत्यकी पांडवांसाठी लढणार आहे. छेड्डी राजा, कुरश टोळया असे बरेच त्यांच्या सर्व ताकदीने पांडवांच्या बाजूने लढणार आहेत. ज्या शिशुपालाचा वध कृष्णाने राडसूय यज्ञाच्या वेळी केला त्याचा मुलगा पांडवांच्या बाजूनी लढणार आहे. अरे संजया, माझ्या गवाळगण जातीच्या सारथ्या व मित्रा, मला जे पंडुच्या मुलांच्या हालचालीबद्दल सांगितले व त्यात त्यांना कृष्ण ज्या प्रकारे पांडवांना मदत करत आहे ते समजले त्या वेळे पासून मला अस्वस्थता वाटते. कारण कांहीं अशुभ घडणार आहे माझ्या मुलांच्या बाबत हे निश्चित. ज्या सेनेत कृष्ण आहे ती सेना कधीच पराजित होऊ शकत नाही हे मी चांगलेच जाणत आहे. दुर्योधन वेळीच थांबला तरठीक आहे पण जर ते नाही झाले तर इंद्राने व उपेंद्राने जसें सगळे दानव मारून टाकले तसे सगळे कौरव नष्ट होतील. युधिष्ठीर पुण्यष्लोक आहे. म्हणून त्याच्या क्रोधाला मी सगळयात जास्त भित आहे. कृष्ण, अर्जुन, भिम, नकूल आणि सहदेवांपेक्षा त्याचा राग जास्त सहारक ठरेल हे मी ओळखून आहे. युधिष्ठीर ब्रह्मचर्य पालन करणारा आहे, त्याची व्रतस्थता मोठी आहे, त्यामुळें त्याचा राग जास्त

धोकादायक आहे. अशी सच्ची माणसं विनाकारण रागवत नाहीत. त्यांच्या क्रोधात प्रचंड उर्जा असते त्यामुळें अशांचा राग जास्त नुकसानकारक असतो. त्याला शांत करणे माझ्या मुलांच्या भल्यासाठी आवश्यक आहे. म्हणून तू त्वरित रथात बसून पांडवांकडे जा. माझे मत त्या युधिष्ठीराला सांग व त्याचे मन शांत करण्याचा प्रयत्न कर. त्यांच्याशा प्रेमांने बोल. तू कृष्णालासुद्धा भेटशिल. त्या सगळयांना सांग कीं, तुमचा काका शांततामय समझौत्यासाठी तयार आहे. त्या भेटीत तू सगळया पांडवांना, कृष्णाला आणि श्रींजयांना भेटशिल. त्यांचे सगळयांचे क्षेमकुशल विचारशिल. सगळे तू मोठ्या आपुलकीने करशिल. एका उत्तम संदेशवाहकासारखे हे सगळे तू करणार आहेस अशी जाणीव धृतराष्ट्र संजयाला देतो. त्यांनी मन जिंकण्यासाठी जे कांहीं करण्यासारखे वाटेल ते सर्व कर. युद्धाचे विचार त्यांच्या मनातून जातील असें कर. अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग बाविसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व

## भाग तेविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्राचे ते ऐकून संजय उपप्लव्य नगराकडे पांडवांना भेटण्यासाठी जातो. तेथे पोहोचल्यावर युधिष्ठीराला भेटतो. त्याला भेटल्यावर तो प्रथम त्याला लवून नमस्कार करतो. तो त्याला सांगतो, "महाराज, मी गवाळगणचा पुत्र व सुत वंशाचा असून माझे नांव संजय आहे, मी धृतराष्ट्रांच्या कडून आलो आहे. आपल्याला सुस्थितीत पाहून माझे मालक फार संतुष्ट झाले आहेत. त्यात आपल्याला यथायोग्य मित्रपरिवार सुद्धा प्राप्त झाला आहे. माझे धनी वयोवृद्ध धृतराष्ट्र, अंबिकाचे पुत्र, आपल्या बद्दल चौकशी करण्यासाठी व त्यांचे मनोगत सांगण्यासाठी मला पाठवत आहेत. आपले सगळे बंधू कुशल आहेत असें समजतो. आपली पत्नी, द्रुपद राजाची कन्या कुशल असेल असें समजतो. आपण सगळे कधीही न्यायाच्या व सच्चाईच्या मार्गाचा त्याग करत नाही. हे आमचे मालक चांगलेच जाणतात. त्या तुमच्या पत्नी व त्यांची मुलं सुखरुप आहेत असें समजतो. आमचे मालक जाणतात कीं, तुमच्या सगळयांचे सुख त्या एका द्रौपदीच्या भोवती असते. तिच्या भावनांसाठी तुम्ही सगळे पांडव कांहींही करायला तयार असतां हे माझे मालक जाणून आहेत. तिचा उपमर्द म्हणजे तुमचा सगळयांचा उपमर्द असें तुम्ही धरून जे करावयाचे ते करत असता, हे माझे मालक जाणतात. मी आपल्या सगळयांचे भले चिंतीतो माझ्या व माझ्या मालकाच्या वतीने". असें तो बोलून आपला परिचय करतो.

युधिष्ठीर ते ऐकून बोलतो, "अहो संजय, गवालगण पुत्रा, आपला प्रवास कसा झाला"? आपल्याला पाहून आम्हाला बरे वाटले. मी आपल्याला तुमची क्षेमकुशलता विचारत आहे. आमचे काका कसे आहेत, ते आता वयोवृद्ध झाले आहेत. त्याची तब्येत कशी आहे? आमची काकी गांधारी माता कशा आहेत?

आपल्याला पाहून मला वाटते कीं, मी माझ्या चुलत्यालाच भेटत आहे. ते नेहमी त्यांच्याच विचारांने त्यांची कामं करत असतात असें मी समजतो. मी आशा करतो कीं, त्यांची प्रकृती उत्तम आहे. तेथे असलेले वल्हीक, राजा प्रतीपाचे पुत्र, जे मोठे विद्वान आहेत तेसुद्धा कुशल आहेत. त्याच प्रमाणे सोमदत्त जे तेथे सभेत उपस्थित असतात ते कसे आहेत? तसेंच माझा भाऊ भुरिश्रव कसा आहे? सत्यसंध कसा आहे? सल व कृपाचार्य कसे आहेत? द्रोणाचार्य व त्यांचा सुपुत्र अश्वत्थामा कसा आहे"? ह्या सगळयांची मी विचारपुस केली ते त्यांना सांगा कारण, त्यांची सगळयांची आम्हा सगळयांना फार आठवण येत असते. मी आशा करतो कीं, ते सगळे शूरवीर योद्धे निरोगी आयुष्य जगत आहेत. मी जाणतो की ज्यांचा मी उल्लेख आता केला ते सगळे मोठे विद्वान असून युद्धकलेत प्रवीण आहेत, ते सगळे कौरवांच्या हिताशी जोडलेले आहेत. मला आशा आहे कीं, दुर्योधनाच्या राज्य कारभारात त्या सगळया ज्येष्ठ पुरूषांचा यथोस्थित मानसन्मान होत आहे. मला युयुत्सूची आठवण येते तो खरोखरच फार सज्जन मनुष्य आहे जो सच्चाईवर विश्र्वास ठेवून त्याची कामं करत असतो. माझे नमस्कार धृतराष्ट्राच्या वैश्य पत्नीला सांगावेत. त्या काकींची मला नेहमी आठवण येते. दुर्योधनाचा एकमेव सल्लागार राधेय सुस्थितीत आहे. माझे नमस्कार सगळया कुरु घराण्यातील व अजमिदा वंशाच्या स्त्रियांना सांगा. तेथे काम करणाऱ्या सगळया सेवकांना सुद्धा माझ्या शुभेच्छा द्यावयाला विसरू नका. ते सगळे कुरु घराण्याचे लोक मजेत असतील असें मी समजतो. तेथे ब्राह्मणांचे कसे चालले आहे? मला अशा आहे, मी जी दानं तेथील ब्राह्मणांना दिली होती ती कर्णाच्या व शकुनीच्या कारस्थानी सल्ल्याने दुर्योधनाने चोरली नाहीत ना? तेथील ब्राह्मणांचे कसे चालले आहे. कारण त्यांच्या आशिर्वादानेच तर स्वर्गाचे द्वार आपल्याला उघडत असते. जर मूर्ख दुर्योधन तसे करत नसेल तर त्याचा नजिकच्या काळात नाश निश्र्चित होईल. मला आशा आहे की, तेथे

मित्राच्या सोंगात त्यांचे हितशत्रू बसलेले नाहीत कारण ते त्याचा व त्याच्या घराचा सर्वनाश करणार आहेत. अरे संजय, मला सांग तेथे जे वडील आहेत ते पांडवांबद्दल काय बोलतात. आमच्या कडून कांहीं गैरकृत्य झाल्याचे कोणी बोलतो कां"? द्रोण, कृपा आमच्याबद्दल काय बोलतात ते मला सांग. मला वाटते तेथे असलेले धृतराष्ट्राला व त्याच्या लाडक्या मुलाला त्यांचे तारणकर्ते समजतात. जेव्हां लुटारींनी कौरवांना घेरले होते तेव्हां अर्जुनानी त्यांना त्यातून सोडवले होते त्याची आठवण दुर्योधनाला व इतर कौरवांना आहे कां ते सांग. तेव्हां कर्ण कोठे गेला होता ते त्यांनी त्याला कधी विचारले कां ते मला सांग. मला माहित नाही कीं, तेथे ह्या जगात दुसरा कोणी अर्जुनासारखा धनुर्धारी असेल. एका झटक्यात साठ बाण फेकणारा कोणी वीर आहे कां त्यांच्यात ते तू मला सांग अरे संजया. संजया मला सांग ते भिमाचे सामर्थ्य आठवतात कां? जो झाडं उपटून त्यांची गदा करून शत्रूचा पडशा पाडतो. त्याचप्रमाणे, महारथी सहदेव आणि नकूल माझ्या माद्री आईची मुलं त्यांनी कलिंग देशाचे काय केले होते? तुझ्या नजरेसमोर दंतकुर मध्यें ते घडले होते त्याची आठवण कौरवांना आहेकां"? सिवी व त्रिगर्तांचा पराभव कसा झाला ते कौरवांना आठवते कां ते विचार त्यांना जाऊन. राजसुय यज्ञात पांडवांनी जे केले त्याची आठवण जर दुर्योधनाने ठेवली तर तो कोणताही मूर्खपणाचा निर्णय आपल्या अंध बापावर लादणार नाही अशी मी आशा करतो. द्वैतवनात दुर्योधन पशु संरक्षणार्थ आला होता तेव्हां गंधर्वाकडून कसा मार खाल्ला होता व तेथे भिम आणि अर्जुनामुळें ते कसे गंधर्वाच्या तावडीतून वाचले ते त्याला आठवते कां ते त्याला जाऊन विचार. तेथे कौरवांच्या सैन्याची कशी धुळधांण उडाली होती त्याची आठवण आहे कां, ते विचार. तेव्हां त्याचा परममित्र राधेय होता पण त्याला कांहीं करता आले नाही हे दुर्योधनाने लक्षात घ्यावे जेव्हां तो माझा मूर्ख चुलत भाऊ कर्णाचा सल्ला घेतो. आम्ही किती प्रयत्न केले त्या दुर्योधनाचे मन वळवण्यासाठी परंतु, तो ऐकायलाच तयार नाही. त्याच्या एकट्याच्या हट्टामुळें

जर युद्ध झाले व त्यात कुरु घराण्याचा निर्वंश झाला तर त्याची जबाबदारी एकट्या धृतराष्ट्रवर असेल".

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग तेविसावा संपला.

# संजय ज्ञान  पर्व

## भाग चोविसावा

ते ऐकल्यावर संजय बोलतो, "आपण जे सांगता, ते सगळे योग्यच आहे. आपण कुरु घरातील सर्वांची विचारपुस केली त्याबद्दल धन्यवाद. आमचे कुरु घरातील सगळे अगदी उत्तम तब्यतीत आहेत.त्यांना कशाचीच अडचण नाही. आपल्या मते त्या घरात कांहीं सत्शिल व्यक्ती आहेत, त्याच प्रमाणे कांहीं विकृत मनस्थिती असलेले आहेत धृतराष्ट्राच्या परिवारात. आपल्या माहितीसाठी सांगतो, धृतराष्ट्राचा मुलगा अगदी शत्रूलासुद्धा दानं करत असतो. त्याच प्रमाणें तो ब्राह्मणांनासुद्धा दानं करत असतो. तुम्ही एक पांडव सोडले तर तो इतर कोणाचाही दुःश्वास करत नाही हे विशेष वाटते त्याच्या पित्याला. तुम्हा क्षत्रियांत एक रिवाज सामान्यपणे पाळला जातो जो कसायाच्या कामाचा आहे. त्याप्रमाणें तुम्ही क्षत्रिय तुम्हाला त्रास न देणाऱ्याला सुद्धा इजा करत असता. ते धृतराष्ट्राची मुलंसुद्धा करत आहेत. त्याप्रमाणे तो त्याचा मुलगा, तुमच्या बद्दल दुःश्वास ठेवून आहे जरी तुम्ही त्याचा दुःश्वास करत नाही हे सगळे जाणून आहेत. धृतराष्ट्राला त्याबद्दल नाराजी आहे. त्यामुळें ते अतिशय दुःखी आहेत. अहो युधिष्ठीर, तो मनातल्या मनात त्या कारणांने रडत असतो. त्याबद्दल ते ब्राह्मणांशीसुद्धा बोलतात. ते ब्राह्मण त्याला सांगतात कीं, अशारितीने घर फोडणे हे एक मोठे पाप आहे. कौरव आपल्या सामर्थ्याची चांगलीच खबर ठेवत असतात. त्यांना माहीत आहे, भिमाच्या गदेचा प्रताप, माद्रीच्या मुलांची घोडेस्वारी सगळे जाणतात. त्यांचे बाण फेकणे किती प्रभावी असते तेसुद्धा त्यांना माहित आहे. अहो राजा, भविष्यात काय लिहीलेले आहे ते कोणालाच समजत नाही. आपण इतके गुणी असूनही असें भोग भोगावे लागले ह्यांचे सगळयांना आश्चर्य वाटते. आम्ही जाणतो कीं, ते सगळे तुम्ही तुमच्या बुद्धीचातूर्यानी सुधाराल. आपण सुखासाठी सात्त्विकता सोडणार नाही असें आमचे मालक समजतात. आपल्या बुद्धीने आपण सगळे म्हणजे पंडुची मुल,

धृतराष्ट्राची मुलं व श्रींजय शांततामय मार्गाचे हा प्रश्न सोडवतील असें वाटते. धृतराष्ट्रानी त्याचे आमात्य व पुत्र ह्यांच्याशी बोलून जे ठरवले आहे ते आता मी आपल्या सगळयांना, जे येथे जमले आहेत त्यांना, सांगू इच्छितो. अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग चोविसावा संपला.

## संजय ज्ञान पर्व

## भाग पंचविसावा

युधिष्ठीर त्यावर बोलतो, "येथे जमले आहेत, पांडव, श्रींजय परिवार, कृष्ण, युयुधन  आणि राजा विराट, त्यांच्या समक्ष तुला जे सांगावयाचे आहे ते सांग, अरे गवालगणाच्या मुला. तुला जे सांगण्यासाठी धृतराष्ट्राने पाठवले आहे ते सगळे सांगून टाक".

संजय सांगू लागतो, "अहो महाबली युधिष्ठीर, वृकोदर, धनंजय, नकूल व सहदेव, तसेंच वासुदेव, सुरा वंशाचे सत्यकी, वयोवृद्ध द्रुपदजी आणि दृष्टद्युम्न, प्रिशताचा पुत्र आता मी सांगणार आहे कुरु घराच्या दृष्टीने काय योग्य आहे, कौरवांच्या कल्पनेनुसार. ज्याच्या स्वीकाराने सगळया वंशाला शांतता प्राप्त होईल. राजा धृतराष्ट्राला शांतता पाहिजे आहे ते आपण सगळे जाणत".

युधिष्ठीर त्याला बोलतो, येथे आंम्ही सगळे पांडव, कृष्ण, श्रींजय, युयुधन, विराट जमलो आहोत. आता सांग सुता, संजया तुझ्या राजाला काय सांगावयाचे आहे.

संजय त्याचे सुरू करतो, "मी प्रथम युधिष्ठीर, वृकोदर, धनंजय, नकूल व सहदेव ह्यांचे अभिष्टचिंतन करत आहे. त्यांच प्रमाणे वासुदेव, सुरा वंशाचे सत्यकी, वयोवृद्ध द्रुपदजी, प्रिशत पुत्र दृष्टद्युम्न, आणि इतर वरीष्ठ मान्यवर ह्यांना अभिवादन करत आहे. आता ऐका माझे राजे काय प्रस्ताव मांडत आहेत. ज्यामुळें घराण्यात शांतता राखली जाईल. ते सांगण्यासाठी मला माझ्या राजानी जलदीने आपल्याकडे पाठवले आहे. पंडुची मुलं व त्यांची मुलं आणि इतर संबंधित ज्येष्ठ लोक ते स्वीकारून शांतता आणण्यात मदत करतील असें मला वाटते. आपण कुंतीची मुलं स्वभावतः शांतता मानणारे आहात. आपण उच्च कुळात जन्मलेले आहात. त्याप्रमाणे आपल्या स्वभावात क्षमाशिलता,

संयम असें उत्तम गुण आधी पासून आहेत. शर्मिंदे व्हावे लागेल असें कोणतेही कार्य आपण करत नाही हे सगळे जाणतात. आपण काय योग्य ते चांगलेच जाणता. कोणतेही नीच कृत्य आपण कधी करमार नाही हे सगळे जाणतात. शांततामय मार्ग न मिळाल्यास जो नरसंहार होणार आहे त्यामुळे जरी आपण जिंकलात तरी त्या संहाराचे पाप आपल्या माथी येणार हे आपण जाणता आहात. त्यामुळें आपल्या स्वच्छ चारित्र्यावर काळा डाग पडल्यासारखे होईल त्याची आपल्याला कल्पना असेलच. आमचे राजे सांगतात कीं, जरी पांडव त्यांच्या दोस्तांच्या सहाय्याने अथवा त्याशिवाय असा युद्धात जिकले तरी जे पाप त्यांच्या माथी लागणार आहे त्यामुळें जिंकल्या नंतरसुद्धा ते मेल्यागतच असतील कारण त्यांच्या कुळाचा संहार केल्याचे पातक त्यांना शांत बसू देणार नाही. तरी ह्या सगळया गोष्टी लक्षात घेऊन ह्यापुढील निर्णय आपल्याला घ्यावयाचे आहेत. अगदी इद्रसुद्धा त्याच्या सगळया देवांच्या मदतीने पांडवांचा, कृष्णाची मदत असली तरी पराजय करू शकतो. त्याच प्रमाणें, कौरवांच्या बाजूंने द्रोण, भिष, कृप आणि द्रोणांचा पुत्र अश्र्वत्थामा त्याबरोबर इतर बरेच क्षत्रिय असल्याने जिंकले जाण्याची शक्यता कमी आहे. त्याशिवाय धृतराष्ट्राची सेना फार मोठी आहे हेसुद्धा आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणून मला वाटते अशा जिंकण्यात किंवा हरण्यात कांहीं तथ्य उरत नाही. ते सगळे लक्षात घेऊन आपल्यासारख्या उच्च कुलिन लोकांनी चांगुलपणा सांभाळून शांतता कराराला मान्यता द्यावी असें माझे राजे सुचवत आहेत. मी माझे हात जोडून विनंती करतो कीं, हे सगळे भयंकर भवितव्य लक्षात घेऊन आपण युद्धाचा पर्याय विसरून जाल व कौरवांच्या अटी मान्य कराल. कारण त्यातच तुम्हा दोन्ही गटांचे अतिम हित आहे. भिष्मसुद्धा त्याच मताचे आहेत.

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग पंचविसावा संपला.

## संजय ज्ञान पर्व

# भाग सव्विसावा

ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला उत्तर देतो, "माझे जे वक्तव्य माझ्या भावांच्या शौर्याबद्दलचे होते त्याचा अर्थ असा नाही कीं, आम्हाला युद्धाचा पर्याय विशेष पसंत आहे. ते फक्त सांगावयाचे म्हणजे जर कौरवांना शांतता नको असेल व युद्धाची खुमखुमी असेल तर काय होऊ शकते त्याची कल्पना देण्यासाठी मी ते बोललो. परंतु, जर सन्माननीय तोडगा धृतराष्ट्राकडून येत असेल तर आम्ही जरूर त्याचा विचार करू. केव्हांही शांतता हि युद्धापेक्षा जास्त हितकारक असते ते सगळे जाणतात परंतु, कांहीं लोकांना जसे राधेय, युद्ध जास्त आवडते. तेव्हां मला एवढेच सांगावयाचे होते कीं, आम्ही युद्धाच्या पर्यायाची पूर्ण तयारी ठेवली आहे. कोणत्याही इसमाला युद्ध साधारणपणे नकोच असते. आमच्या चांगुलपणाचा अर्थ आम्ही कमजोर आहोत असा कोणी करू नये. आम्ही सन्माननीय तोडगा असेल तर त्याचा जरूर विचार करू. असा कोण महाभाग आहे किं फक्त युद्धाचाच पर्याय मागील"? पृथाच्या मुलांना स्वताचे भले करावयाचे आहे परंतु, त्याबरोबर सगळया जगाचे सुद्धा भले पाहू इच्छितात. चांगुलपणातून जे सुख प्राप्त होईल त्याची ते अपेक्षा करत आहेत. वाटेल ते करून सुख मिळवण्याचा प्रयत्न करणारा बहुधा स्वतः साठी दुःख ओढवून घेत असतो. मौज मजा पाहिजे त्याला यथावकाश त्रास अनुभवावा लागतो असें समजतात. सुखाच्या लोभात अडकलेला कधींच मनःशांती प्राप्त करू शकत नाही. तो सदैव चिंता करत असतो त्याचे कसे होणार? त्या चिंतेत तो बरीच छोटी सुख हरवून बसतो. आता पहा माझ्या काकाकडे आमची गडगंज संपत्ती आहे पण त्याला रात्रीची झोप लागत नाही. काय उपयोग अशा संपत्तीचा? गाण्याचा आनंद त्याला मिळत नाही, सुगंधाचे परिमल त्याला उपभोगता येत नाहीत कारण काय तर तो त्याच्या भवितव्याच्या विवंचनेत अडकलेला आहे. काय उपयोग अशा वैभवाचा! तसें नसते तर आमच्यावर अनन्वित अन्याय त्यांनी केले नसते व आता तो मोठ्या शहाणपणाच्या गोष्टी

करत आहे. राजा स्वतः अडचणीत असतांना तो दुसऱ्यांच्या ताकदीचा उपयोग करू पहात आहे. तो जसा आमच्याशी वागला तसे त्याच्याशी वागले जाणार आहे हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. फळाफुलांनी भरलेल्या बागेत जर कोणी पेटलेले लाकूड टाकेल तर त्यामुळें वाऱ्याच्या वेगांनी त्याची आग सर्वत्र पसरली तर त्याची जबाबदारी त्याचीच असते, हे तो विसरू शकत नाही. त्यानंतर त्या जळणाऱ्या बागेबद्दल शहाणपणाच्या गोष्टी करण्यात काय अर्थ आहे. प्रथम त्यांने आग कां टाकली ह्याचे तो उत्तर शोधू शकणार नाही. अरे संजया, मला सांग आता तुझा मालक कां रडत आहे, त्याच्याकडे तर सगळी संपत्ती आहे? त्याला कां झोप लागत नाही, ह्याचे कारण  मी सांगतो, त्यांने पहिल्या पासून चुकीचे निर्णय चुकीच्या लोकांच्या नादी लागून घेतले आहेत. सुरुवातीपासूनच त्याची लक्षणं गैरकर्मात रमणारी होती. त्याची कटू फळं येऊ लागली तर त्याबद्दल आता कां चिंता करावयाची. त्याला माहित होते, त्याचा मुलगा बिघडलेल्या प्रवृत्तीचा आहे तरी तो त्याचेच कां ऐकत होता त्याचे काय उत्तर आहे तुझ्या धन्याकडे? विदूर काका परोपरीने सांगत होते तरी कां तो त्यांचे न ऐकता कर्ण, शकूनी अशा अदूरदृष्टीच्या बाष्कळ लोकांच्या तालावर काम करत राहिला ते सांगू शकशिल कां? तुझ्या धन्याला फक्त आणि फक्त त्याच्या मुलांचा विचार होता इतर त्याच्या दृष्टीने निरर्थक होते. आमच्याशी चांगुलपणाच्या खोट्या बहाण्याने तो आम्हाला कां फसवत होता? मी आमचे ज्येष्ठ काका म्हणून त्यांचा सन्मान करण्यासाठी माझ्या भावंडांबरोबर व पत्नीसह किती काय सहन केले तेव्हां त्याला कां हे सगळे तत्त्वज्ञान सुचले नाही"? त्यांचा तोंड देखला चांगुलपणा मला समजत नव्हता असें नाही परंतु, मी माझ्या तत्त्वानुसार वागत होतो त्याचा किती गैरफायदा त्याच्या मुलांनी त्याच्या हजेरीत उठवला ते त्याला दिसत नव्हते? जर तुझा मालक खरोखरच तत्त्वनिष्ठ असतां तर हे जे घडले ते घडलेच नसते. एका बाजूला आपण त्यातले नाहीच असे दाखवत छुप्या मार्गाने तुझा धनी जे साध्य करू इच्छित आहे तेसुद्धा केवळ

त्याच्या मुलांचे जीव वाचवण्यासाठी हे न समजण्या इतके आम्ही नासमज नाही हे लक्षात घे. एका बाजूला आपल्या मुलाला दोष देण्याचे नाटक करावयाचे व त्याच वेळी त्याच्या कपट कारस्थानांना मदत करावयाची, हा खेळ किती काळ तुझा मालक खेळत रहाणार आहे? युद्धामुळें कोणाला किती काय मिळते व काय नुकसान होते, ह्या गोष्टी क्षत्रियांना सांगण्याची आत्ताच कां तुझ्या धन्याला फिकीर पडली ते मला सांग. त्याला त्याचा वंशनाश समोर दिसत आहे कां"? त्याचा मोठा पुत्र जो त्याच्या मर्जीने सगळया गोष्टी करत होता, त्याच्या रागाचा, अपशब्दांचा, सगळे नितीनियम मोडणारा, कशाही प्रकारे संपत्ती हडपणारा, वासनामय जीवन जगणारा, दुसऱ्यांचा मान मरातब न बाळगणारा अशाच्या कौतुकासाठी धृतराष्ट्र आपली सगळी मुल्ये विसरला आहे. प्रत्येक गोष्ट किती सहन करावयाची त्याची एक मर्यादा असते व जेव्हां ती संपते तेव्हांच युद्धाच्या पर्यायाचा विचार होत असतो. मला जेव्हां समजले कीं ते माझ्याशी कपटाने द्युत खेळत आहेत तेव्हांच मी समजलो होतो कीं, नजिकच्या भविष्यात कुरु वंश नष्ट होणार आहे. जेवर धृतराष्ट्र विदूराच्या सांगण्याप्रमाणें राज्यकारभार करत होता तोपर्यंत सगळे सुरळीत होत होते. परंतु, जेव्हांपासून तुझा मालक दुर्योधनाच्या मित्रांच्या सल्ल्याने काम करू लागला सगळया गोष्टी बिघडून गेल्या हो मला समजत होते. स्वार्थाने लोलूप असलेले दुर्योधनाचे मित्र शकूनी, कर्ण, भाऊ दुःशासन, कारभार पाहू लागले त्या वेळे पासून तुमच्या राज्याची काय अवस्था झाली आहे ते मला माहीत आहे. मला वाटत नाहीं कीं, असा सुझाव तुमच्याकडून येईल जो पांडवांच्या भल्याचा असू शकेल. विदूर त्यात कोठेही नसणार अशा सुझावाचा आम्ही विचारसुद्धा करू शकू असें वाटत नाही. तुझ्या राजाला पृथ्वीवर अमर्याद सत्ता पाहिजे आहे, ते आम्हाला मान्य करता येणार नाही. तशा सत्तेसाठी त्याच्या मुलांना व त्याच्या मित्रांना, पाडवांना हरवावे लागेल. जेव्हां धनंजय त्याची दैवी आयुध घेऊन कौरवांचा शोध घेऊ लागेल तेव्हां त्याला समजेल किती मोठा मूर्खपणा त्यांनी केला आहे. कर्णाला वाटते कीं, तो अर्जुनाच्या बरोबर असू

शकतो पण तो विसरतो जेव्हां विराटाचे पशुधन किंर्तीने परत मिळवले तेव्हां त्याचे सगळे कपडे त्यांने काढले होते. जो स्वताचे कपडे सांभाळू शकत नाही तो काय अर्जुनाशी बरोबरी करणार ह्याचा विचार तुम्ही करावयाला पाहिजे. त्या युद्धात तुमचे सगळे रथीमहारथी, भिष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा असें सगळे मार खाऊन परत फिरले होते. त्यावेळी फक्त किर्ती होता पण आता भिम, नकुल, सहदेव आणि मी स्वतः लढणार आहोत. त्यामुळें कौरवांचे काय होईल त्याच्या चिंतेने तुझ्या मालकाला तुला पाठवण्याचे शहाणपण सुचले आहे, त्यात आमच्या बाबत कांहीं भावना नाहीत हे मी पूर्णपणे समजून आहे. कौरव अजून जीवंत आहेत कारण अजून त्यांनी अर्जुनाच्या गांडीवाचा टणत्कार ऐकलेला नाही. दुर्योधनाचा राग नष्ट होईल जेव्हां तो भिमाचा राग पाहिल. जोवर आम्ही सगळे पांडव एकत्र आहोत इंद्रसुद्धा आम्हाला आमचा हक्क नाकारू शकणार नाही, कौरवा कोठेच नाहीत. अरे धृतराष्ट्राच्या सारथ्या, संजया, तुझे धनी समजतात कीं, ते विजयी होतील परंतु, तू त्यांना जाऊन सांग कीं, आता परिस्थिती बदललेली आहे. आम्ही जे विनाकारण भोगले व आमच्या पत्नीचा जो नाहक अपमान झाला त्याची किंमत कौरवांना मोजावी लागेल. परंतु, जर कौरवांना खरोखरच शांतता पाहिजे असेल तर त्यांनी आमचे इंद्रप्रस्थ व त्या बरोबरची सगळी जायदाद आमच्याकडे सुपूर्द करावी. तसे बिनशर्त मंजूर असेल तर पांडव आणि कौरव ह्यांच्यात समेट होऊ शकतो. दुसरे कांहीं मान्य होणार नाही.

अशा रितीने संजय ज्ञान पर्व भाग सव्विसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व

## भाग सत्ताविसावा

संजय ते युधिष्ठीराचे ऐकल्यावर बोलतो, अहो पांडवानो, आपण फार चांगले आहात असें सगळे जग समजते, माझंसुद्धा तेंच मत आहे. जीवन बदलत असते, ते कसे संपले ते महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन आपण आपला नाश हणार नाही असं कांहीं ठरवले तर ते जास्त हितकारक होईल असे मला सुचवावयाचे आहे. मला माहीत आहे कीं, सहजासहजी कौरव तुमची मालमत्ता तुम्हाला देणार नाहीत. त्यापेक्षा आता पर्यंत आपण जे दरिद्री जीवन जगत होता तसेंच ह्यापुढे जगण्यातच आपले हित आहे कारण जर युद्ध झाले तर त्यात तुमचा पाडाव होणार हे ठरलेले आहे. त्यापेक्षा तुम्ही अंधकांच्या कडे जाऊन तुमचे उर्वरीत आयुष्य ब्राह्मणांच्या सेवेत व्यतीत करावे व पुण्य कमवित रहावे जे आपल्याला फार आवडते ते जास्त उचीत होईल. ते पुण्य आपल्याला पुढच्या जन्मात उपयोगी येईल. ह्या जन्माचे जे ठरले आहे त्यातच आपण समाधानी रहावे असें मला सुचवावेसे वाटते. माझ्यामते हे मर्त्य जीवन क्षणभंगूर आहे, त्यातीव विजय, पराजय ह्यात आपल्या सारख्या तत्त्वनिष्ठानी अडकून युद्धासारख्या पापाला आमंत्रण देणाऱ्या कृतीत जाऊ नये. आपण कधीही पाप करणारे नाही मग हे युद्ध करण्याचा हव्यास कां"? जे कौरवांना मिळाले ते त्यांचेच समजून आपण सगळे पांच बंधू व तुमची पत्नी संन्यासाश्रमात जाऊन पुण्यसंचयात रमणेच जास्त योग्य ठरेल कारण आपण तेंच आता पर्यंत करत आला आहात. तेंच चालू ठेवाल तर तो योग्य होईल. सत्तेची अभिलाषा कौरवांसारख्या सामान्य लोकांना शोभते, आपण वैराग्य वृत्तीचे पुजक आहात तेव्हां तो पुण्याचा मार्ग जो सगळे ब्राह्मण आचरतात तो सोडून असें युद्धाच्या विचारात जाणे आपल्या सारख्या पुण्यवंताना शोभत नाही. तुम्ही कौरवांवर सूड उगवण्याच्या गोष्टी करत आहात ते तुमच्या सारख्यांना शोभत नाही. तुम्ही क्षमाशिल आहात तसेंच रहावे व आपल्या पुण्याचे जीवन जगावे हे योग्य नाहीं

कां"? तसे केल्याने आपली सगळया जरात पुण्यवंत म्हणून किर्ती पसरेल व लोक आपल्याला फार मानतील. आपल्या सारख्या संत प्रवृत्तीच्या लोकांनी वास्तविक गोष्टींत जसें सत्ता, संपत्ती ह्यात गुंतून घेणे योग्य दिसत नाही. तुम्ही ह्या सगळया मोहांतून बाहेर आले पाहिजे व कौरवांना क्षमा करून आपल्या अध्यात्मिक प्रगतीत लक्ष घातले पाहिजे हेंच योग्य आहे असें नाही कां वाटचत आपल्याला? कौरव सगळया पृथ्वीचे मालक झाले तरी ते दुर्गुणी असल्यामुळें ते तुमच्या सारखे स्वर्गात जाऊ शकणार नाही. परंतु, जर तुम्हीसुद्धा त्यांच्या सारखेच वागू लागलात तर आता पर्यंत ब्राह्मणांत बसून जे आपण मिळवले ते सगळे वाया गेले असेंच म्हणावे लागेल. आपण वेदांचा अभ्यास केला आहे, आपण ब्राह्मणांत आपला समय घालवला आहे, आपण यज्ञ करणारे आहात, आपण मोक्षाचाच फक्त विचार करण्यासाठी जन्मला आहात हे मी तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. आपण अनेक वर्षें वनात राहून भरपूर साधना केली आहे, ते सगळें तुमच्या अशा कृतीमुळें व्यर्थ जाईल हो तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. त्या कृत्यामुळें तुमचा जो अधःपात होईल तो तुम्हाला चालेल कां? कौरवांनी जो आपला व आपल्या सन्माननीय पत्नीचा अपमान केला त्याचा सूड घेण्याच्या गोष्टी आपण करत आहात, अहो मुनीवत, आपण अशा वास्तविक दोषांत अडकता हे कितपत आपल्याला शोभते ते मला सांगा. माणसाचे सहा दोष सांगितलेले आहेत. त्यात सूड घेणे हासुद्धा एक दोष म्हणून सांगितला आहे. कौरव व त्यांचे मित्र आपल्या सारखे उच्च प्रवृत्तीचे नाहीत म्हणून अशाप्रकारच्या प्रतारणा त्यांच्या कडून झाल्या त्या तुम्ही मोठ्या मनाने माफ केल्याने तुमचे अध्यात्मिक बळ वाढणार आहे हे कसे तुमच्या लक्षात येत नाही. वास्तविक सुखा मागे जाणारे मृत्यू नंतर ते त्यांच्या बरोबर येत नसल्यामुळें अगतिक अवस्थेत पिशाच्च स्वरुपात अतीव दुःखात त्यांचा काळ घालवतात. ते दुःख तुम्हाला नको असेल तर पृथ्वीचा त्याग करून व मान अपमान अशा वास्तविक गोष्टीत न रमता तुम्ही फक्त आणि फक्त अध्यात्मिक उच्चतेचा विचार

करणे हेंच आपल्यासारख्या दैवी अवतारांना शोभते. कौरवांनी जे दुष्कृत्य तुमच्याशी केले त्याची शिक्षा त्यांना यथावकाश विधात्याच्या नियमांनुसार भोगावी लागणार आहेच त्यासाठी आपल्याला युद्ध करण्याची आवश्यकता का वाटते"? विधात्याच्या नियमानुसार आपण जे कृत्य करतो व तसेंच जे विचार वारंवार करतो त्यामनुळें जे अध्यात्मिक स्थरावर परिणाम होतात ते अबाधित असतात. ते कोणीही पुसून टाकू शकत नाही. आपल्या सत्तशिलतेचे परिणाम आपण पुढच्या जन्मात अनुभवणार आहात जे शाश्वत सुखाचे असतील त्याच प्रमाणे कौरवाच्या त्यांच्या कर्माची कटू फळ त्यांना भोगावी लागणार आहेत. त्यांना शिक्षा करण्याचे आपल्याला कष्ट करण्याची आवश्यकता नाही. ब्राह्मणांना दानं करणे, यज्ञ करणे, पुरोहितांचा सन्मान करणे हे सगळे जोवर आपल्यात जीव आहे तोवरच आपण करत असतो. त्यानंतर मृत्यू येतो व सगळे धुतले जाते. त्यामागील उद्देश फक्त रहातो. आपण शमाशिलतेने वागत असाल तर कायम स्वर्गात जाणार तेथे तुम्हाला कशाचीच कमी नसेल परंतु, जर सूड बुद्धीने तुम्ही युद्ध छेडले व जरी त्यात जिंकलात तरी तुमचे स्वर्गातील स्थान मात्र तुम्ही कायमचे घालवलेले असेल ह्याचा विचार करावा असलें मी सांगू इच्छितो. स्वर्गात आपण जावयाचे कां पुन्हा येथे आपल्या कर्माची फळ भोगण्यासाठी परत परत येत रहावयाचे त्याचा निर्णय तुम्हाला घ्यावयाचा आहे. आपण राजयुय यज्ञ केले, अश्वमेध यज्ञ केले तरी तुम्ही निष्पाप होत नाही. इतकी वर्ष सत्त्वशिलतेचे जीवन जगून आता तुम्ही परत सूड घेण्याच्या व क्रोधाच्या गोष्टी करत आहात त्यामुळें तुमचा तुम्हीच अधःपात करत आहात हो तुमच्या कसे लक्षात येत नाही. पुण्य जमवावयाला फार काळ लागतो, पाप पटकन होते. एका पापमय कृत्यांने कितीतरी पुण्यकर्मांचा विनाश होत असतो. आज तुम्ही सगळे पांडव सूडाच्या, क्रोधाच्या, कौरवांना शासन करण्याच्या विचाराने प्रेरीत झालेले आहात हे मी पहात आहे. आपण जाणतां कीं, ह्या सगळया विचारांमागे भावनिकता आहे. त्यात कोठेही विवेक दिसत नाही. तुम्ही हेसुद्धा जाणता कीं, भावनिकतेतून घेतलेले निर्णय नेहमी चूकीचे

असतात. निर्णय नेहमी विवेकांनीच घ्यावयाचे असतात. म्हणून मी सांगतो कीं, कौरवांशी युद्ध करण्याचा आपल्या सगळया वीरांचा विचार भावनिकतेतून आलेला असल्यामुळें जरी वास्तविकतेत जिंकलात तरी अध्यात्मिकतेच्या पातळीवर आपण पांडव हरणार आहात त्याचा विचार करावा. अहो युधिष्ठीर, तुम्ही सांगता कीं, काकाच्या मानासाठी तुम्ही द्युत खेळलात आणि हरल्यावर त्याच सन्मानासाठी निमुटपणे वनवासात गेलात. जर तुम्हाला तुमच्या काकाचा मान राखणे एवढे आवश्यक वाटते तर आता तुम्ही त्याचा मान राखण्यासाठी कौरवांच्या मागण्यां गुपचुपपणे मान्य कां करत नाहीत? आता तो काकांचा मान कोठे गेला? आता जे पाऊल तुम्ही उचलत आहात ते स्वाभिमानाचे दर्शक पाऊल तेव्हा उचलले असते तर कदाचित ही वेळच आली नसती! प्रथम तुम्ही तुमच्या शत्रूला मोठे करता व जेव्हां ते भारी होते तेव्हा तुम्ही त्याला ठेचण्याचा विचार करता हे तुमचे वागणे कोणत्या शहाणपणात बसते ते सांगाल कां? ते वनवासात जाणे व नंतर अज्ञातवासात रहाणे हे सगळे मूर्कपणाचे होते असें समजावयाचे कां? कोणत्या नैतिकतेत तुमचे हो दुहेरी वागणे बसते ते सांगाल कां? कदाचित द्युत खेळण्याचे कारण काकाचा मान राखण्याचे जे तुम्ही सांगता ते दिशाभूल करणारे आहे, खरे कारण तुम्हाला स्वतःला द्युताची चटक होती हे होते असें मी समजू शकतो कां? आणि त्यात फसल्यावर स्वताचा मूर्खपणा उघडकीस येऊ नये म्हणून काकांच्या मानसन्मानाचे खोटे कारण आपण देत आहात. तुम्हाला द्युत खेतानयेत नसतांना शकुनीसारख्या अव्वल जुगारड्याशी खेळण्यात आपण आपला अहंकारसुद्धा घालवला आणि त्याशिवाय आपल्यावर निःसीम प्रेम करणाऱ्या भावंडांचासुद्धा विनाकारण उपमर्द घडवला. ह्यासगळया गोष्टीत कोणती नैतिकता आपण सिद्ध केली ते मला समजेल कां? तेव्हाच जर तुम्ही भिमाचे ऐकले असते तर बऱ्याच गोष्टी घडल्याच नसत्या पण ते भोग तुमच्या भाग्यात

लिहीले होते ते तुम्हाला भोगावे लागले हेंच खरे. आपल्या कडून कांहींच चूक झाली नाही असा जो भाव आपण सगळयांना दाखवत आहात त्यात आपला खोटेपणा स्पष्ट होतो. आपल्यावर नितांत श्रद्धा असलेल्या सत्यकी, राजा विराट, साक्षात परमेश्र्वर असें कृष्ण ह्यांनासुद्धा तुम्ही तुमच्या खेळात गुंतवले आहे ते किती योग्य आहे? तुमच्या ह्या अनियमित वागण्यामुळें तुम्ही दुर्योधनाची ताकद वाढवत होता ते तुम्हाला तुमचा भाऊ भिम पदोपदी सांगत असतांना व तुमची पत्नी तुम्हाला सावध करत असतांना जे निकम्याचे धोरण आपण अवलंबत होता त्यात कोणती महान नैतिकता होती ते सांगाल काय? आपल्या भावंडांचा, पत्नीचा सतत उपमर्द होईल असें तुमचे वागणे होते तरी आपण फार मोठे नैतिकवाले आहोत असे भासवून तुम्ही कोणाला मूर्ख करत होता अहो राजे युधिष्ठीर? असें करूनही आपले सगळेच योग्यच असते असें समजण्याचा अहंकारीपणा तुमच्यात सगळयांना आढळतो त्याबद्दल काय म्हणावयाचे आहे आपल्याला? तुमच्या व दुर्योधनाच्या वादात मोठे मोठे लोक मारले जाणार आहेत. जर दुर्योधन ऐकत नसेल तर तुम्ही मोठ्या मनाने त्याला माफ कर व त्याच्या गोष्टी मान्य करा म्हणजे ह्या सगळया आणि इतर असंख्य क्षत्रियांचे प्राण वाचवू शकाल. त्याच्या गोष्टी मान्य केल्यामुळे होणारे फायदे त्याच्याशी लढून जिंकण्यापेक्षा कितीतरी जास्त आहेत हे लक्षात घ्या. अनेक लोकांचे भले केल्याचे पुण्य तुम्हाला लाभेल. माणसाचा जन्म स्वतामधील विधाता शोधण्यासाठी असतो युद्ध जिंकण्या अथवा हरण्यासाठी नाही हे मी तुम्हाला सांगावयाला नको. म्हणून कृपया सगळयांच्या ज्यात तुम्हीसुद्धा येता भल्यासाठी युद्ध करण्याचा विचार सोडून द्याल तर बरे होईल". असें संजय त्याचे मुद्दे मांडतो. आपले हितचिंतक सुद्धा तसेंच तुम्हाला सांगतील म्हणून कौरवांना सगळे देऊन आपण पांच जण व आपली पत्नी संन्यासाश्रमात जाल

तर ते पृथ्वीच्या भल्याचे होईल. त्यात आपलेसुद्धा भले होणार आहे कारण आपल्याला हले असलेले देवपण त्यातून प्राप्त होणार आहे.

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग सत्ताविसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व

## भाग अठ्ठाविसावा

संजयाचे ते युक्तीवाद शांतपणे ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला बोलतो, "तुझे म्हणणे योग्य आहे कीं, चांगुलपणा हा आमचा मुख्य स्वभाव आहे. तू मला सांग तुझ्या दृष्टाने मी सद्‌गुण आचरत आहे कां, दुर्गुण. काही वेळा दुर्गुण सद्‌गुणाचे सोंग घेऊन असतो व सद्‌गुण दुर्गुणाचे रुप घेऊन असतो. त्यासाठी वरकरणी चांगुलपणा किंवा सद्‌गुण वाटणारा प्रत्यक्षात दुर्गुण असतो त्याच्या परिणामावरून. तुला असे म्हणणावयाचे आहे कां कीं, मी सद्‌गुण समजून दुर्गुणाचे आचरण करत होतो. परिणामाच्या स्वरुपावरून ते स्पष्ट होत असते. आपत्काळी सद्‌गुण व दुर्गुण त्यांची खरी रुप दाखवत असतात. माणसाने त्याच्या वर्णानुसार त्यांचे पालन करावयाचे असते. आपत्काळी मात्र त्यांची रुप बदलतात. अशाकाळी तो दुर्गुणाचे पालन करून सद्‌गुणाचे परिणाम मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. जगण्यासाठी माणसाला सगळे करण्याची परवानगी नितीशास्त्र देते. जो तशा अवघड परिस्थितीत नाही तरी त्या दुर्गुणांचा उपयोग करत असेल तर ते त्याचे कृत्य चांगुलपणाला सोडून झाले असें समजतात. जे साधारण परिस्थितीत त्यांच्या वर्णानुसार वागतात ते सद्‌गुणी समजले जातात. परंतु, तोच माणूस वाईट परिस्थितीत तसाच चांगला वागत राहून आणखीन वाईट परिस्थितीत जात असेल तर ते त्याचे वागणे चुकीचे समजले जाते. कारण जगणे हे माणसाचे पहिले कर्तव्य समजले गेले आहे. ह्याचा अर्थ चांगले वागणे अथवा वाईट वागणे ह्याचा संबंध परिस्थिती सापेक्ष असतो. कोणतेही वागणे नेहमीच चांगले किंवा वाईट असें नसते. वागणे तेंच पण परिस्थिती बदलली तर तेच वागणे अयोग्य ठरते जेव्हां परिस्थिती विरुद्ध झालेली असते. म्हणून स्वताच्या अथवा परिवाराच्या जगण्यासाठी त्याला परिस्थितीनुसार आपली वागणूक बदलावी लागते. जे साधारण परिस्थितीत त्यांच्या चांगल्या वागण्याला धरून रहातात ते शहाणे समजले

जातात व ते परिस्थिती विरुद्ध झाल्यावर त्याप्रमाणे जर आपले वागणे त्यानुसार बदलत नसतील तर ते नष्ट होतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, गृहस्थाचे वागणे व ब्रह्मचाऱ्याचे वागणे वेगवेगळया परिस्थितीत सारखेच असणार नाही कारण, त्यांचा वर्ण बदलला आहे. जे वागणे संन्याशाला योग्य आहे ते गृहस्थाला अयोग्य ठरू शकते. कारण त्यांच्या परिस्थिती भिन्न असतात. जे परिस्थिती बदलली तरी तसेंच वागणारे वागळे असतात. जे आत्मज्ञानाच्या मागे आहेत, जसें ब्राह्मण, ह्यांनासुद्धा हा सापेक्षतेचा नियम लागू होतो. ह्या प्रकारे आमचे पूर्वज वागत आले आहेत. जे अपत्काळीसुद्धा आपले वागणे बदलत नाहीत ते स्वताला कर्मठ समजतात व ते त्या प्रमाणे दुःखाचे अनुभव घेतात. हे नितीशास्त्राचे ठरलेले नियम आहेत ते माणसांना, देवांना, अगदी प्रजापतीलासुद्धा लागू आहेत. प्राप्त परिस्थितीत यशस्वी होण्यासाठी आपल्याला वागणूकीबाबत लवचिक असावे लागते. त्या सापेक्ष वागण्याला चांगुलपणा सोडला असें समजणे योग्य होणार नाही. सत्याला असत्य ठरवणे व असत्याला सत्य ठरवणे हे त्या व्यवहारात योग्य समजले जाते कारण तेंच जगण्याचे उचित माध्यम बनलेले असते. अरे संजया, जोवर काकांचा मान राखणे माझ्या परिवारासाठी योग्य मला वाटत होते तोवर मी त्यांच्या मर्जीनुसार वागत होतो. पण जेव्हां ते माझ्या परिवारासाठी अनुचित झाले तेव्हां माझे वागणे मी बदलत आहे. हे तुझ्या एका प्रश्नाचे उत्तर आहे. सहनशिलतेची अखेर एक मर्यादा असते ती संपली कीं माणूस त्याचे वागणे बदलतो. माझ्याबाबत जी सहनशिलतेची मर्यादा मी ठरवली होती ती माझ्या भावाला व पत्नी द्रौपदीला पसंत नव्हती म्हणून त्यांनी माझ्या वागण्यावर टीकेची झोड उठवली होती. नंतर जेव्हां माझ्या लक्षात आले तेव्हां मी त्यांची सर्वांची क्षमा मागून त्यांना माझ्या ज्येष्ठत्वाच्या बंधनातून मुक्त केले आहे. आता ते त्यांच्या मर्जीनुसार वागण्यास मुक्त आहेत. तरी ते केवळ प्रेमासाठी अजून माझ्या आज्ञेची प्रतिक्षा करत असतात. येथे कृष्ण आहे, जो सद्‌गुणाचा पुतळा आहे. तो ह्या नितीशास्त्रात निपुण आहे. तो ब्राह्मणांचे सगळे वागणे ओळखतो.

त्याचे सगळे निर्णय ह्या सापेक्षतेवर अवलंबून असतात. ह्या गुणांच्या सापेक्षतेलाच मुत्सद्देगिरी असें म्हणतात. जो राजकारणातील एक महत्वाचा विषय आहे. कृपया कृष्णाने येथे सांगावे किं, माझी सापेक्षता अयोग्य होती कां. मी त्याचे ऐकतो व त्याप्रमाणें माझे वागणे ठेवत असतो कारण तो आम्हा पांडवांचा गुरू आहे. माझा युद्ध करण्याचा निर्णय त्याने तपासून त्याचे मत सांगावे. मी कृष्णाला ते सांगण्यासाठी सांगतो कारण, तो आम्हा पांडवांचा व कौरवांचा सारखाच चाहता आहे. हे युद्ध केवळ आमची संपत्ती मिळवण्यासाठी होणार आहे असें तुला वाटते ते उचित नाही. ह्या युद्धा मागे एक क्षत्रिय शिस्त अमलात आणण्याचा उद्देश आहे. हे संजया लक्षात घे. दुर्योधन त्याची क्षत्रिय मर्यादा ओलांडत आहे त्यामुळें तो सगळयांना त्रासदायक होणार आहे जर तो पृथ्वीचा मालक झाला. म्हणून त्याला त्याची मर्यादा दाखवणे व सगळया पृथ्वीला त्या आपत्तीपासून वाचवणे हा ह्या युद्धामागील प्रमुख उद्देश आहे. त्या कौरवांचा निःपात करणे हा ह्या युद्धाचा उद्देश अजिबात नाही. परंतु, जर ते सगळे मारले गेले तर ते विधात्याला मंजूर होते असें समजावयाचे. जसें कृष्णाने भिमाच्या मदतीने जरासंधाला ठार मारले तसे हे होणार आहे. कृष्ण पांडवांच्या मदतीने त्या शंभर दैत्यांचा विनाश करणार आहे. अशा मोठ्या समरात इतर मरतात पण त्याची चिंता करावयाची नसते कारण ते पुन्हा जन्मणार आहेत व त्यांचे भोग त्यांना पुन्हा यथास्थित परत मिळणार आहेत. कोणाचेही कांहींच नुकसान होणार नाही. परंतु, अमर्यादा करणाऱ्याला अडवल्यामुळे कांहीं काळासाठी पृथ्वी समाधानात रहाणार आहे. आम्ही सगळे कृष्णाच्या आज्ञेत काम करणार आहोत. त्यात छेड्डी, अंघक, वृश्नी, भोज, कुकुर, श्रींजय सामील आहोत. वृश्नी आणि अंधकांचा प्रमुख आहे उग्रसेन, विभ्रू काशीनरेश जो कृष्णाला त्याचा बंधू मानतो, तो त्याच्या कृपेमुळें संपन्न झाला आहे. योग्य काय व अयोग्य काय ते समजण्याची कृष्णाची क्षमता विलक्षण आहे. आम्ही सगळे पांडव व आमची भार्या त्याला फार मानतात म्हणून, आता

जर कृष्ण त्याचे विचार ह्या संदर्भात सांगेल तर ते येथे जमलेल्या सगळयांना चांगलेच मार्गदर्शक होईल".

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व

## भाग एकोणतिसावा

ते ऐकल्यावर कृष्ण बोलतो, "अरे प्रिय संजया, जर युद्ध झाले तर पंडुची मुलं मारली जाण्याची शक्यता नाही. कारण विधीनुसार ते त्या युद्धानंतर सगळया पृथ्वीचे तारणकर्ते म्हणून राज्य करणार आहेत. तरी मी धृतराष्ट्राच्या सुखासाठी दुवा करतो. धृतराष्टाराला जो शांतता करार मंजूर आहे तो पांडवांच्या भल्याचा नसल्यामुळें त्या प्रमाणें शांतता करार होणार नाही. शांतता करार हितकारक असावा लागतो. दोघांना न्याय देणारा शांतता करार जर तू आणला असतास तर तो मान्य झाला असतां, ज्यात पांडवांचे स्वमेहनतीचे इंद्रप्रस्थ त्याना मिळाले असते. परंतु, तुमचा प्रस्ताव न्याय देणारा नाही. युधिष्ठीराच्या संयमाचा अगदी वेगळा अर्थ दुर्योधनाने व त्याच्या मित्रांनी काढला व त्याप्रमाणे तो प्रस्ताव तयार केले गेला आहे ते स्पष्टपणे दिसते. संयम म्हणजे कमजोरी असा जर तो समंजत असेल तर त्या संयमाची दुसरी बाजू त्याला लवकरच पहावयास मिळणार आहे. पांडवांनी युधिष्ठीराच्या नेतृत्वाखाली एक अगदी आगळे वेगळे संयमाचे उदाहरण दिले आहे. जे तिन्ही युगात मिळणे अवघड आहे. त्या उलट धृतराष्ट्राची मुलं स्वार्थीपणाचे भयंकर उदाहरण दाखवत आहेत. अशा परिस्थितीत जर वैरभाव वाढला तर त्यात नवल ते काय? योग्य आणि अयोग्य ह्यांचे गुण दाखवण्याचे जे प्रयत्न झाले तुझ्या व युधिष्ठीराच्या बोलण्यात ते छान होते. त्यात आपला मुद्दा खरा हे दाखवण्याचा प्रयत्न होता हे मी समजलो. युधिष्ठीर त्याच्या परिवाराच्या हिताबद्दल सावध आहे जसें परिवाराच्या मुख्याला असावे लागते. त्याचे नितीशास्त्राचे ज्ञान पूर्ण आहे. त्यामुळें तो त्या बाबत मोठी चूक करणार नाही. फक्त त्याचा संयम जरा जास्त होता व त्याचा चुकीचा अर्थ कौरवांनी व कांहीं वेळा त्याच्या स्वकीयानी सुद्धा घेतला ही वस्तुस्थिती आहे. ह्यात

क्षत्रियांचे विचार आणि ब्राह्मणांचे विचार ह्यात मतभिन्नता दिसते. कांहीं ब्राह्मण सांगतात, कर्मयोग हाच मार्ग आहे यशासाठी, दुसरे कांहीं सांगतात, कर्मयोगापेक्षा त्यागबुद्धी श्रेष्ठ आहे ज्ञान मिळवण्यासाठी. ब्राह्मण म्हमतात, केवळ अन्नाची माहिती असून पोट भरत नाही, त्यासाठी प्रत्यक्ष अन्न खावे लागते म्हणून कर्मयोग मोठा असें समजतात. म्हणून कर्मयोगाने वास्तविक फलप्राप्ती होते परंतु, त्यात रमल्यामुळें अध्यात्माकडे दुर्लक्ष होते कारण कर्मयोगात त्यांचा मोठा काळ व्यतीत होत असतो. कांहीं सांगतात, देवांचे प्रभुत्व त्यांच्या कर्मयोगात असते. निसर्ग कर्मयोगाचे उत्तम उदाहरण आहे. सूर्य नित्य उगवतो, पाऊस नेहमी वेळेवर येतो. म्हणून कर्मयोग श्रेष्ठ समजला जातो कांहींच्या दृष्टीने. सगळे निसर्ग कर्मयोगाच्या कार्यक्रमात अडकले आहे. तसेंच देवसुद्धा त्यांच्या कार्यात सदैव गुंतलेले असतात. पृथ्वी स्वताभोवती व सूर्याभोवती सतत फिरत आहे हे तिच्यातील कर्मयोगाचे उदाहरण आहे. अशी बरीच उदाहरणं दाकवली जातात ज्यांने कर्मयोगाचे श्रेष्ठत्व स्पष्ट होते. नद्या सतत वाहतात, वारे वाहतात, ऋतु येतात व जातात नियमानुसार ही आणि अशी अनेक उदाहरणं कर्मयोगाची आहेत. देव अशारितीने त्यांचे कार्य कर्मयोग्याप्रमाणे करत असतांना त्याचवेळी ते संयमाने जगत असतात असेसुद्धा आढळते. त्या संयमामुळें ते अध्यात्मात श्रेष्ठ ठरले कारण संयम हा आणखीन एक गुण यशस्वी होण्यासाठी महत्वाचा आहे. संयमामुळें इंद्र सगळया देवांत श्रेष्ठ ठरला. संयम म्हणजे भोगात न रमणे. ब्राह्मण श्रेष्ठ ठरतात जरी ते कोणतेही कर्मयोगी कार्य करत नाहीत. ते दान मागून त्यावर जगतात जे दान त्याना समाजातील कर्मयोगी देत असतात. तरी ब्राह्मण त्या दान करणाऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजले जातात. सगळे रुद्र, वसु, राजा यम, कुबेर, गंधर्व, यक्ष आणि स्वर्गीय अप्सरा हे सगळे त्यांच्या कर्मयोगामुळें त्यांच्या स्थितीला पोहोचले आहेत. परलोकात संत अभ्यास करून त्या कर्मामुळें चमकतात. त्यांचे तेज कर्मयोग आणि संयम अशा दोनांमुळें त्यांना प्राप्त होत असते. हा नियम शहाणे ब्राह्मण, क्षत्रिय आणि हुशार वैश्य आचरणात आणतात. अरे संजया तू कां एवढी मेहनत

कौरवांसाठी करतक आहेस"? तुला माहीत आहे युधिष्ठार सतत वेदाचा अभ्यास करत असतो. त्याने अनेक अश्र्वयज्ञ केले आहेत. राजसुय यज्ञ केला आहे. तो त्याच्या क्षत्रिय वर्णाच्या नियमानुसार सगळी काम करत असतो. परंतु, जर तुम्ही असा पर्याय आणला कीं, त्यामुळें कौरवांचा विनाश न करता त्यांचे उद्देश साध्य होतील तर ते युद्ध करणार नाहीत. त्यामुळे कदाचित चांगले होईल सर्वांसाठी. परंतु, जर तसे प्रस्ताव तुम्ही आणत नसाल तर भिमाच्या, अर्जुनाच्या, नकुलाच्या आणि सहदेवाच्या सामर्थ्याला त्यांना तोंड द्यावे लागेल हे निर्विवाद. त्यांची जमीन ताब्यात घेणे हे त्यांचे क्षत्रिय म्हणून कर्तव्य ठरते. त्यामुळें जे मारले जातील ते चांगलेच ठरणार आहे. चोराला शिक्षा करणे हे राजाचे कर्तव्य असते, कौरव चोर आहेत म्हणून त्या मोठ्या चोराला वठणीवर आणण्यासाठी युद्धासारखा दुसरा पर्याय मला तरी दिसत नाही. अरे संजया तू आपल्या चार वर्मांचा विचार कर. त्यात प्रत्येकाला विशेष कार्य आखून दिले आहे. आता ऐक पांडव त्यांचे काम कसे करणार आहेत. ते ऐकल्यावर तू ठरवशिल त्यांचे कार्य प्रशंसनिय आहे कां निंदनीय.

ब्राह्मण त्याच्या कर्तव्यात अभ्यास करणे, यज्ञ करणे, दान करणे आणि तीर्थयात्रा करणे त्याशिवाय योग्य शिष्य मिळाल्यास त्याला शिकवणे, सत्पात्र यजमानासाठी पौरोहित्य करणे, माहित असलेल्या यजमानाकडून दान स्वीकारणे अशी कामं खऱ्या ब्राह्मणांकडून अपेक्षित असतात.

क्षत्रियाचे कार्य असते, त्याच्यावर अवलंबून असणाऱ्यांना संरक्षण देणे, सदैव ब्राह्मणांना दानं करणे, वेदाचा अङ्यास करणे, गृहस्थाश्रम सांभाळणे जर ती कामं तो प्रामाणिकपणे करत असेल तर तो मृत्यूनंतर देवलोकी जातो.

वैश्य वेदाचा अभ्यास करतो, सच्चाईने व्यापर उदीम करतो व धन संचय करतो. शेती करतो, पशुधन सांभाळतो, राज्याचे आर्थिक व्यवहारात हातभार करतो. तो ब्राह्मण आणि क्षत्रियांना मदत करतो. तो गृहस्थ असतो.

प्राचीन काळांपासून शुद्राची कर्तव्ये कोणती ती सांगितली आहेत. शुद्र वरील तीन वर्गाच्या लोकांना त्यांच्या कार्यात मदत करणार. तो वेदाचा अभ्यास करणार नाही. तो यज्ञ करणार नाही. तो चांगुलपणाने सगळयांना मदत करील.

आता संगतो राजाचे कर्तव्य, राजा त्या तीन वर्णाच्या लोकांना संरक्षण देईल. चारही वर्णाचे लोक त्यांची काम योग्यप्रकारे करतात कीं नाही ते पाहिल. राजा सुखोपभोगात रमणार नाही. तो वैराग्यपूर्ण जीवन जगेल. तो कधीही न्याय देतांना पक्षपात करणार नाही. राजा चांगुलपणा व भूतदया सांभाळून राज्य करील. राज्यातील कोणीही प्रजाजन राजाला कधीही भेटू शकला पाहिजे. जो हे नियम पाळत नाही तो राजा वाईट राजा समजला जातो.

वाईट राजाची लक्षणं अशी सांगितली आहेत. तो प्रजाजनांच्या संपत्तीवर नजर ठेवून प्रजेला कराच्या नावांनी लुटतो. त्यामुळे अराजक व बंडाळी राज्यात सुरू होते व त्याचा फायदा परराज्याचा राजा घेऊन आक्रमण करतो. त्यातून लढण्याची आयुध तयार झाली. इंद्राने अनेक आयुध उत्पन्न केली ज्यामुळें अशाप्रकारे लुट करणाऱ्यांचा नाश झाला. चोराला ठार मारणे हे त्या काळी (कृत युगात) धर्म कार्य समजले जात होते. त्याच वेळी अनेक व्याधक शक्ती त्यात उत्पन्न झाल्या होत्या. त्याप्रमाणे ह्यावेळी कुरु घराण्यात त्या जन्म घेऊन आलेल्या आहेत. त्यांची बंदोबस्त करण्यासाठी पांडवांना युद्ध करावे लागेल कारण त्यांची त्यासाठीच नेमणूक झाली आहे. पांडवांचा जो छळ झाला त्यावरून ब्रह्मदेवाकडे सुचीत झाले कीं, कौरव हे खरोखरच विनाश करण्या सारखेच आहेत. तो त्रास सहन करणे ह्यात पांडवांची योग्यता सिद्ध झाली आहे. जरी वरकरणी पांडव नाहक ते भोगत होते, तरी त्या भोगामुळें पांडवांची अध्यात्मिक योग्यता सिद्ध झाली. कौरवांना सुधारण्यासाठी भरपूर वाव होता परंतु, ते सुधारण्यास तयार नव्हते म्हणून आता त्यांचा संहार करणे हा एकच पर्याय उरलेला आहे. म्हणून अरे संजया, हे युद्ध होणारच व त्यात कौरवांचा

निःपात होणार हे विधीलिखीत आहे. तू स्वतः त्यांच्या पापमय कृत्याचा आढावा घे, म्हणजे तुला समजेल कौरवांचा नाश होणे चांगुलपणाच्या स्वास्थ्यासाठी किती आवश्यक आहे. त्यांचे त्या वेळचे राजसभेतील वागणे तू पाहिले आहेस. हे पहा कुरुंचा प्रमुख भिष्म परंतु, तो सुद्धा कांहीं बोलत नाही जेव्हां द्रौपदीला खेचून राजसभेत दुःशासन आणत होता. त्याशिवाय सगळे कौरव त्याठिकाणी उपस्थित होते पण कोणीही त्या दुःष्कृत्याबद्दल आक्षेप घेतला नाही. जर त्यापैकी कोणी त्या पापकृत्याला थांबवले असते तर मी समजलो असतो कीं, कांहीं लाजशरम धृतराष्ट्राच्या लोकांत आहे. त्यामुळे त्याच्या मुलांचे जीव वाचले असते. तेथे सभेत सगळे वडीलधारे असतांना दुःशासन असें कृत्य करतो ह्यातच त्यांच्या नाशाची बीज होती. एक विदूर सोडले तर इतर कोणीही कां त्या कृत्याला आक्षेप घेतला नाही? काय ते सगळे मूर्ख होते? त्यावेळी नैतिकतेचा कायदा काय ते तू सुद्धा त्या सभेत सांगितला नाहीस. आणि आता तू मोठ्या संभावितासारखा त्यांच्या बाजूने बचावाची भाषा करण्यासाठी आला आहेस. ह्याचा अरंथ मी काय समजावा"? द्रौपदाने मात्र परिस्थिती हुशारीने सांभाळून पांडवांची त्या पहिल्या अरिष्ठातून सुटका केली. त्यावेळी कुलिन क्षत्रियांना न शोभेल असें प्रस्ताव तिच्यापुढे कौरव ठेवत होते. त्यात कर्ण कांहीं कारण नसतांना तिचा अपमान करणारे वक्तव्य करत होता. त्याच्या वक्तव्यामुळे नैतिकतेच्या सगळया मर्यादा ओलांडल्या गेल्या होत्या. अशी माणसं कुलिन क्षत्रिय म्हणण्यास अयोग्य होती. त्या अपमानकारक बोलण्याचा फार घातक परिणाम अर्जुनाच्या काळजावर झाला होता. त्यावेळी पांडव चर्मवस्त्र घालून निघाले तेव्हां दुःशासन बोलला कीं हे हिजडे वनात जात आहेत. कोणाला तो हिजडे बोलला त्याचा जाब विचारण्याचा हक्क पांडवांना आहे हे तू नाकारू शकणार नाही. त्यानंतर गांधार राज्याचा युवराज शकूनी युधिष्ठीराला बोलतो, "नकूलाला मी जिंकले आहे

आता कोणाला डावात लावतोस"? आता तुझी बायको लाव असें त्याला तो सुचवतो, ते सगळे तू तेथे होतास व ऐकत होतास, मी स्वतः त्यांच्याकडे जाऊन हा मामला सोडवणार होतो पण तो होणार नव्हते. कारण मी दुसरीकडे गुंतलो होतो. विधिलिखीत वेगळे आहे व म्हणून आता अर्जुन आणि भिमाच्या हातून बहुतेक कौरव मारले जाणार आहेत. त्या सभेत कौरवांचे लोक पांडवांचा अपमान करत होते. त्या सगळया अपमानाचा बदला घेण्याचा हक्क पांडवांना आहे हे लक्षात असू दे. कौरव रुपी वृक्ष पापमय वृक्ष ज्याची मुळं आहेत धृतराष्ट्र, खोड आहे दुर्योधन, कर्ण आणि इतर कौरव त्याच्या फांद्या, व दुर्योधन त्या वृक्षाचा आत्मा आहे. तो वृक्ष पांडव मुळासकट उपटून टाकणार आहेत. युधिष्ठीर एक चांगुलपणाचा वृक्ष आहे. त्याचे खोड आहे भिम फांद्या, माद्रीचा मुलं त्यावर आलेला बहार आहे, त्याचे मुळ आहे मी स्वतः परमेश्ध्वर व इतर ब्राह्मणं. पंडुची मुलं धृतराष्ट्राला सांभाळावयाला तयार आहेत जरी कौरव मारले गेले त्या युद्धात. पांडव कौरवांचे विषारी झाड उपटून काढण्यास तयार आहेत. धृतराष्ट्राला सांग कीं, तो योग्य निर्णय घेईल ज्यांमुळें त्याचे उर्वरीत आयुष्य सुखात जाईल. जरी युद्ध झाले व सगळे कौरव मारले गेले तरी धृतराष्ट्राची काळजी पांडव त्यांच्या पित्याप्रमाणें घेतील असें तू त्याला जाऊन सांग. जर कौरव युद्ध न करता पांडवांचा हिस्सा देण्यास तयार असतील तर सगळे कांहीं आनंदात होईल. आता हा जुगाराचा डाव दुर्योधनांने खेळून दाखवावा. त्यात शकूनी त्याला उपयोगी येणार नाही.

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग एकोणतिसावा संपला.

## संजय ज्ञान पर्व

## भाग तिसावा

ते कृष्णाचे ऐकून संजय त्याला बोलतो, मी आपला निरोप घेतो. अहो पुण्यवान राजांनो, आपल्याला समृद्धी प्राप्त होवो. तो पुढे म्हणतो, "मला आशा आहे कीं, मी माझ्या बोलण्याने आपल्यापैकी कोणाचे मन दुखावले नाही". त्यानंतर तो जनार्दनाचा निरोप घेतो. भिम, अर्जुन आणि नकूल, सहदेव अशा सगळया पांडवांचा तो निरोप घेतो. त्याशिवाय सत्यकी, चिकेतन, त्यांना सुद्धा तसेंच बोलून त्यांचासुद्धा निरोप घेतो. आपण सगळे सुखी व समृद्ध रहा असे बोलून त्याच्या भावना व्यक्त करतो. आपम सगळे राजे माझ्याकडे कृपादृष्टीने पहातील अशी मी आशा करतो असें बोलतो. युधिष्ठीर त्याला सांगतो, "आमची तुला जाण्याची परवानगी आहे. तू सुखानेव जाऊ शकतोस. तू आमच्याबद्दल कधीही वाईट समजू नकोस. सगळयांना माहीत आहे कीं, तू शुद्ध मनाचा पवित्र माणूस आहेस. तू आमच्या कडे कौरवांचा वकील म्हणून आला आहेस, तू एक प्रामाणिक इसम आहेस, आम्ही तुझ्याबद्दल प्रेमभाव धरून आहोत. तुझी वर्तणूक उत्तम आहे. तुझे मन पूर्वग्रहानें दुषित झालेले नाही. तुझ्यावर रागावून कोणी बोलले तरी तू रागवत नाहीस हे तुझ्या व्यक्तिमत्वाचे विशेष आहे. तू कधी कटू बोलत नाहीस. तुझे बोलणे सौजन्यपूर्ण असते. सगळया प्रतिनिधीत तू मला खूप आवडतोस. तुझ्या प्रमाणें आणखीन एक महानुभाव आहे तेथे ज्याचे येथे नेहमीच स्वागत होईल, ते आहेत आमचे काका विदूर. आम्ही एकेकाळी सतत भेटत असू. तू आमच्यासाठी एक प्रामाणिक मित्र आहेस जसा आमचा जनार्दन. तू आता निघून तेथे असलेल्या पवित्र ब्राह्मणांच्याकडे लक्ष दे. जे ब्रह्मचर्य पाळत आहेत. ते वेदांचा अभ्यास करत आहेत. भिक्षूकीचे जीवन जगत आहेत. जे सदैव वनात रहातात, त्याशिवाय इतर जे ध्यानसाधना करत आहेत त्या सगळयांना माझा प्रणाम सांग. त्यांच्या क्षेमकपशलाची चौकशी

माझ्यावतीने करायला विसरू नकोस. धृतराष्ट्राचे पुरोहित व ऋग्द्विज अशा सगळयांना माझा निरोप दे. त्यात कांहीं तरूण आहेत त्यांचीसुद्धा विचारपुस कर. त्या सगळयांना माझ्यासाठी प्रार्थना करावयाला सांग. हस्तिनापुरात रहाणाऱ्या वैश्यांचीसुद्धा माझ्यावतीने विचारपुस कर. आमचे गुरू द्रोण त्यांचा पुत्र अश्वत्थामा, अशा सगळयांना माझा प्रेमभरा नमस्कार सांग. ते दोघे ब्रह्मचर्य पालन करणारे आहेत म्हणून त्यांना माझ्यावतीने धन्यवाद दे. त्यानंतर तू स्वरद्वताचे पुत्र व आमचे शिक्षक कृपाचार्य ह्यांच्या निवासी जा व माझा व माझ्या भावांचा आदरपूर्वक प्रणाम त्यांना दे. माझ्यावतीने त्यांचे पाय धर व त्यांना माझ्यासाठी ब्रह्माकडे प्रार्थना करण्याची विनंती कर. त्यानंतर तू भिष्माचार्यांस माझा नमस्कार देशिल. ते आमचे आजोबा आहेत. त्यानंतर तू आमचे चुलते धृतराष्ट्र ह्यांना आमच्यावतीने प्रणाम करशिल. जे सध्या कुरु घराचे मुख्य आहेत. तू आमच्या चुलत भावाला दुर्येधनालासुद्धा आमच्या शुभेच्छा कळव. कारण त्यांची त्याला पुढच्या काळात फार गरज भासणार आहे हे त्याला न विसरता सांग. कौरवांच्या सभेचे सदस्य वल्हिक, जे आमच्यात सलोखा नांदावा ह्यासाठी प्रार्थना करत असतात त्यांना माझ्या शुभेच्छा देशिल. त्याच प्रमाणे, सोमदत्त, जे त्याच्या दयाळू मनासाठी ख्यातनाम आहेत, त्यांचा मुलगा, जो आदरणीय आहे त्यालासुद्धा आमचे नमस्कार दे. त्याच्या दरबारी कारभाऱ्यांसह सगळयांना आमचे आदरपूर्वक नमस्कार देशिल. त्या सभेत आणखीन बरेच आहेत जे वयाने मोठे व आमच्यावर प्रेम करणारे आहेत त्या सगळयांना आमच्या शुभेच्छा देशिल. जरी ते आमच्याशी लढणार असले कौरवांचे मिंधे आसल्यामुळें, त्यांच्या मनात आमच्या बद्दल जे प्रेम आहे ते मी ओळखतो, असें त्यांना भेटून सांग. त्यामध्ये, केकय, वसतीस, शल्वक, अमवशथ, त्रिगर्त, त्याच प्रमाणे, पूर्वेकडून आलेले आणि उत्तरेकडून आलेले, दक्षिणेकडून आणि पश्चिमेकडून आलेले अशा सगळया योद्ध्यांना आमच्यावतीने अभिवादन करावयाला विसरू नकोस. ते सगळे चांगले आहेत पण त्यांना आमच्याशी लढावे लागणार आहे तरी आमच्या भावना त्यांना सांग.

हत्तीदलातील घोडदळातील, पाईक अशा सगळयांना आमच्या भावना सांग. धृतराष्ट्राच्या वैश्य पत्नीची व तिच्या मुलांची, भुरश्रवाची विचारपुस करण्यास विसरू नकोस. त्याला विदूराप्रमाणें फक्त शहाणपणाने सगळे प्रश्न सोडवायला आवडते व म्हणून तो मला फार प्रिय आहे. चित्रसेन जो द्युतात प्रवीण आहे त्याला माझा नमस्कार सांग. जाता जाता माझा नमस्कार शकूनीलासुद्धा दे. जो खोटा जुगार खेळण्यात तरबेज आहे. तो लढण्याच्या दृष्टीने निरुपयोगी आहे. ज्याच्यामुळें ही परिस्थिती उद्भवलेली आहे. वृकर्तनाचा मानस पुत्र कर्ण, त्याला सुद्धा आमच्या शुभेच्छा दे. त्याची कौरवांची बुद्धी भ्रष्ट करण्याची क्षमता विलक्षण आहे. जो आमच्या विरुद्ध सतत कान भरत होता तरी मी त्याला रागवत नाही कारण तो लवकरच नष्ट होणार आहे. एकापरीने कर्ण आमचा सर्वात ज्येष्ठ भाऊ आहे त्याची त्याला आठवण करण्याचा प्रयत्न जर तू करू शकलास तर बरे होईल. त्याला सांग जर तो आमच्यात आला तर मी त्याची सेवा करीन. विदूरांची सुद्धा तू आमच्यावतीने चौकशी करशिल. ते नेहमी आमच्या हितासाठी काम करत आले आहेत. ते आमच्यासाठी आई बाप गुरू स्थानी आहेत. ते आमचे मार्गदर्शक राहीले आहेत. कुरु घरातील सगळया स्त्रियांना आमचा नमस्कार द्याल. त्या सगळया आमच्यासाठी माता समान आहेत. त्याच्या प्रेमभऱ्या वागण्याला आम्ही विसरलो नाही हे त्यांना सांग. त्यांना सांग की, मी त्यांच्या भल्यासाठी नेहमी प्रार्थना करत असतो. कौरवांच्या सगळया बायका उच्च घरातील आहेत. त्यांना सांग कीं, मी त्यांच्या भल्यासाठी प्रार्थना करत असतो. त्या सगळया त्यांच्या संसारात सुखी रहाव्यात अशी प्रार्थना मी करतो ते त्या महिलांना सांग माझ्यावतीने. त्या घरातील सगळया नोकरांना व त्यांच्या कुटूंबियाना माझ्या शुभेच्छा दे. त्यांत कांहीं अपंग आहेत त्यांची विचारपुस माझ्यावतीने कर. मला आशा आहे कीं, धृतराष्ट्राची मुल तुला आदरानी वागवतात. तेथे राज्यात असलेल्या सगळया अपंगाना माझ्यावतीने शुभेच्छा दे. त्याना माझ्यावतीने सांग कीं, गेल्या जन्मात जी पापं त्यांनी केली त्यामुळें ते असं जगत आहेत म्हणून ह्या जन्मात ते निष्पाप

जीवन जगतील अशी प्रार्थना मी त्यांच्यासाठी करत आहे. तेथे असलेल्या परदेशी रहिवाश्याना सांग कीं, मी सुरक्षित आहे. युद्धासाठी जमलेल्या योद्ध्याना सांग कीं, आमची लढाई न्यायासाठी आहे कारण आम्ही सत्याच्या बाजूने आहोत आम्ही जिंकणार आहोत जर युद्ध झाले. अरे संजया, त्या दुर्योधनाला माझा निरोप दे कीं, जी इच्छा तुला आयुष्यभर सतावत आहे कीं, तू एकटाच त्या राज्याचा राजा म्हणून रहावास, ती तुझी इच्छा पूर्ण होणारी नाही. कारण ती चुकीच्या विचारांवर आधारलेली आहे. आम्ही स्वतः तुला त्रास देऊ इच्छित नाही पण जर तुला आमच्याशी लढावयाचेच असेल तर ते युद्ध होईल. कारण इंद्रप्रस्थ आमचे आहे व ते आम्ही घेणारच.

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग तिसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व

## भाग एकतिसावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, अरे संजया, चांगुलपणाने वागणारे, वाईटपणाने वागणारे, म्हातारे व तरूण, शक्तीमान अथवा कमजोर असें सगळे त्या विधात्याच्या नियंत्रणानुसार काम करत असतात. त्याच्या मायेने लहानगा शहाणा होतो व मोठा लहाना सारखा वागत असतो. जर धृतराष्ट्राने तुला आमच्या बळाबद्धल विचारले तर सगळे खरे सांगून टाक. अरे गवालगणाच्या पुत्रा, माझा सलाम तुझ्या मालकाला दे. त्याचे पाय आमच्यावतीने पकडून त्यांच्या तब्यतेची चौकशी कर. त्यांना सांग जेव्हां ते सभेत सगळयांच्यात बसलेले असतांना त्यांना सांग, पंडुची मुलं सुखरुप आहेत. तुमच्या कृपेमुळें ते मजेत आहेत. त्यांनी तुम्हाला त्यांचे राज्य दिले आहे ते त्यांना आता परत पाहिजे आहे. जर ते चांगल्यारितीने त्याना मिळाले तर उत्तम, नाहीतर ते युद्ध करून ते व त्याबरोबर सगळे राज्य काबीज करणार आहेत. त्यामुळें जो सर्वनाश होईल त्या युद्धाची जबाबदारी तुमची असेल आणि त्याचे दुष्परिणाम तुम्हाला भोगावे लागणार आहेत ह्या सगळ्या गोष्टी पाहून काय तो निर्णय आपण घ्यावा असा माझा निरोप दे. त्यानंतर अरे संजया तू आमच्या आजोबांना, भिष्माचार्यांना आमच्यावतीने वंदन करून बोलशिल, "जेव्हां शंतनुचा वंश मारला जाईल तेव्हां, तो वंश पुनः जीवंत करण्यासाठी आपल्या मनाने निर्णय घेऊन आपले नातू सुखाने कसे राहतील त्याचे पहावे. त्यानंतर आपण आमच्यावतीने विदूराला सांगाल, जे कौरवांचे सल्लागार आहेत. जे नेहमी शांतता राखण्याचा प्रयत्न करत असतात. ते नेहमी आमच्या भल्याचा विचार करत असतात. त्यानंतर तू त्या उद्धट दुर्योधनाशीसुद्धा आमच्यावतीने बोलशिल. त्याला पुनः पुन्हा सांग कीं,युद्धामुळें कौरवांचा सर्वनाश होणार आहे कारण कौरव त्याच्या केवळ संख्याबळावर व एकट्या दुकट्या कर्णासारख्या वीराच्या बळावर युद्ध जिंकू शकणार नाही. द्रौपदीचा भर सभेत जो उपमर्द झाला त्याची मोठी किंमत त्याला द्यावा लागणार आहे. जरी त्यांने आम्हाला

इंद्रप्रस्थ देऊन टाकले तरी तो हिशोब उरतोच. आम्हाला सगळयांचा नाश करण्याची इच्छा नाही पण कांहीं गोष्टींबाबत शिक्षा दुर्योधन दुःशासन आणि कर्णाला भोगावा लागणार आहेच. पांडवांनी विनाकारण बरेच कांहीं सहन केले आहे. जरी ते कौरवांपेक्षा कितीतरी सामर्थ्यवान आहेत. त्या त्यांच्या सहनशिलतेचा गैरफायदा घेतला गेला आहे त्या सगळया गोष्टींचा निवाडा करण्याची वेळ आली आहे. ते सगळे कौरवांना समजत नाही असें नाही परंतु, त्याची वाच्यता करण्याची आवश्यकता आता आम्हाला वाटत आहे. दुःशासनाने द्रौपदीचा भरसभेत अपमान केला त्याचा हिशोब तुला, कर्णाला व दुःशासनाला द्यावा लागणार आहे. द्युताच्या बहाण्याने तू आमची संपत्ती व राज्य गिळंकृत केलेस ते एक चौर्य कर्म होते. म्हणून त्याबद्दल तुम्हाला शिक्षा होणे क्रमप्राप्त आहे. तत्त्वतः आम्ही शांतता अपेक्षित असले तरी जर मुकाट्याने कौरव त्यांची चूक मान्य करून व जाहिरपणे दुरौपदीची माफी मागत नाहीत व आमचे आम्हाला देत नाहीत तोवर युद्धाची टांगती तलवार त्यांच्या माथ्यावर रहाणार आहे. शांततेसाठी आम्हाला इंद्रप्रस्थ नाही तर एक प्रांत द्यावा जसें कुशस्थल, वृतस्थल, माकंदी, वरनावळ कोणतेही दिले तरी चालेल. असें करून हा युद्धाचा प्रसंग व त्यामुळें होणारा नरसंहार आपण टाळू शकता. अरे संजया त्याला सांग आम्हा पांच भावांना पांच गांव द्या. आणि हे युद्धाचे अरिष्ठ टाळा. आम्हाला तुमच्या संपत्तीची हाव नाही. आम्हाला कुरु घराण्यात शांतता रहावी अशी कामना आहे. त्याला सांग संजया, पांडवांना कौरवांबरोबर खेळीमेळीने एकत्र रहाण्याची इच्छा आहे. त्यांना आनंदात त्यांच्या लेकीसुनांसह रहात असल्याचे पहावयाचे आहे. पण जर ते मान्य झाले नाही तर युद्ध होईल व त्यात कौरव नष्ट होतील. आम्ही शांतता आणि युद्ध दोन्हीमध्ये प्रबळ आहोत हे लक्षात घेऊन काय तो निर्णय घ्या. आम्हाला संपत्ती आणि पुण्य कसे मिळवावयाचे ते चांगले माहीत आहे.

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग एकतिसावा संपला.

# संजय ज्ञान पर्व संपले

## भाग बत्तीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, पांडवांकडून सन्मानपूर्वकपणे निरोप घेऊन तो धृतराष्ट्राचा वकील, संजय हस्तिनापुराला जातो. तेथे पोहोचल्यावर त्वरित तो द्वारपालाला सांगतो कीं, राजाला कळवं कीं, मी संजय आलो पांडवांना भेटून आलो आहे. तो पुढे त्या द्वारपालाला सांगतो जर राजा तयार असेल तर माझी व त्यांची भेट लवकर होणे अगत्याचे आहे. ते ऐकून तो द्वारपाल आत वाड्यात जातो व संजयाचा निरोप धृतराष्ट्राला जसा संजयाने सांगितला तसांच देतो. तो सांगतो कीं, पांडवांकडे गेलेले आपले वकील संजय युधिष्ठीराचा संदेश घेऊन आला आहे व आपल्याला त्वरित भेटण्याचे बोलत आहे. ते ऐकून राजा धृतराष्ट्र त्या द्वारपालाला सांगतो, संजयाचे स्वागत असो. त्याला सांग कीं, मी त्याची उत्कंठापूर्वक प्रतिक्षा करत आहे. त्यानंतर थोडे रागावून तो त्या द्वारपालाला बोलतो, "तू त्याला असें अडवत जाऊ नकोस, संजय कधीही माझ्या कक्षात येऊ शकतो. जा, त्याला ताबडतोब घेऊन ये".

वैशंपायन पुढे सांगतात, संजय त्यानंतर धृतराष्ट्राच्या भव्य महालात प्रवेश करतो. संजय, सुताचा पुत्र नमस्कार करत विचित्रवीर्याचा पुत्र धृतराष्ट्र ह्याला सामोरी जातो. त्याच्यापुढे उभाराहून तो सांगतो, "अहो राजन, मी संजय आपला सारथी व पांडवांकडे गेलेला आपला वकील संजय तेथे जाऊन आलो आहे व आता आपल्या समोर उभा आहे". तेथे गेल्यावर मी आपला निरोप युधिष्ठीरापुढे सादर केला. बुद्धीमान युधिष्ठीरानी आपल्या सगळयांची विचारपूस केली. त्यांना आपल्या मुलांची आपल्या सुनांची व नातवंडांची सुद्धा आस्थापूर्वक चौकशी केली व आपल्या सगळयांना शुभेच्छा दिल्या".

ते ऐकल्यावर धृतराष्ट्र त्याला सांगतो, "अरें मुला माझ्या शुभेच्छा अजातशत्रूला व त्याच्या भावंडांना दिल्यास कीं नाही? त्यांचे सर्व लोक खुषाल आहेत कां? त्याला त्याची गेलेली संपत्ती पुन्हा पाहिजे कां? तो वास्तविक संपत्ती आणि पुण्य संपत्ती मर्यादेत राहून कमावू इच्छितो. त्याच प्रमाणे त्याचे सगळे लोक आहेत". ते ऐकल्यावर संजय त्याला सांगतो, त्याला त्याची गेलेली संपत्ती पुन्हा पाहिजे आहे व जर ती आपण त्याला नाही दिली तर तो ती मिळवण्यासाठी आपल्याबरोबर युद्ध करण्याच्या जय्यद तयारीत आहे. त्याचे ज्ञान पूर्ण आहे, त्याचप्रमाणे तो धूर्तसुद्धा आहे. तो साधेपणा ज्याची आपल्याला सवय आहे तो मला त्याच्यात ह्यावेळी आढळला नाही. तरी त्याचे वागणे फार सुंदर होते. त्याचे वागणे पुण्यप्रभावी असले तरी व्यवहाराला धरून होते. कोणताही डावपेंच त्याच्यावर चालण्यासारखा नव्हता. त्याच्या वागण्यात त्याला सात्त्विक सुखाची ओढ असलेले मी पाहिले, माणसाचे वागणे त्याच्या दैवानुसार होत असते, आतापर्यंत जे त्यांनी भोगले त्याचा प्रभाव त्याच्या बोलण्यातून दिसत होता. त्यांने आपल्या सगळ्या पापकर्मांचा आढावा माझ्यापुढे मांडला. ज्या कौरवांच्या कुकर्मामुळें त्यांना अतोनात त्रास सहन करावा लागला त्याची माहिती त्यांने मला सांगितली. सहन करण्याच्या मर्यादेची त्यांनी मला कल्पना दिली. आपल्या मुलांनी जी कृष्ण कृत्यें केली त्याचा आढावा त्यांने घेतला व त्याची सद्द संपली आहे व आता आम्हाला त्यांना जाब द्यावा लागणार आहे. त्यांच्या बोलण्यातून क्रोध, सूड अशा भावना व्यक्त होत नव्हत्या. तो न्याय देण्याची भाषा करत होता. एकाद्या गुन्हेगाराला जसें शासन करावे लागते राजाला क्रोध, द्वेष व सूड अशा भावनांत न अडकता तसे, त्याचे बोलणे होते. तो तरीसुद्धा कांहीं बाबींच्या बाबत समझौता करण्यास तयार आहे असें मला दिसले. त्याच्या बोलण्यात धर्म (कर्तव्य), न्याय आणि हित हे सगळे साध्य करण्याचा उद्देश मला स्पष्ट दिसत होता. तो पूर्णतः सात्त्विक होता, रजोगुण अथवा तमोगुण त्याच्यात मला अजिबात आढळले

नाहीत. त्या विरूद्ध अहो राजन, आपले संपूर्ण वागणे धर्म, न्याय व हित ह्यांची प्रतारणा करणारे होते ते त्यांनी मला दाखवून दिले. त्याच्या म्हणण्याप्रमाणे आपल्या त्यांच्याशी तशा वागण्यामुळें सर्व जगात आपले नांव बदनाम झाले आहे. तसे वागणे आपल्यासा शोभत नव्हते ते त्यांनी मला सांगितले. विनाकारण वैर करणे हा तमोगुण आहे व तो दुर्योधनात आणि कर्णात भरपूर आहे आणि आपण त्यांच्याच सल्ल्यांने सगळे निर्णय घेता ते शंतनुच्या वंशाला काळीमा लावणारे आहे. आपले वागणे कुलिन क्षत्रियांला न शोभणारे होते. बहुधा केवळ गत कर्माच्या कारणांने कांहीं माणसें उच्च कुळात जन्म घेतात. परंतु, ते त्या कुळाच्या योग्यतेचे नसतात. तसे कांहींसे कौरवांच्या बाबत झाले आहे असें ते समजतात. भावनांच्या आवेगात अडकलेले विवेक घालवून बसतात तसें आपले झाले आहे असें तो पांडव मला सांगत होता. आपण चांगले काय व वाईट काय त्याच्या मर्यादा विसरलो होतो व त्यामुळें चुकीचे निर्णय आपण घेत होता. जे एका राजाला शोभणारे कृत्य नव्हते. आपले सल्लागार आपल्याला चुकीचे सल्ले देत होते. आणि आपण त्या प्रमाणे विवेकशून्यपणे वागत होता. त्याचे नंतर उत्पन्न होणारे परिणाम जर आपल्याला व आपल्या मुलांना व त्यांच्याशी संगनमत करणाऱ्यांना भोगावे लागले तर त्याची जबाबदारी शेवटी तुमचीच असेल असें तो सांगत होता. त्यांचा असा समज आहे कीं, जोवर दुर्योधन व त्याचे दोस्त आपले सल्लागार आहेत, पाडवांना त्याचे राज्य मिळणार नाही, म्हणून युद्धाच्या तयारीत ते आता पासून लागलेले आहेत असें मी पाहिले. युद्धात सगळें कौरव ठार मारले जाणार आहेत असें कृष्ण भाकित करत होता. देवाच्या इच्छेशिवाय काय ह्या जगात असें तो बोलत होता. अर्जुन स्वर्गात जाऊन तेथे साक्षात इंद्राकडून शस्त्रविद्या आत्मसात करून आला आहे, त्यावरून व्यक्तीगत प्रयत्नापेक्षा जास्त कांहींतरी असते ते आपण लक्षात घेत नाही. आपले शौर्य, आपली समृद्धी, आपसे यश हे सगळे त्या विधात्याच्या कृपेमुळें साध्य होत असते कारण आपले अस्तित्वच मुळी त्याच्या मर्जीवर विसंबून असते. असें असतांना माझे राज्य, मींच राजा रहाणार अशा

अज्ञानावर आधारित संकल्पनांना महत्व देणारा तुमचा मुलगा किती खोट्या अस्मितेत अडकला आहे त्याची मला त्याने जाणीव दिली. राजा बलीने किती संशोधन करून शेवटी तो समजला कीं, ह्या विश्वाचे सगळे कार्य ज्या विधात्याच्या मर्जीवर अवलबून आहे त्याला स्मरणे हेंच मुख्य कार्य असते. आपले यश अथवा अपयश त्यामागे त्या विधात्याची रचना कारण असते हे समजून नम्रपणे जो त्याची कामं करतो त्यालाच मनःशांती मिळते. आपले कान, डोळे, नाक, त्वचा, जिभ हे आपल्या ज्ञानाची कवाड आहेत. अहंकारातून उत्पन्न झालेल्या वासनांचे नियंत्रण केले तर ती कवाड आपल्याला खरे काय ते दाखवू शकतात. म्हणून वासनांध न होता जेव्हां आपण त्या ज्ञानेंद्रीयांचा उपयोग करतो तेव्हां आपल्याला ह्या विश्वाच्या कर्त्याची चाहुल लागते. ज्यांना ते समजत नाही ते वेगळया प्रकारे जगाचा अर्थ काढत रहातात. ते समजतात कीं, जर एकादा कर्तृत्व गाजवेल तर त्याला यश मिळणार. आणि जेव्हां त्याला कर्तृत्व गाजवूनही अपेक्षित परिणाम मिळत नाहीत तेव्हां तो भ्रष्ट बुद्धी बहकत जातो. परंतु, जर तो विधात्याला काय पाहिजे ते पाहून त्या प्रमाणे आपले कार्य केले तर त्याला यश येते. त्याशिवाय बलीने आणखीन एक गोष्ट ओळखली कीं, आपले यश अथवा अपयश आपल्याच मागीत जन्माच्या कर्मफलांचा परिणाम असतो. विधाता फक्त त्या कर्मफलांचे व्यवस्थापन करत असतो. म्हणजे, विधाता केवळ मात्र आपल्याच कर्म फळांचा व्यवस्थापक असतो. त्यात तो कोणत्याही प्रकारे बदल करत नाही. ही विश्वाची कार्य पद्धती जो समजला त्याला कधीं चिंता खात नाही, जशी आपल्याला खात आहे. असें युधिष्ठीर सांगत होता. सदैव विधात्याला स्मरून आपले कार्य करत रहाणे हेंच उत्तम गतीसाठी उचित असते. प्रेम, द्वेष अशा भावनांच्या आहारी जाणारा नेहमी त्या भावनांत अडकून रहातो. हितकारक काम करणार्याचे कौतुक होते. परंतु, जो निर्णय आपण घेत आहात, पांडवांना त्यांचे राज्य न देण्याचा, त्यामुळें अनेक निरपराध क्षत्रिय लोक नाहक मारले जाणार आहेत. युद्ध करण्या आधीं शहाणा राजकर्ता आपल्यासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या लढवय्यांच्या भवितव्याचा

विचार करतो. जर आपण त्यांना त्यांचे राज्य नाही दिलेत तर त्या चौर्यकर्माची शिक्षा म्हणून पांडव आपल्याशी युद्ध करणार आहेत व त्यामध्ये तो धनंजय कौरवांच्या सैन्याचा संहार करणार आहे. ही काळया दगडावरील रेघ समजावी. अहो राजन, आपल्या कमजोरीमुळें अनेक चुकीचे निर्णय आतापर्यंत घेतले गेले आहेत. त्याचा विचार करावा. त्या निरपराध लढवय्याच्या मृत्यूला आपण व आपला मुलगा जबाबदार असेल नाही कीं, पांडव हे लक्षात घ्यावे अशी ताकीद युधिष्ठीराने मला दिली आहे. आपल्याला उत्त सल्ला देणारे असूनही आपण चुकीच्या लोकांच्या कडून सल्ला घेता त्याचे परिणाम आपल्याला अनुभवावे लागणार आहेत. हे भव्य विस्तार असलेले साम्राज्य सांभाळण्याची आपली योग्यता नाही हे सिद्ध झाले आहे. त्यासाठी आपल्याला खाली खेचण्याचे कार्य पांडवांना नाईलाजास्तव करावे लागणार आहे. ते सांगितल्यावर संजय धृतराष्ट्राला बोलतो मी लांबचा प्रवास केला आहे त्यामुळें खूप थकलो आहे, पुन्हा उद्या राजसभेत मला अजातशत्रूवरील निवेदन करावे लागणार आहे तरी आपण मला रजा द्यावी.

अशारितीने संजय ज्ञान पर्व भाग बत्तिसावा संपला.

# प्रजागर पर्व सुरू

## भाग तेहतीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, राजा धृतराष्ट्र त्याच्या कारभाऱ्याला आज्ञा देतो कीं, त्याने जाऊन विदूरांना त्वरित हजर रहावयास सांगावे. तो संदेश घेऊन तो सेवक क्षत्रीच्या निवासस्थानी जातो आणि सांगतो, "अहो महापंडीत, आपल्याला आपले राजे त्वरीत बोलावत आहेत". ते समजल्यावर विदूर ताबडतोब सभेच्या दिशेने निघण्याची तयारी करतो. त्या संदेशवाहला सांगतो, "राजाला सांग, मी ताबडतोब येत आहे". तो संदेश घेऊन तो सेवक धृतराष्ट्राकडे जातो व सांगतो कीं, "राजे विदूर येतच आहेत".

धृतराष्ट्र आज्ञा देतो कीं, त्या दूरदृष्टी असलेल्या महान पंडीताला येताच माझ्याकडे आणावे. त्या प्रमाणे तो सेवक विदूरांना धृतराष्ट्राच्या कक्षात घेऊन येतो. विदूर आला आहे हे त्या अंध राजाला समजते. तो प्रेमांने आपल्या धाकट्या भावाचे स्वागत करत बोलतो, "अरे क्षत्री चल आपण आतल्या खोलीत जाऊन बोलू".

वैशंपायन पुढे बोलतात, विदूर त्या प्रमाणे धृतराष्ट्राच्या कक्षातील आतल्या खोलीत जातो व हात जोडून बोलतो, "आपण मला येण्याची आज्ञा केली म्हणून मी आपल्याकडे आले आहे. बोला काय काम निघाले"?

धृतराष्ट्र त्याला सांगतो कीं, "पांडवांकडे पाठवलेला त्यांचा वकील संजय, युधिष्ठीराला भेटून आला आहे. त्यांने मला जे सांगितले ते ऐकून माझी छाती धडघडू लागली आहे. उद्या तो राजसभेत युधिष्ठीराचे निवेदन सादर करणार आहे. संजयाच्या बोलण्यावरून नेमका संदेश काय ते समजले नाही

पण पांडव माझ्यावर फार रागावले आहेत एवढे मी समजलो. माझी बेचैनी पराकोटीची वाढली आहे. कल्पना कर जर एकाद्याची झोप उडाली तर त्यांने काय करावे"? तू धर्म कर्तव्य आणि हित ह्यांच्या परस्पर संबंधाबाबत चांगला जाणकार आहेस तेव्हां मी तुला बोलावले आहे. मला तुझ्या कडून मार्गदर्शन हवे आहे. विदूर त्याला बोलतो, "चौर्य करणारे व वासनांध लोकांना असें होते. त्यांचा आत्मा त्या कृत्यामुळें अस्वस्थ झालेला असतो व तो त्या इसमाला झोपू देत नाही. त्याशिवाय ज्याचे सगळे धन गेले आहे, जो त्याच्या कामात अयशस्वी झाला आहे, जो फार कमजोर आहे आणि जो माजोर माणसाच्या हल्ल्याची शिकार झाला आहे. असें लोक झोप उडाल्याचे सांगतात. परंतु, तुझ्या बाबत असें कांहींही झालेले नाही".

धृतराष्ट्र त्याला सांगतो, "मला तुझ्याकडून असें बौद्धीक ऐकावयाचे आहे ज्यामुळें माझ्या मनाला शांती प्राप्त होईल". विदूर त्याला सांगतो, "आपला युधिष्ठीर इतका चांगला आहे कीं, तो तिनही जगाचा राजा झाला तर सगळयांचे भले होईल. असें तुला माहीत असूनही तू त्याला वनवासात पाठवले आहेस. त्याची स्वकमाईची संपत्ती, राज्य गिळंकृत केले आहेस, तुझ्याकडे नेमके विरुद्ध प्रकारचे अवगुण आहेत म्हणून तू ते सगळे केले आहेस. खरेतर तुला गादीवर बसावयालाच नको होते कारण राजा आंधळा असू शकत नाही. युधिष्ठीर ते सगळे जाणत असूनही अनेक अत्याचार तुझ्या मुलांनी केलेले सहन करत राहीला व त्याच्या आज्ञेत रहाण्याचे वचन दिलेले त्याचे बंधू व त्यांची पत्नी सगळे त्याच्याबरोबर सहन करत राहीले आहेत. तू सगळया साम्राज्याचा कारभार दुर्योधन, दुःशासन, शकूनी आणि कर्णावर सोपवला आहेस. अशा पापमय लोकांच्या हातात कार्य सोपवल्यानंतर काय होणार ते उघड आहे. ज्याच्याकडे ज्ञान, मेहनत करण्याची क्षमता, दूरदृष्टी आणि शांतपणे विषय समजून काम करण्याची क्षमता आहे अशाला शहाणा माणूस म्हणून समजले

जाते. सूज्ञ माणसाची इतर लक्षणं सांगतो. कौतुकास्पद काम करणारा, निर्दोष कार्य करणारा, श्रद्धावंत, पवित्र प्रवृत्तीत असणारा असें ते आहेत. असा माणूस कमी रागावतो, ज्याला फार आनंद होत नाही व दुःखसुद्धा होत नाही, ज्याला गर्व नाही, खोटा दिखाऊपणा नाही, ज्याच्या मनात गोंधळ नाही, माज नाही असा माणूस शहाणा समजला जातो. ज्याचे कार्य त्याच्या शत्रूनां आगाऊ समजत नाही, त्याचे कार्य फक्त ते काम झाल्यावरच इतरांना समजते, अशा माणसाला शहाणा समजले जाते. ज्याच्या कामावर ऋतु मोसमांचा परिणाम होत नाही, भिती, मोह, क्रोध ज्याच्या कामाला बाधा करत नाहीत, ज्याचे निर्णय वासनिक इच्छांमुळें प्रभावित झालेले नसतात, ज्याच्या निर्णयांत पुण्यकर्म असते व हतकारक असतात, ज्याचे निर्णय ह्या आणि नंतरच्या जगातसुद्धा (त्याच्या मृत्यूनंतरचे) तितकेच प्रभावित असतात, असा माणूस शहाणा समजला जातो. जो त्याच्या कामातील अगदी बारीक गोष्टींकडेसुद्धा तितक्याच प्रामाणिकपणे लक्ष देऊन ती कामं करतो, तो शहाणा समजला जातो. जो परिस्थिती व इतर लोकांचे विचार शांतपणे समजून मग त्यावर प्रतिक्रीया देतो, ज्याच्या निर्णयात भावनिकता नसते व तर्कशुद्धता असते, जो दुसऱ्यांच्या कामात लक्ष घालत नाही, जो आपले काम बरे व आपण बरे असें रहातो, जो त्याच्या कार्यक्षमतेच्या मर्यादी समजून त्याप्रमाणें आपली कामं निवडतो, तो शहाणा समजला जातो. जो आल्याचा हर्ष मानत नाही व गेलेल्याबद्दल शोक करत नाही, तो शहाणा असतो. जो वाईट परिस्थितीत सुद्धा शांत राहू शकतो, तसा माणूस सूज्ञ समजला जातो.

राजसभेत हजर होतो जेथे सगळे संबंधित लोक उपस्थित होते. जो हातात घेतलेले काम पूर्ण करूनच थांबतो, ज्याचे चित्त त्याच्या संयमात आहे. तो शहाणा समजला जातो. अरे शंतनुच्या वारसा, जे कधी प्रामाणिकपणा सोडत नाहीत, आणि सत्कर्मात व्यस्त रहाणे पसंत करतात ते सदैव समृद्धीकडे जातात. जो चांगल्या कामाची प्रशंसा करतो, जो स्तुतीने पाधत नाही व टीकेने हताश होत नाही तो शहाणा समजला जातो. जो जाणतो कीं सगळयांना

केव्हातरी मरावयाचे आहे व मृत्यूबद्दल शांत रहातो तो शहाणा समजला जातो. जो जाणतो कीं, जगात घडणाऱ्या सगळ्या घटनांचा परस्पराशी संबंध असतो. जो आपले विचार न डरता मांडतो, जो त्याचे विचार व्यवस्थितपणे सांगू शकतो, जो दुसऱ्याला व्यवस्थितपणे समजू शकतो, ज्याला त्याचे मुद्दे व्यवस्थितपणे मांडता येतात, अशा माणसाला शहाणा माणून असें समजतात. ज्याला धर्मग्रंथातील विचार चांगले समजतात व जो दुसऱ्याला ते सांगू शकतो, जो इतरांचा मान राखतो व ज्या त्या माणसाचे योग्यप्रकारे आदरतिथ्य करतो, जो सधन नसला तरी लाचार होत नाही, त्याला शहाणा माणूस असें समजतात. त्याच्या नेमके विरुद्ध जे वागतात त्यांना अर्थातच मूर्ख समजले जाते.

जो दुसऱ्याच्या बाबीत नाक खुपसतो, पापमार्गाने मित्रांना मदत करण्याचा प्रयत्न करतो, जो नको त्या गोष्टीत लक्ष घालतो, ज्या गोष्टीत घालावयाला पाहिजे त्याकडे दुर्लक्ष करतो, जो शक्तीमान लोकांना आव्हान देतो, जो शत्रूशी मैत्री करण्याचा प्रयत्न करतो, जो यशस्वी मित्राचा द्वेष करतो, जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला फसवतो, तो मूर्ख समजला जातो. जो आपली गुपीतं दुसऱ्याला सांगतो, जो आपल्या पूर्वजांचे श्राद्ध करत नाही, जो त्याच्या कुलस्वामीनीची पुजा करत नाही, जो भाग्यवान लोकांशी मैत्री करत नाही, जो न बोलावता तेथे जातो, जो आपल्या दोषांचे खापर दुसऱ्यांवर फोडतो, जो न विचारले तरी सांगत रहातो, पुरावा नसतांना आरोप करतो, असें लोक मूर्ख समजले जातात. जो आपल्यापेक्षा जास्त शक्तीमान असलेल्याला आव्हान देतो, जो पाप व पुण्य ह्यातील फरक समजू शकत नाही, तो मुर्ख समजला जातो.

ज्याला आपल्या कामाचा उरक नाही त्याला अडाणी समजतात. जो चुकीच्या माणसास सजा करतो तो अडाणी समजला जातो. ज्याची योग्यता नाही त्याला मानमरातब देतो अडाणी समजावा.

जो खूप श्रीमंत झाला किंवा विद्वान झाला तरी त्याचा देखावा करत नाही तो शहाणा समजावा. जो दुसऱ्याला मदत करत नाही, मदत करण्याची क्षमता असली तरी त्याला क्रूर समजावे. जो दुसऱ्यांसमोर खातो पण त्याना खाण्यासाठी बोलवत नाही त्याला क्रूर समजावे. जो त्याची संपत्ती सत्पात्र लोकांना वाटतो ज्यामुळें त्यांची प्रगती होईल तो दयाळू समजावा. जो पाप करून त्यातून फायदा करून घेतो, तो पापी समजावा. जो दुसऱ्याच्या पापाचा फायदा घेतो तो धूर्त समजावा. कारण त्या पापाची बाधा त्याला होत नाही. धूर्त तो जो दुसऱ्याला पाप करावयाला लावतो व स्वतः नामानिराळा रहातो. अशी माणसं त्यांच्या क्लुप्त्यानी राज्यसुद्धा नष्ट करू शकतात. भेदनिती वापरणारे, जे एकाचे दुसऱ्याला करून वाद वाढवून त्यांची शक्ती कमी करावयाची, त्यारितीने त्या दोघांना आपल्या कह्यात घ्यावयाचे, अशारीतीने मांडलिक राजे तयार करावयाचे, त्यांच्या मदतीने आपले राज्य मजबूत करावयाचे, आणि यशस्वी व्हावयाचे ह्याला मुत्सद्देगिरी म्हणतात. वीष एका माणसाचा नाश करू शकते, युद्धात सुद्धा एकच मारला जातो परंतु, त्यातच स्वताच्या जीवालासुद्धा धोका असतो, परंतु, खोटा कपटी सल्ला देऊन एक माणूस सगळे राज्य धुळीला मिळवू शकतो. त्यामध्ये त्या राज्याचा राजासुद्धा संपतो. जर कोणी तुम्हाला स्वादीष्ट पदार्थ खाण्यास दुले तर ते देणाऱ्याला प्रथम खावयास द्यावे. मग त्याचा काय परिणाम होतो ते पाहून आपण खावे. असें मुत्सद्देगिरीच्या शास्त्रात दिले आहे. सगळे झोपलेले असतांना जो जागृत रहातो, जो एकटा कधी प्रवासास जात नाही, जो पटकन आपले मत सांगत नाही, तो शहाणा माणूस म्हणून समजला जातो. ज्याला तुम्ही हरवले आहे त्याला क्षमा करण्यात तुम्ही तुमच्यासाठी एक पक्का दुष्मन तयार करत असता. हे मुत्सद्देगिरीच्या शास्त्राचे एक तत्त्व आहे. दुसऱ्याला माफ करतांना आपण फार मोठे झालो असे जो समजतो तो एक मूर्ख समजावा. कमजोर माणूस त्याच्या कमजोरीमुळें (अन्याय करणाऱ्या) इतरांना लोकांना क्षमा करतो. शक्तीमान कमजोराला माफ करतांना त्याच्यावर लक्ष देऊन असतो, कीं तो

शक्तीमान होतो काय ते पहात असतो. सदैव अजिंक्य रहाण्यासाठी अरे राजा ह्या गोष्टी महत्वाच्या असतात. वाईट माणूस जेव्हां एकाद्याला माफ करतो तेव्हां त्यात त्याचा काय उद्देश आहे ते पहावयाचे असते. अशी माणसें उगाचच कोणाला माफ करत नाहीत. जो दुसऱ्याच्या दुःखात आनंद मानतो तो वाईट माणूस समजावा. वाईटपणा हा चांगुलपणाच्या विरुद्ध असतो. तरी त्यात कांहीवेळा साम्य आढळते. सत्पात्र माफी हा मोठा गुण समजावा. अपात्र माफीमुळें भविष्यात मोठा धोका होणार हो समजावे. म्हणून कोणाला माफ करावे व कोणाला नाही हे ज्याला चांगले समजते तो शहाणा माणूस समजावा. त्यासाठी मनुष्य स्वभावाचा अभ्यास महत्वाचा असतो. जो दुसऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असतो त्याचे भवितव्य सदैव धोक्यात असते. स्वताचे व राज्याचे सरक्षण करू न शकणारा राजा आणि तीर्थयात्रा न करणारा ब्राह्मण दोघे नष्ट होतात. जगात सन्मान पाहिजे असेल तर प्रथम आपल्या जिभेवर नियंत्रण असावे, वाईट लोकांवर कडी नजर ठेवणे ह्या दोन गोष्टी महत्वाच्या असतात. अरे राजा, धृतराष्ट्रा, दोन प्रकारचे लोक स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत म्हणून त्यांचा सल्ला घेणे विहीरीत उडी मारण्यासारखे समजावे. पहिली ती स्त्री जी पुरूषावर प्रेम करते कारण इतर बायका त्या पुरूषावर प्रेम करत आहेत. दुसरा तो पुरूष जो एकाद्याची पुजा करतो कारण इतर त्याची पुजा करतात. अशा लोकांना त्यांचे निर्णय घेण्याची क्षमता नसते ते सांग कामे असतात व तसे लोक धूर्त लोकांच्या कह्यात सहजपणे जातात म्हणून तशा लोकांवर निर्णयासाठी विसंबून राहू नये. वासरात लंगडी गाय शहाणी अशी परिस्थिती असते जेव्हां धूर्त माणूस एकाद्याला त्याच्या ताब्यात घेतो. कर्तृत्वहीन माणसाची महत्वाकांक्षा आणि नकर्त्याची स्वप्न पहाणे, हे दोन फक्त समय वाया घालवतात. असें लोक त्यांच्या काल्पनिक जगात रमत असतात ते राजाला परवडणारे नसते. दान कधीही सत्पात्र करावे, अपात्र दानामुळें नवीन प्रश्न उत्पन्न होत असतात. दान करणारा मूर्ख ठरला तर ते दान व्यर्थ गेले असे समजावे. भिकाऱ्याला ओकारी आणि श्रीमंताची कंजुषी हे दोन त्यज्य

समजावेत. वेद सांगतात, माणसाच्या क्षमता त्याच्या अध्यात्मिक शक्तीच्या प्रमाणानुसार उत्तम, मध्यम आणि नीच अशा तीन प्रकारात असतात. त्यांचा उल्लेख सत्त्व, रजस आणि तमो अशा मोघम पद्धतीने केला जातो. ह्या जगातील सगळया चराचर गोष्टी ह्या तीन गुणांनी युक्त असतात. सत्त्व गुणात सुद्धा अनेक कमी जास्त अध्यात्मिकतेच्या अवस्था असतात. तसेंच रजोगुणात आणि तमोगुणात सुद्धा असतात. उच्च प्रतीच्या अध्यात्मिक अवस्थांमध्ये सर्वोच्च अध्यात्मिक अवस्थेत दैवी शक्ती असतात. त्यांना स्वर्गीय शक्ती असें म्हणतात. रजोगुणात सर्व प्रकारचे पशु, पक्षी आणि मांसे असतात त्यात मनुष्यसुद्धा येतो. तमोगुणात सुक्ष्म जीव, वनस्पती येतात. मनुष्य ह्या तीनही गुणाचे असू शकतात. अहो राजन, वैदीक आचार असे सांगतात कीं, माणसाचा जन्म त्यानी उच्च दर्जाच्या अध्यात्मिक अवस्थेत जाण्यासाठी असतो. जो माणूस ज्याच्या जीवनात ते साध्य करतो तो त्याच्या मृत्यूनंतर स्वर्गात जातो व तेथे रहातो जोवर त्यांने त्याची ती अध्यात्मिक उच्च अवस्था सांभाळलेली आहे. इतर ते साध्य होई पर्यंत पृथ्वीवर त्याच्या अध्यात्मिक योग्यतेनुसार त्या त्या योनीत पुनः पुन्हा जन्म घेत असतो. पांडव त्यांच्यावर आलेल्या सगळया अरिष्टांवर मात करत सातत्याने त्यांचा अध्यात्मिक दर्जा सात्त्विक अवस्थेत राखून राहील्यामुळें त्यांना दैवी शक्ती अनुकूल झाल्या आहेत. त्या उलट तुमचे चिरंजीव व त्याचे दोस्त सातत्याने तमोगुणात रमत आहेत व त्यामुळें त्यांचा अध्यात्मिक दर्जा सातत्याने खालावत आहे. परिणामतः त्यांचे भाग्य अधिकाधिक दुस्तर होत आहे.

अहो धृतराष्ट्र, माणसाच्या कार्यक्षमतेच्या सुद्धा विविध योग्यता असतात. त्या बरोबर ओळखून त्यानुसार त्यांना कामं द्यावयाची असतात. जगात तीन प्रकारचे गुन्हे सांगितले आहेत. दुसऱ्याची मालमत्ता हडपणे, दुसऱ्याच्या बाई, गुलाम व मुलांवर अन्याय कारक हक्क प्रस्थापित करणे, आणि विश्र्वासघात करणे. त्या तीन प्रकारच्या गुन्ह्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सांगितली आहे. अशा गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्यास तो समाज नष्ट होतो. ते गुन्हे करणारा

नरकात खितपत पडतो. त्याची अध्यात्मिकता फार कमी झालेली असते. ते गुन्हे होतात त्यामागे क्रोध, लोभ, मोह आणि वासना हे चार दोष कारणीभूत समजले जातात. ज्याने ते चार संयमित केले आहेत अथवा पूर्णपणे नष्ट केले आहेत तो अध्यात्मिक दृष्ट्या उच्च स्थराला जातो. प्रसंगी दैविक अवस्थेत जातो.

अरे राजा, जो खऱ्या अर्थाने शरण आला आहे त्याला संरक्षण देणे पुण्याचे काम समजले जाते. चार प्रकारच्या लोकांपासून कधी सल्ला घ्यावयाचा नसतो. कमी अक्कल असलेला, घमंडी, उद्धट आणि खोटी स्तुती करणारे. राजाच्या भोवती असे सेवक नेहमी असतात व तेंच त्याला चुकीचा सल्ला देऊन त्याचे व राज्याचे नुकसान करत असतात. आता सांगतो, कोणाकडून सल्ला घ्यावा. निगर्वी, विवेकी, अनुभवी, उच्च कुलिन, हितचिंतक. जेव्हां देवतांनी प्रजापतीला विचारले, त्यांने सांगितले चार गोष्टी एकाच दिवशी होऊ शकतात. त्या अशा, देवांची कृपा, बुद्धीमान माणूस भेटणे, विद्वान माणसाची कृपा होणे, पापाचा नाश होणे. त्यांच्या प्राप्तीमुळें भयगंड नाहीसा होतो. अयोग्य प्रकारे केल्यास मोठे नुकसान होते त्या गोष्टी आहेत अशा, अग्नीहोत्र, मौन, अभ्यास, यज्ञ.

अहो राजन, पिता, आई, अग्नी, आत्मा आणि गुरू ही पांच अग्नीची रुपं माणसांने प्रामाणिकपणे जपावयाची असतात. त्यामुळें तो जगात ख्यातनाम होतो. पांच आहेत ज्यांची सेवा करावा असें वेद सांगतात, ते असें, देव, पितर, चांगली माणसं, भिक्षूक, अतिथी. ते आपल्याला नेहमी भेटण्याची शक्यता असते. त्यांचा कधी अपमान करू नये. पांच प्रकारच्या लोकांना आपल्याला तोंड द्यावे लागते, ते असें, मित्र, शत्रू, परका, आश्रित, कुटूंबाचे सदस्य. जो त्यांना यथायोग्य रित्या सांभाळू शकतो तो यशस्वी होतो. ज्याला जीवनात समृद्ध व्हावयाचे आहे त्याने ह्या वाईट सवयी टाळावयाच्या असतात जास्त झोपणे, भिती, क्रोध, नशा, आळस, चंचल मन.

सहा जणांपासून दूर रहावे खोटा (अज्ञानी) शिक्षक, अशिक्षित पुरोहित, राजा जो संरक्षण करू शकत नाही, अशा राजाच्या राज्यात राहू नये. पत्नी जी अपमान करते, अशी गुरं जी कुरणात चरावयाला जात नाहीत.

आतान सांगतो सहा चांगले गुण जे माणसांने आत्मसात करावेत सत्य, स्पष्ट वक्तेपणा, भूतदया, उद्योगीपणा, क्षमाशिलता, धीरोदात्तता.

ते सहा त्वरित नष्ट होतात जर त्यांच्याकडे लक्ष दिले नाही पशुधन, सेवा, शेती, पत्नी, व्यासंग, संपत्ती, शुद्र.

ते सहा आपल्याला लवकर विसरतात ज्यांच्यावर आपण कृपा केली आहे, शिक्षक, विवाहीत मुलगी, आई, उपकार केलेली बाई, ज्यांना तुमच्या मदतीने यश कमावले आहे, ज्यानी आपल्याला मदत केली आहे.

चांगली प्रकृती, कर्जबाजारी नसणे, स्वताच्या घरात रहाणे, चांगले मित्र असणे, चांगले उत्पन्न असणे, सुरक्षित असणे हे ज्याला प्राप्त झाले तो खरा सुखी माणूस.

ते नेहमी दुःखी असतात जे मत्सरपूर्ण असतात, पाप बुद्धी, असमाधानी, चिडचिड करणारा, संशयी, परावलंबी.

त्या सहा गोष्टी ज्यामुळें माणूस आनंदी रहातो, संपन्नता, उत्तम आरोग्य, मनःशांती, प्रेम करणारी पत्नी, आज्ञाधारक मुलं, धन देणारे ज्ञान.

त्या सहा गोष्टी ज्याचा माणूस सदैव विचार करतो, चोरी होईल कां? बायको सोडेल कां? आरोग्य नीट राहिल कां? मृत्यू येईल कां? मित्र फसवेल कां? मुलांची काळजी.

कांही उद्योग परावलंबी असतात, जसें वैद्याचा धंदा रोग्यांवर, चोराचा धंदा निष्काळजी लोकांवर, पुजाऱ्याचा धंदा यज्ञ करणाऱ्यांवर, राजा

गुन्हेगारांवर, ज्ञानी माणसे अज्ञानी लोकांवर त्यांच्या उपजिविकेसाठी अवलंबून असतात.

राजाने त्या सात गोष्टी कधीच केल्या नाही पाहिजेत, नाहीतर तो संकटात सांपडतो. बाईचा नाद, द्युत खेळणे, शिकार करणे, मद्य सेवन, कटू वाणी, कठोर शिक्षा देणे, धनसंपत्तीची उधळपट्टी. ह्या गोष्टींमुळें त्याची अध्यात्मिक योग्यता कमी होते.

ह्या आठ गोष्टी माणसाचा सर्वनाश करू शकतात, ब्रह्मणांचा तिरस्कार करणे, ब्राह्मणांशी भांडणे, ब्राह्मणाची मालमत्ता हडपणे, ब्राह्मणाचा खून करणे, ब्राह्मणांची स्तुती न करणे, सुप्रसंगी ब्राह्मणांना आमंत्रण न देणे, ब्राह्मणांची चेष्टा मस्करी करणे, ब्राह्मणांना मदत न करणे, शहाणा माणूस ह्या आठ गोष्टी कटाक्षाने टाळेल.

त्या आठ गोष्टी ज्या माणसाच्या आनंदात भर घालतात, मित्र भेटणे, अफाट संपत्ती मिळणे, मुलाला मिठी मारणे, संभोग सुख, स्वकीयांना भेटणे, मना प्रमाणे गोष्टी घडणे, अपेक्षा पूर्ती होणे, समाजात मानसन्मान मिळणे,

त्या आठ गोष्टीमुळें माणसाची प्रशंसा होते, शहाणपण, उच्च कुळात जन्म, संयमित जीवन पद्धती, गोड बोलणे, भेटी देणे, विनम्रपणा.

ह्या दहा प्रकारच्या लोकांपासून दूर रहावे शहाण्याने मद्य पिऊन तर्र झालेला, दुर्लक्ष करणारा, भांडण करणारा, थकलेला, रागावलेला, उपाशी, घाईत असलेला, स्वार्थी, घाबरलेला, वासनांध.

ह्या संदर्भात मी आपण एक कथा जी सुयोधन आणि असुरांचा राजा प्रल्हाद ह्यांच्यातील आहे. तिची आठवण करून देतो. जो राजा वासनामुक्त जीवन जगतो, ज्याने क्रोध आवरला आहे, जो सत्पात्र दान करतो, जो ज्ञानी

आहे, जो योग्य अयोग्य काय ते चांगले समजतो, जो कार्यक्षम आहे, तो सगळ्या राजांत श्रेष्ठ ठरतो.

जो राजा त्याच्या सेवकांत आत्मविश्वास उत्पन्न करतो, जो त्यालाच शिक्षा करतो ज्याचा गुन्हा सिद्ध झाला आहे. ज्याला समजते कीं केव्हां दया दाखवावयाची. तो कमजोर माणसालासुद्धा न्याय देतो, जो त्याचे निर्णय सद्बुद्धीने घेतो, जो उत्कर्षाची संधी शोधत असतो, जो बलवानांशी झगडा करत नाही, जो त्याची ताकद योग्य वेळी दाखवतो, तो अरिष्ठ आले तरी डगमगत नाही, तो श्रेष्ठ राजा ठरतो.

जो कधी निराश होत नाही, ज्यांने त्याचे सगळे शत्रू नष्ट केले आहेत, जो पापी लोकांना जवळ येऊ देत नाही, जो परस्त्रीचा विचार करत नाही, जो कधी उद्धटपणे बोलत नाही, जो अपहार करण्याचा कधी विचार करत नाही, जो उपकार विसरत नाही, व्यसनात रमत नाही, ज्याच्या मनाचा तोल आपत्कालीसुद्धा ढळत नाही, तो सदैव सुखी असतो त्याला चांगली निद्रा लागते.

जो घमेंडखोरी करत नाही, मित्रासाठी भांडत नाही, जो नेहमी खरे तेंच बोलतो, जो विनाकारण रागवत नाही, त्याला शहाणा समजतात.

त्यानंतर विदूर राजाला ऐक कोडं घालतो व ते सोडवण्यास सांगतो, त्यात तो विचारतो, "असें एक घर आहे ज्याला नऊ दरवाजे आहेत, तीन खांबे आहेत, ज्यावर पांच द्वारपाल लक्ष देऊन आहेत, ज्याचा मालक स्वयं आत्मा आहे, ते घर कोणते"? जो ह्या कोडाचे उत्तर देईल तो खरा शहाणा माणूस असें तो सांगतो.

त्यानंतर विदूर पुढे सांगत असतो, जो राजा विनाकारण दुसऱ्यांचा द्वेष करत नाही, गरीबांबद्दल सहिष्णू असतो, विनाकारण वाद करत नाही, जो

कोणाचा अपमान करत नाही, अशा राजाची सर्वत्र प्रशंसा होते. जो राजा सतत रागावलेला असा वागत नाही, स्वताच्छी स्तुती करण्यात इतरांची मानहानी करत नाही, कठोर वाणी वापरत नाही, आवाज न चढवता शांतपणे आपले मत सांगतो, मतभेद झाले तरी शांत राहून आपले मत मांडतो, त्या राजाला त्याचे शत्रूसुद्धा मानतात. जो राजा जुने हेवेदावे उकरून काढून वाद वाढवत नाही, जो इतरांचा उल्लेख करतांना त्यांच्या बद्दल तुच्छपणा दाखवत नाही, अरिष्टाच्या काळात सुद्धा आपले मनाचे संतुलन बिघडू देत नाही, त्या त्याचे विरोधक सुद्धा मान देतात. जो स्वताच्या सुखात जास्त रमत नाही आणि दुसऱ्याच्या दुःखात सुख मानत नाही, जो सत्पात्र दान करतो, अशा माणसाला चांगला माणूस समजले जाते. चांगला हुशार राजा परदेशांच्या चालीरीती, भाषा, संस्कृती, कायदेकानु, रीतीरिवाज समजून घेतो तो त्या देशांशी चांगले व्यापारी संबंध प्रस्थापित करतो. जिंकलेल्या राज्यात आपल्या देशांचे व्यवहार जो शिकवतो, आपला धर्म त्यांना शिकवतो, आपली भाषा त्यांना शिकवतो, आपले नाणे त्या राज्यात चालवतो तो राजा त्या जिंकलेल्या राज्याला उत्तमरित्या आत्मसात करू शकतो. परदेशांशी चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी जो राजा रोटी बेटी व्यवहार वापरतो त्याला ते देश ताब्यात घेण्यासाठी युद्ध करावे लागत नाही.

जो माणूस दुरभिमानी नसतो, मूर्खपणा करत नाही, उद्धटपणा करत नाही, पापकृत्यात रमत नाही, राजाशी वितुष्ट करत नाही, एरव्ही वाईट रित्या कोणाशी वागत नाही, विनाकारण शत्रूत्व धरत नाही, भांडत नाही, दारुडे, जुगारडे अशांच्यांशी मैत्री करत नाही, वेड्याशी संबंध ठेवत नाही, तसा माणूस त्या समाजात मोठा माणूस समजला जातो.

जो औदासिन्याच्या धोरणांनी इंद्रियसंयमन करून जगतो, शुद्धता पाळतो, यज्ञविधी करतो, कुलाचार सांभाळतो, देवांची पुजा करतो, जो पापक्षालन करतो, इतर विधी करतो ज्या त्या देशातील रिवाजानुसार करणे

जरुरीचे असते तो देवांना प्रिय होतो. जो लग्न संबंध ठरवतांना योग्य दर्जाचे नाते निवडतो तो शहाणा माणूस समजला जातो. असें निर्णय तो पूर्ण विचार करून करत असतो.

जो मिताहारी आहे, आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांना प्रथम खावयाला देतो, जो अतिनिद्रा करत नाही परंतु, खूप मेहनत करतो, ज्याचा त्याच्या मनावर पूर्ण ताबा आहे, अशा माणसाला कमी वेळा संकटांचा सामना करावा लागतो. माणसावर संकट दोन कारणांनी येतात, एक त्याच्या चुकीमुळे व दुसरे भाग्यात असल्यामुळे. ज्याचे सल्लागार चांगले आहेत, ज्याची पुढची चाल कोणाला माहीत होत नाही, तो सगळया संकटांना यशस्वीपणे तोंड देऊ शकतो. जो आपल्या मित्रांनासुद्धा त्यांच्या नकळत वेळोवेळी तपासून पहातो तो कधी फसत नाही.

जो भूतदया, सत्यव्रत, दानशूर, शुद्ध मनाचा आहे तो समाजात रत्नासारखा चमकत रहातो. ज्याला त्याच्या गत कुकर्माची लाज वाटते जरी इतरांना त्याबद्दल कांहीं माहीती नाही, त्याची अध्यात्मिक ताकद वृद्धींगत होते. अशा मुळे तो पुन्हा तसे कृत्य करत नाही ज्याची लाज वाटावी व त्याची अध्यात्मिक दृष्टीने प्रगती होते.

आपण जाणता पंडुला शाप मिळाल्यामुळें तो वनातच राहू लागला व तेथे तो आपल्या दोनही पत्नींबरोबर तपस्या करत होता ज्या कारणाने त्याचा उद्धार व्हावा. त्याला लोकपालांच्या कृपेने पांच इंद्रासारखे तेजस्वी पुत्र झाले. अरे अंबिकापुत्रा, धृतराष्ट्रा, त्याने त्या पांचही पुत्रांना सगळया विद्या शिकवल्या. ते जन्मतः अध्यात्मिक उर्जेत उच्च स्थानी आहेत. त्यांच्यात आज्ञाधारकपणा आहे त्याची प्रचिती आपण पाहिली आहे गेल्या तेरा वर्षात. म्हणून त्यांना त्यांचा हक्काचा हिस्सा देणे हांच योग्य निर्णय असू शकतो. तसे केले तर त्या पांडवांचे जन्मदाते पांच लोकपाल देव संतुष्ट होतील व कुरु घराण्याचे भले होईल.

अरे अंबिकापुत्रा, मी आता सांगतो लोकपालांचे कार्य, ज्यामुळें हे जग चालत आहे.

हे ब्रह्मांड अध्यात्मिक उर्जेने भरलेले आहे. त्या उर्जेची देवता आहे लक्ष्मी. जीला विष्णूचे अर्धांग मानले जाते. ह्या ब्रह्मांडातील सगळया चराचर चिजा अध्यात्मिक उर्जेने चालतात. ही उर्जा हेंच प्रमुख प्रेरणा स्रोत असते. परंतु, त्याचे प्रमाण सगळया चराचरांत एकसारखे नसते. ज्यात ते भरपूर असते त्यांना सात्त्विक अथवा सत्त्वगुणी संबोधतात. ज्यांच्यात मध्य प्रमाणात असते त्यांना रजस अथवा रजोगुणी समजले जाते. ज्यात अध्यात्मिक उर्जेचे प्रमाण अल्प असते ते तमस अथवा तमोगुणी समजले जातात. विधात्याने इच्छेने उत्पन्न केलेल्या ह्या विश्र्वात त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी तेहतीस प्रकारच्या देवता समुह त्यांने योजले आहेत. ते असें, वषट्कार अथवा मंत्रदेवता, ब्रह्म अथवा प्रजापती, त्यानंतर आठ वसु, अकरा रुद्र आणि बारा आदित्य असें आहेत. त्यांच्या कामात त्यांना मदत करण्यासाठी उपदेवता उत्पन्न झाल्या. अशारितीने ह्या विश्र्वाचे कार्य नियमित केले गेले असें मार्कंडेय ऋषी सांगतात. जे विधात्याच्या सगळया कामाचे एकमेव साक्षीदार आहेत. माणसाच्या जीवनावर लक्ष देणारे आणि त्याचे नियमन करणारे सहा देव विधात्याने ब्रह्माच्या मदतीने कार्यान्वित केले. त्यांना लोकपाल देवता असें म्हणतात. त्या अशा, इंद्र, वरुण, वायू, अग्नी, कुबेर अथवा गणेश अथवा वैश्रावण अथवा अरिहंत अशा विविध नांवांने जाणले जातात, शेवटचा आहे मृत्यूदेव अथवा यमदेव. इंद्र देवता बुद्धी, चातुर्य ह्याचा कारक असतो, कुबेर वास्तविक संपत्तीचा कारक आहे, यम माणसाच्या मृत्यू व जन्म निश्र्चित करत असतो. इतर देव शरीराच्या विविध कार्यांवर नियंत्रण करत असतात. ते प्रत्येक चराचराचे आतून बाहेरून निरीक्षण करत असतात. त्यातील वरुण (जल) हि देवता प्राण्याच्या सचेतन होण्यास कारणीभूत असते ती शरीरातून तिचे कार्य करत असते. तिच्या प्रमाणे अग्नी व वायूसुद्धा शरीरातून कार्य करत असतात. म्हणजे अरे राजा धृतराष्ट्रा वरुण, वायू आणि अग्नी माणसाचे त्याच्या आतून

निरीक्षण करत असतात. उरलेल्या तीन इंद्र, कुबेर आणि यम बाहेरून लक्ष ठेवून असतात. अशारितीने विधाता सगळ्या चराचरांचे निरीक्षण ह्या लोकपाल देवतांच्या मदतीने करत असतात. ह्या लोकपाल देवतांना मदत करण्यासाठी अनेक गणदेवता कार्यान्वित असतात. त्या गंधर्व, यक्ष आणि राक्षस वर्गाच्या असतात. त्या सगळ्या स्वर्गीय देवता म्हणून ओळखल्या जातात. त्याशिवाय पिशाच्च देवता सुद्धा माणसाच्या व इतर प्राण्यांच्या जीवनांवर प्रभाव टाकत असतात. त्यांची उत्पत्ती पितरांपासून वषट्कार मधून होत असते. म्हणून देवांना माणूस कधीही फसवू शकत नाही. देवांशी खोटे बोलण्यामुळें त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते. ज्या प्रकारच्या विचारांमुळें अथवा कृतीमुळें त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होते त्या विचारांना आणि कृत्याला पाप कृत्य असें समजले जाते. त्याचप्रमाणे ज्या विचारांमुळें किंवा कृत्यामुळें त्याची अध्यात्मिक उर्जा वृद्धींगत होते त्याला पुण्य कृत्य समजले जाते. अध्यात्मिक उर्जा संपादन करण्यासाठी दोन मार्ग आहेत, एक कर्मयोगाचा व दुसरा ध्यानयोगाचा. देव त्यांची अध्यात्मिक उर्जा दोनही मार्गाने संपादन करतात परंतु, असुर त्यांची अध्यात्मिक उर्जा विशेष करून ध्यानयोगानेच संपादन करत असतात. देव त्यांची अध्यात्मिक उर्जा सकारात्मक कार्यात वापरतात त्याउलट असुर त्यांची उर्जा नकारात्मक कार्यात वापरतात. हे सांगण्याचे कारण, अरे धृतराष्ट्रा, तुझे पुत्र त्यांची अध्यात्मिक उर्जा नकारात्मक कार्यात खर्च करत असल्यामुळें ते असुर झाले आहेत त्याउलट पंडुची मुलं त्यांची अध्यात्मिक उर्जा सकारात्मक कार्यात खर्च करतात त्याच प्रमाणे ते कर्मयोगाने आणि ध्यान योगांनी त्यांच्या अध्यात्मिक उर्जेत सातत्याने वाढ करत आहेत म्हणून ते देव श्रेणीत गेले आहेत. तुझे मुलगे मात्र त्यांच्या गत कर्मामुळें संपादीत झालेली अध्यात्मिक उर्जा फक्त खर्च करत आहेत. अशा परिस्थितीत तू मला सांग, ते पांडवांपुढे युद्धात जिंकण्याची शक्यता कशी असेल?

अरे राजा धृतराष्ट्रा, ह्या जगातील सगळया गोष्टींचे संतुलन ह्या अध्यात्मिक उर्जेच्या व्यवस्थापनावर अवलंबून असते म्हणून जे कांहीं घडते ते सगळे ह्या अध्यात्मिक उर्जेच्या संदर्भात कसें आहे हे प्रथम पहावयाचे असते. त्याबाबत पंडुची मुलं फार सावध आहेत त्यामुळें ते सगळया अरिष्टांना पुरून उरले आहेत, त्या उलट तुझी मुलं वास्तविक जगाच्या कारभारात गुंतली आहेत. त्यामुळें त्यांची अध्यात्मिक उर्जा झपाट्याने कमी होत आहे परंतु, त्याचे त्यांना भान नाही. ह्याचा मला खेद होतो आहे.

विदूर पुढे सांगत असतो, वैदीक धर्मात ज्या तीन गोष्टी अभ्यासल्या जातात त्या अशा, नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड. नितीशास्त्र म्हणजे, समाजात माणसांने कसे रहावे, कसे वागावे, कसे बोलावे, कसे काम करावे ह्याबद्दलचे मार्गदर्शन. अध्यात्म विद्या म्हणजे माणसाने त्याच्यात जो परमात्मा आहे त्याला ओळखण्यासाठी जे करावयाचे असते त्याचे शास्त्र.

कर्मकांड हा भाग प्राचीन काळी म्हणजे कृतयुगात फारसा नव्हता. जेव्हां देवता आणि मनुष्य एकत्रपणे पृथ्वीवर वावरत होती. पुढे मनुष्य पापाचरणामुळें त्याची अध्यात्मिक उर्जा कमी झाल्यामुळें कमकुवत होत गेला व त्रेतायुग सुरू झाले. त्यात माणूस क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर अशा वासनांत अडकत गेला व आणखीन कमजोर होत गेला आज द्वापार युगात माणसाची अध्यात्मिक उर्जा कृतयुगाच्या मानाने फारच कमी झाली आहे. अशा परिस्थितीत माणसाला देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी जे करावयाचे असते त्या विधी कर्मकांडात दिलेल्या आहेत. स्वर्गीय देवता आणि लोकपाल देवता प्रसन्न करण्यासाठी माणसाला स्वतः सात्त्विक असणे बंधनकारक असते. जे रजो अथवा तमो गुणात आहेत त्यांना ह्या देवतां कधीच प्रसन्न होत नाहीत. विदूर पुढे सांगतो, प्राचीन काळी लोकपाल देवतांना संतुष्ट करण्यासाठी विविध प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. ते करण्यासाठी फार उच्च प्रतिच्या अध्यात्मिक अवस्थेत असलेले ब्राह्मण, पुरोहित म्हणून काम करत होते व आजही ते त्या

प्रकारे यज्ञ करत आहेत. युधिष्ठीर अनेक यज्ञ सदोदीत करत असतो. त्यामुळें त्याची पत प्रतिष्ठा त्या लोकपाल देवतांमध्ये मोठी आहे. परंतु, तुझ्या मुलांनी तसे यज्ञ केलेले नाहीत त्यामुळे त्यांची योग्यता खालच्या पातळीवर गेलेली आहे. म्हणून अरे राजा, तुझ्या कौरवांना त्या देवतांची साथ मिळणार नाही जेव्हां युद्ध सुरू होईल हे लक्षात ठेव. विदूर पुढे सांगतो, जनसामान्याना लोकपाल देवतांची आळवणी करावयाची नसते, ते त्या खालच्या उपदेवता पुजत असतात त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी. त्यात स्वर्गीय देवतांची आराधना करण्यासाठी ज्या योग्यतेची सात्त्विक अवस्था किमान आवश्यक असते ती सुद्धा त्यांच्या कडे नसते कारण ते बहुधा रजोगुणी अथवा तमोगुणी अवस्थेत असतात. त्याकरतां ते ब्राह्मणांना त्यांच्यासाठी पुजा करावयास सांगतात त्यासाठी ते त्या पुरोहितांना दक्षिणा देतात. परंतु, जर तो पुरोहित पाहिजे त्या योग्यतेचा सात्त्विक नसेल तर त्या सगळया पुजा व्यर्थ जातात पण ते त्या सामान्य बुद्धीच्या यजमानाला समजत नाही.

वैशंपायन जनमेजयाला सांगतात, अरे राजा, तू कलीयुगात आहेस ह्या युगातील पुरोहित क्वचितच खऱ्या योग्यतेचे सात्त्विक असतात त्यामुळे त्यांच्याकडून केलेल्या पुजा व्यर्थ जातात. तरी त्या पुजा होत रहातील कारण पुरोहित वर्ग त्यांचा पौरोहित्याचा व्यवसाय वाढवत नेणार आहे. पुढील काळात खरे ब्राह्मण नसतील, वैश्य लोक पौरोहित्याचा धंदा करणार आहेत आणि त्यामुळें कर्मकांड हा एक भ्रष्टाचार म्हणून वाढत जाईल. हे पुरोहित कर्मकांड म्हणजेच धर्म असा प्रचार त्यांच्या व्यवसायाच्या सोयीसाठी करत असतील कलीयुगात. त्यामुळें नितीशास्त्र आणि अध्यात्म विद्या ह्या महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होऊन अध्यात्मिक उर्जा वाढण्या ऐवजी उलट कमी होत जाईल आणि सगळीकडे अशा भ्रष्ट कर्मकांडामुळें पाप वाढत जाईल. वैश्य लोक स्वतःला ब्राह्मण म्हणवून, स्वताला भूदेव म्हणून लोकांकडून पुजून घेऊ लागतील. त्यांच्या त्या पौरोहित्याच्या व्यवसायासाठी मोठ मोठी मंदिरं राजांच्याकडून उभी करवून घेतील, जी त्यांची दुकान असतील ज्यात ते

समाजातील भाविकांना जाण्याचा सल्ला देतील. त्या मंदिरांच्या रचना, शिल्प व घडण त्या वैश्य पुरौहिताच्या आवडीचे असतील. त्याचा त्या देवळात ठेवलेल्या देवाचा कांहीं संबंध नसेल. देव विकण्याचा धंदा ते करू लागतील व त्यामुळें कलीयुगात नैतिक व अध्यात्मिक विषयांकडे जनसामान्यांचे पुरते दुर्लक्ष होईल. मंदिरातील त्या शिल्पावरून त्या पुरोहिताची अध्यात्मिक योग्यता किती आहे ते समजू शकेल. तो वैश्य पुरोहित किती सात्त्विक कां तमोगुणी अथवा रजोगुणी आहे ते त्या मंदिरांतील शिल्पांवरून समजेल.

विदूर पुढे धृतराष्ट्राला सांगतो, अरे अंबिकापुत्रा, स्वर्गीय देवतांची आराधना जरी सात्त्विक माणसांने करावयाची असली तरी पिशाच्च देवतांची पुजा व आराधना रजो आणि तमो अवस्थेत असलेले करू शकतात. त्यात कर्मकांड लागणार नाही कारण त्या देवतां केवळ भक्तीने संतुष्ट होणाऱ्या असतील. त्यामुळें त्यांच्या पुजेसाठी कर्मकांड व ब्राह्मण लागणार नाहीत. परंतु, त्या देवतां फक्त द्वापार युगाच्या अस्त काळी व कलीयुगात विशेष प्रचारात असतील. पिशाच्च देवतांत क्रोध आणि मत्सर हो दोष असतात त्याचा त्रास त्या देवतांची आराधना करणाऱ्यांना होत राहिल.

अशारितीने प्रजागर पर्व भाग तेहतिसावा संपला.

# प्रजागर पर्व

## भाग चौतिसावा

धृतराष्ट्र विदूराला बोलतो. "मला सांग, ज्या माणसाला चिंतेमुळें झोप लागत नाही त्यांनी काय करावे? अरे क्षत्री तूंच असा आहेस ज्याच्या बरोबर मी माझे दुःख सांगू शकतो. तरी ते सांग. तू धर्म आणि हित ह्यांचा चांगला जाणकार आहेस, म्हणून मला सांग मी काय करावे म्हणजे माझी विवंचना कमी होईल. अरे विदूरा, मला सांग अजातशत्रूसाठी मी काय केले तर ते पंडुचे पुत्र शांत होतील. भविष्यातील अरिष्ठ लक्षात घेऊन मला माझ्या गत चुकांची लाज वाटते. मला तू सांग नेमके काय पंडुपुत्र करण्याचे योजत आहे"?

विदूर बोलतो. तुम्ही विचारा अथवा नको विचारू मी फक्त खरे तेंच सांगणार आहे. मग ते तुम्हाला प्रिय वाटो अगर न वाटो. तूर्त राजाने त्याच्या कुटूंबाचे कशात भले आहे ते पाहिले पाहिजे. मी तेंच सांगेन जे नैतिकतेच्या मर्यादेत आहे व ज्यात सगळयांचे भले आहे. ऐक मी काय सांगतो ते, अन्याय कारक मार्गाने मिळणाऱ्या यशाचा मोह धरू नकोस. जरी तसे यश मोहक असले तरी ते अंती विषासारखे बाधक ठरणारे असते. आपण कोणाकडून काम करून घेत आहोत, काय काम करणार आहोत, त्याचा उद्देश काय आहे, हे सगळे पाहून मगच एकादे काम सुरू करावयाचे असते. अशारितीने पूर्ण विचार करून मगच कोणतेही कार्य सुरू करावे असें नितीशास्त्र सांगते. अचानक स्फुर्ती आल्यासारखे कोणतेही काम करावयाचे नसते. आपली कुवत पाहून जबाबदाऱ्या घ्यावयाच्या असतात. त्या कामाचे कोणते परिणाम होणार आहेत त्याची कल्पना समजून मगच त्यात हात घालावयाचा असतो. ज्या राजाला त्याच्या राज्याची पुरेशी माहीती नाही तो राजा ते राज्य फार काळ सांभाळू शकणार नाही. ज्या राजाला ते सगळे पुरेसे माहीत आहे तो ते राज्य सांभाळू शकतो. राजा वासनांच्या आहारी जाऊन जर निर्णय घेत असेल तर तो येणाऱ्या

संकटाना तोंज देऊ शकत नाही. जो राजा स्वताच्या भावना नियंत्रित करू शकतो तोंच त्याच्या मंत्र्यांना सांभाळू शकतो. जो राजा भावनांच्या लहरींच्या आहारी न जाता आपले निर्णय घेतो तो त्याच्या मंत्र्याना आणि विरोधकांना हाताळू शकतो. अशा राजाला चुका करणाऱ्या मंत्र्याला सजा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. समज, रथ म्हणजे राजाचे शरीर आहे, त्याचा सारथी त्या रथाचा आत्मा आहे, त्याचे घोडे त्याच्या भावना, वासना आहेत. जेव्हां त्याच्या वासना, भावना चांगल्या नियंत्रित असतील रथ चांगला चालतो, तसेंच ते आहे. जर त्याचे योग्य नियंत्रण त्याच्या भावना, वासनांवर नसेल तर तो रथ वेडावाकडा कसा तरी भरकटत जाईल. चांगले करण्यासाठी गेला वाईट झाला व वाईट करण्यास गेला आणि चांगले झाले असें होऊ शकते. जो अशाप्रकारे काम करतो त्याचा सर्वनाश होतो. ह्यासाठी राजाचे त्याच्या वासनांवर आणि भावनांवर योग्य नियंत्रण असणे फार जरूरीचे असते. त्याच्या भावना आणि वासना त्याचे शत्रू झाल्यासारख्या वागतात. तो त्याचा विवेक हरवून बसतो. जो राजा धर्म आणि हित असें दोनही संपादन करण्याचा प्रयत्न करील तो सुख, संपन्नता मिळवण्यात यशस्वी होईल. जो राजा त्याच्या पांच दोषां वर नियंत्रण न करता शत्रूला जिंकण्याचा प्रयत्न करतो तो त्याच्यातील त्या पांच दोषांमुळें म्हणावा तसा यशस्वी होऊ शकत नाही. त्यामध्ये निष्पाप आणि पापी असें दोघेही अपयशाचा अनुभव घेतात. आपल्या कुवतीचा खोटा अंदाज घेणारा संकटात सांपडतो. राज्यकारभारात राजानी सहसा पापमार्गी लोकांपासून दूर रहावे. आपल्या पांच दोषांचे (क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) चांगले नियंत्रण करावे. त्यामुळे त्याच्यात कांहीं चांगले गुण येतील, ते त्याला सगळ्या प्रकारच्या संकटातून वाचवतील. प्रामाणिकपणा, साधेपणा, मनाची शुद्धता. समाधानी, सुस्वभाव, इंद्रियसंयमन, धैर्य, सत्त्वशिलता असें चांगले गुण त्याला वाचवतील. हे गुण रजोगुणी किंवा तमोगुणी माणसात आढळणार नाहीत. मूर्ख चांगल्या माणसाचा अपमान करून, त्याला घाबरवून आपले काम करण्याचा प्रयत्न करतो. त्या प्रयत्नात तो त्याची अध्यात्मिक उर्जा मोठ्या प्रमाणात नष्ट

करत असतो. वाईट माणसें द्वेष, मत्सर अशा गोष्टीत आपली शक्ती खर्च करतात. त्यांच्या सगळया कृती पापमय होतात. ज्यामुळें त्यांची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते. बरीच कामं केवळ चांगली भाषा वापरल्यामुळें यशस्वी होत असतात. त्यासाठी राजाला संभाषण करण्याची कला अवगत असली पाहिजे. चुकीच्या रीतीने बोलण्यामुळें सुद्धा नाहकपणे कामं बिघडत असतात. क्षत्रिय झाला म्हणून त्यांने अर्वाच्य वाचा करावी असा भ्रष्ट क्षत्रियांचा दोष असतो त्याने तो विनाकारण नवीन शत्रू उत्पन्न करत असतो. कुलिन क्षत्रियांने ते टाळावे. बाणाने मारलेली जखम बरी होते परंतु, कटू बोलण्याने झालेल्या जखमा सहसा भरून येत नाहीत. तुझ्या मुलांना हे माहीत नसल्या सारखे ते पांडवांशी त्या सभेच्या प्रसंगी वागत होते. त्या कर्माच्या, दुःशासनाच्या आणि दुर्योधनाच्या कटू बोलण्याचे परिणाम आता तुझ्या मुलांना त्यांचे प्राण घालवून भोगावयाचे आहेत. काय गरज होती द्रौपदीचा अपमान करण्याची? अशा बेजबाबदार वागण्याचे परिणाम आता तुम्हाला भोगावे लागणार आहेत. शहाणा माणूस कधी अशारितीने वागत नाही, जसे तुझे मुलगे व त्यांचे दोस्त करत होते. आपल्या बोलण्याचे काय परिणाम होणार आहेत त्याचा जरा तरी विचार ते करते तर आजची ही वेळ आली नसती. मनुष्य हा मानसिक प्राणी आहे. म्हणून त्याचे मन त्याच्या शरीरापेक्षा जास्त परिणामकारक असते हे शहाणा माणूस नेहमी बोलतांना लक्षात ठेवून बोलत असतो. जर तुला तुझ्या मुलांना त्या पांडवीय संकटातून वाचवावयाचे असेल तर तू युधिष्ठीराला त्याचे राज्य देऊन गोष्टी संपवून टाक, हेंच प्राप्त परिस्थितीत श्रेयस्कर आहे. तो समर्थ आहे व शहाणासुद्धा आहे त्यामुळें तो सगळे विसरून तुझ्या मुलांना माफ करील जर तुझी मुलं त्यांना केल्या कृत्याचा पश्र्चात्ताप झाला आहे असें दाखवून देतीस. कारण फक्त ज्याला केल्या कृत्याचा पश्र्चात्ताप होतो तोंच माफीच्या योग्यतेचा असतो. ज्याला पश्र्चात्ताप झालेला नाही पण फक्त तसें सोंग करतो त्याला नितीशास्त्राप्रमाणें माफ करणे मूर्खपणाचे ठरते. ह्या बद्दल मला विश्र्वास आहे. त्या पंडुच्या मुलांनी तुझ्यामुळें खूप त्रास सहन केले आहेत. त्यासाठी आता

तुलाच पुढाकार घेऊन त्याना दिलासा द्यावयाला पाहिजे. असें केलेस तर तुझी जगात एक चांगला राजा म्हणून ख्याती होईल.

अशारितीने प्रजागर पर्व भाग चौतिसावा संपला.

# प्रजागर पर्व

## भाग पस्तीसावा

धृतराष्ट्र विदूराला बोलतो, तुझी विद्वत्ता खरोखरच वाखाणण्यासारखी आहे. तू मला आणखीन सांग धर्म आणि हित ह्यांच्या संयोगाने कसे आपली काम करावयाची ते मला तुझ्याकडून ऐकावयाचे आहे. मला सांग जर अध्यात्मिक उर्जा हेंच ह्या विश्र्वाचे कारण असेल तर देव आणि असुर दोघे त्यात मग्न असतात पण देव चांगले आणि असुर वाईट असें कसे असते ते मला समजून घ्यावयाचे आहे.

विदूर सांगतो, फार पूर्वी हांच प्रश्न असुर प्रह्लादाने मांर्कंडेय ऋषींना विचारला होता. त्याची माहीती वेदात आहे ती सांगतो. प्रजापती त्वश्त्रीची नेमणूक अध्यात्मिक उर्जेचा नकारात्मक आविष्कार घडवण्यासाठी केलेली आहे. त्याचे कारण, जगाचा कारभार केवळ सकारात्मक असून चालत नाही. त्याला नियंत्रित करण्यासाठी नकारात्मक वापर त्या वैश्र्विक उर्जेचा व्हावा लागतो. जसें सूर्य उगवतो व दुपारी डोक्यावर येतो तो तेथेच राहून चालणार नाही, त्यासाठी तो मावळू लागतो. हें ह्या विश्र्वाच्या सगळयाच क्रिया प्रक्रियात होत असते. उत्कर्षानंतर उतार व कांहीं काळानंतर पुन्हा उत्कर्षाकडे जाणे असें वर खाली होणे व्यवहार चालण्यासाठी आवश्यक असते. देव ह्या जगातील उत्कर्ष गाठतात व असुर त्याला खाली खेचतात. ही वर खाली होण्याची प्रक्रिया विश्र्व सुरळीतपणे चालण्यासाठी आवश्यक असते. ते चालू रहाण्यासाठी असुरांना जे त्वश्त्रीचे निर्मित आहेत, अध्यात्मिक उर्जा संपादन करावी लागते. ते ती उर्जा ध्यान मार्गाने म्हणजे, तपस्या, इंद्रियनिग्रह, षड्रीपू विमोचन, ध्यान साधना, सोहम साधना अशा मार्गाने प्राप्त करत असतात. अशी रचना झाल्यानंतर देव चांगले कार्य घडवत असतांना असुर त्यांना मागे खेचण्यासाठी सतत प्रयत्न करत रहाणे ही विश्र्वाच्या कारभाराची व्यवस्था

आहे. हा खेळ अनादीअनंत काळ सदैव चालू रहाणार आहे, जसें सूर्य उगवणे व मावळणे हे सदैव चालू रहाणार आहे. त्यात प्रसंगी असुर देवांचे काम करतात तर कांहीं वेळा देव असुरांचे काम करत असतात. देव त्यांची अध्यात्मिक उर्जा कर्मयोगांनी (चांगुलपणा, भूतदया, माणूसकी, दयाबुद्धी, सत्पात्रांबद्दल सन्मानभावना अशा कर्माने) आणि ध्यानयोगांनी अशा दोन मार्गाने मिळवत असतात. त्या प्रमाणें, असुर त्यांची अध्यात्मिक उर्जा ध्यान मार्गाने मिळवत असतात व कर्म मार्गाने (पाप कर्म करून) नष्ट करत असतात. त्यामुळें बहुधा देव त्याच्या लढाईंत अखेरीस जिंकत असतात. एकाद्या खेळाला दोन गट असावे लागतात व ते दोन गट खेळतात तेव्हां कोणी जिंकतो व कोणी हरत असतो, तसा हा विश्वाचा खेळ आहे. देवांच्या दैवात सुख सांगितलेली आहेत व असुरांच्या दैवात दुःख सांगितलेले असते. जरी अरे राजा, अंती सुख व दुःख एका समानच असतात जाणकारांच्या दृष्टीने. मनुष्य मात्र सुखाची अपेक्षा करत असतो म्हणून, आपण माणसें देवांची आराधना करत असतो.

पुढे विदूर सांगतो, तीर्थक्षेत्री जाऊन स्नान करणे, दया भावना बाळगून सर्व प्राणीमात्रांशी वागणे, ह्या अध्यात्मिक उर्जा वाढवण्यास मदत करतात. त्यातल्या त्यात दुसरे जास्त प्रभावी समजले जाते. अहो राजन, तुम्ही तुमच्या सगळया मुलांना सारखेच न्यायाने वागवा त्यामुळें तुमची अध्यात्मिक उर्जा वृद्धींगत होईल. आपण स्वर्गात जाल. आपले नांव जगभर पसरेल व लोक आपली स्तुती करतील. तसें केल्याने त्यात आपला फक्त फायदा होणार आहे. त्या संदर्भात मी एक प्राचीन कथेचा उल्लेख केला होता ती सांगतो, त्यात विरोचन आणि सुधन्वन ह्यांचे संभाषण आहे ते सांगतो, ते दोघे केसिनीचा हात लग्नासाठी मागणार असतात. केसिनी ही एक अतिसुंदर ललना होती. चांगला योग्य पती मिळावा म्हणून ती तिचा स्वयंवर करण्याचे ठरवते. त्यासाठी दितीचा मुलगा विरोचन एक इच्छूक म्हणून तेथे जातो. त्याला पाहून केसिनी त्याला बोलते, "ब्राह्मण श्रेष्ठ कीं, दैत्य श्रेष्ठ ते मला सांग. तेथे ब्राह्मण पुत्र

सुधन्वन येतो. ती विरोचनाला विचारते हा सुधन्वन आहे तो ब्राह्मण आहे तो तुझ्या बाजूला कां बसू नये"? विरोचन तिला बोलतो, "आम्ही प्रजापतीचे वंशज आहोत. आम्ही सगळया प्राण्यात सर्वश्रेष्ठ आहोत. त्याबद्दल शंका नको. आम्ही दैवी आहोत, हे ब्राह्मण कोण आहेत? केसिनी त्याला सांगते कीं, तो त्या मांडवात बसून राहील. सुधन्वन उद्या येणार आहे, मला तुम्हा दोघाने एकत्र बसलेले पहावयाचे आहे. विरोचन तिला बोलतो, "प्रियदर्शनी लाजाळू मुली, तू जे सांगशिल ते मी करीन. तू आम्हा दोघांना एकत्र बसलेले पहाच".

ती कथा विदूर पुढे सांगत असतो, पहाटे सुधन्वन तेथे येतो तो पहातो कीं, प्रह्लादाचा मुलगा विरोचन आणि केसिनी तेथे त्याची वाट पहात आहेत. त्या ब्राह्मण पुत्राला येतांना पाहून विरोचन केसिनीच्या बाजूने उठून सुधन्वनाला तेथे बसण्यासाठी आसन देतो. त्याला पाय धुण्यासाठी पाणी देतो व अर्घ्यासाठी पाणी देतो. सुधन्वन त्याला बोलतो, "अहो प्रह्लाद पुत्र, मी तू दिलेल्या सुवर्णाच्या आसनावर बसू शकतो पण मी तुझ्या बरोबरीचा होत नाही". विरोचन त्याला तुच्छपणे उत्तर देतो, लाकडाच्या फळयावर नाहीतर प्राण्याच्या चामड्यावर नाहीतर कुस गवताच्या हत्रीवर तू बसण्याच्या योग्यतेचा आहेस. तुझी अशा आसनावर बसण्याची लायकी नाही". सुधन्वन त्याला सांगतो, "एकाच वयाचे बाप आणि मुलगा, दोन वैश्य, दोन शुद्र एकत्र बसू शकतात. त्यांच्या व्यतिरीक्त दुसरे तसे बसू शकत नाहीत असे नियम आहेत ऋषींनी केलेले, त्याबद्दल मी बोलत आहे. तुझे पिता माझ्या आसनापेक्षा खालच्या आसनावर बसून मला सन्मान देत असतात, तू एक छोटासा बच्चा आहेस लाडात वाढवलेला, तुला त्या गोष्टी समजणार नाहीत". हे त्याचे उत्तर ऐकून विरोचन त्याला बोलतो, आम्हा असुरांचे सगळे धनदौलत पणाला लावून आपण हा प्रश्न त्यांना विचारू जे त्याचे उत्तर देऊ शकतील". सुधन्वन त्याला

बोलतो, "तुझे सोने, पशु आणि इतर द्रव्य राहू दे, आपण आपल्या जीवाची बाजी लावू व त्यांना हा प्रश्न विचारू जे त्यात ज्ञानी आहेत". विरोचन त्याला अचंबीत होऊन विचारतो, "अरे, आपले जीवन पणाला लावून आपण कोठे जाणार? मी त्यासाठी कोणा देवांना जाऊन विचारणार नाही, अथवा माणसालासुद्धा विचारणार नाही".

सुधन्वन त्याला बोलतो, "आपण तुझ्या पित्याला हा प्रश्न विचारू, ते योग्य आहेत त्यासाठी. कारण प्रह्लाद त्याच्या मुलासाठीसुद्धा असत्य बोलणार नाहीत".

विदूर पुढे सांगतात, अशाप्रकारे पैज लागते, विरोचन आणि सुधन्वन प्रह्लाद जेथे बसले होते तेथे मोठ्या त्वेषाने निघतात. त्या दोघांना एकत्र पाहून प्रह्लाद नवल होतात व विचारतात, "तुम्ही दोघे मित्र झाला आहात वाटते पण असें रागावलेले कां दिसता? तुम्ही आधीपासून मित्र आहात कां"? ते ऐकून जरा घुश्शातच विरोचन त्याच्या पित्याला सांगतो, "आम्ही मित्र नाही, आमच्यात एक पैज लागली आहे, त्यासाठी आम्ही आपल्याकडे आलो आहोत. आमच्या प्रश्नाचे खरे खरे उत्तर आपण द्यावे".

प्रह्लाद बोलतो, अरे तेथे कोणी आहे कां, सुधन्वनासाठी पाणी, मध आणि दही आणा. त्याची मला पुजा करावयाची आहे. त्यानंतर सुधन्वनाकडे पहात तो असुरांचा राजा बोलतो, "आपल्यासाठी शुभ्र रंगाची गाय दान करण्यासाठी तयार आहे. सुधन्वन बोलतो पाणी, मध आणि दही मला नंतर द्या, आधी आमच्या प्रश्नाचे खरे खरे उत्तर द्या. तो प्रश्न विचारतो, "प्रश्न असा आहे कीं, कोण श्रेष्ठ, ब्राह्मण कीं, विरोचन"?

प्रह्लाद सांगतो, "अहो ब्राह्मणा, विरोचन हा माझा एकुलता एक पुत्र आहे. तू सुद्धा येथे स्वतः उपस्थित आहेस, आपण जर त्या प्रश्नावर भांडत असाल तर मी त्याचे खरे उत्तर कसे देऊ शकेन"? सुधन्वन त्याला बोलतो, "आपल्याला उत्तर जे खरे आहे ते द्यावे लागेल कारण, आपणच खरे बोलणारे आहात".

प्रह्लाद म्हणतो, "मी अशा परिस्थितीत काय करावे कारण मी खोटे बोलत नाही. अरे सुधन्वना, जर खोटे उत्तर दिले तर काय होईल"? सुधन्वन बोलतो, "जर खोटे उत्तर दिले तर तुमची जिभ झडेल. तुम्ही जेवू शकणार नाही. नगराच्या बाहेर फेकले जाल. तुमचे शत्रू तुम्हला मारतील. तुमचे पूर्वज स्वर्गातून खाली फेकले जातील. माणसासाठी खोटे बोलल्यास त्याचे सगळे पूर्वज बरबाद होतील, सोन्यासाठी खोटे बोलल्यास त्याचा वंश नष्ट होतो, जमिनीसाठी खोटे बोलण्याने त्याची सगळी संपत्ती नाहीशी होईल".

प्रह्लाद उत्तर देऊ लागतो, "अंगीरस माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. आणि सुधन्वन विरोचनापेक्षा श्रेष्ठ आहे. सुधन्वनाची आई तुझ्या मातेपेक्षा श्रेष्ठ आहे, त्या श्रेष्ठ सुदन्वनाशी तू पैज हरला आहेस माझ्या मुलां, तू आता त्याचा दास झाला आहेस". असें प्रह्लाद सांगतो. पुढे तो बोलतो सुधन्वनाला, "तरी सुद्धा तू ब्राह्मण आहेस म्हणून मी तुला विनंती करतो कीं, तू त्याला मुक्त करशिल". सुधन्वन बोलतो, "अहो असुरांचे राजे आपण आपल्या सत्यवचनाची प्रचिती दिली आहे म्हणून तो तुमचा अधिकार आहे कीं, कांही मांगावे व त्या प्रमाणें मी आपली इच्छा मान्य करवी व तुमच्या मुलाला विरोचनाला माझ्या

दास्यत्वातून मुक्त करतो. परंतु, त्या आधी तो माझे पाय धुवेल व तेसुद्धा ह्या सुंदर केसिनीच्या समक्ष".

हे सांगून झाल्यावर विदूर धृतराष्ट्राला बोलतो, त्यासाठी जसे प्रह्लाद मोहात न पडता खरे सांगतो तसे तुम्हीसुद्धा खरे ते मान्य करून पांडवांची संपत्ती, जायदाद जी तुम्ही हडपली आहे ती त्यांना सन्मानपूर्वक परत करावी. नाहीतर तुमच्या कुळाचा नाश कोणीही टाळू शकणार नाही. देवांच्या दरबारात आपल्याला पत उरलेली नाही. वेदसुद्धा अशा माणसाला मदत करत नाहीत जो खोटेपणाने दुसऱ्याची संपत्ती गिळंकृत करतो. कुमार्गाने कमावलेली संपत्ती माणसाला नरकात फेकते त्याचा विचार करावा. दारुडेगिरी, भांडणखोरी, पुष्कळ लोकांशी झगडे करणे, पती पत्नीतील झगडे, दुफळी, राजाशी अप्रामाणिकपणा, अशा सगळ्या कुकर्माचे फळ पाप असते. त्याचा त्याग करावा. हस्तज्योतिषी, व्यापार करणारा चोर, व्याध, वैद्य, शत्रू, पुजारी, मित्र हे साक्षीदार होऊ शकत नाहीत, कारण त्यांचे कर्म खोटेपणाने भ्रष्ट झालेले असू शकते. घमेडखोरीतून केलेले यज्ञ, दुसऱ्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करणे, खोट्या अभ्यासाचे सोंग धरणे, हे धोकादायक असतात. दुसऱ्याच्या घराला आग लावणारा, विष खायला  लावणारा, सोम विकणारा, बाण बनवणारा, मित्राचा घात करणारा, भेसळ करणारा, गर्भपात करणारा वैद्य, स्वताच्या गुरूच्या बायकोशी निजणारा, व्यसनात अडकलेला ब्राह्मण, कडक भाषा वापरून बोलणारा, जुने सामान विकणारा, भंगाराचा धंदा करणारा, जुगार खेळणारा, देव न मानणारा, वेदाची बदनामी करणारा, लाच खाणारा, चोरून गाय कापणारा, क्षमेची याचना करणाऱ्याला ठार मारणारा, हे सगळे गुन्हे ब्रह्महत्त्येसारखे अपराध समजले जातात.

सोन्याची पारख आगीने होते, माणसाची त्याच्या कुळावरून, माणसाच्या प्रामाणिकपणाची त्याच्या वागण्यावरून, शूराची पारख संकट काळी होते, संयमाची परीक्षा गरीबीत होते, म्हातारपणी सौंदर्याची परीक्षा

होत असते. हे असें असले तरी अहो राजन राजाची कृपा झाली तर सगळे बदलते, कारण पृथ्वीवर राजा देवासारखा असतो. त्याची मर्जी म्हणजे सगळे आले. त्याच्या मर्जीने सगळे ठरत असते. तो सांगेल ती पूर्व दिशा असते. आठ गोष्टी अशा आहेत ज्या वेगळया करता येत नाहीत. त्यातील पहिल्या चार चांगुलपणाशी निगडीत असतात. उरलेल्या चार संयमाशी संबंधित असतात. पहिल्या चार अशा, यज्ञ, दान, अभ्यास, वैराग्य, दुसऱ्या चार अशा, साधेपणा, अहिंसक प्रवृत्ती, संयम, दयाबुद्धी, त्याशिवाय समाधान, सत्याची चाड, हे चांगुलपणाचे भाग असतात. ह्या सगळया आचरण्यात आणणे राजाला आवश्यक असते. जे नैतिकता समजतात त्याना प्रौढ समजले जाते. नैतिकता सत्याला धरून असते. लुच्चेगिरी जेथे आहे तेथे सत्य नसते. राजात त्या स्वभावतः असल्या पाहिजेत त्या अशा, सत्याची चाड, सौंदर्य दृष्टी, धर्मग्रंथाची ओळख, ज्ञान, उच्च कुलीन जन्म, सुस्वभाव, सामर्थ्य, संपत्ती, शौर्य, बोलण्याची कला. पाप करणारा त्याच्या पापकर्मामुळें त्यात अडकत जातो. गुणी माणूस त्याच्या चांगल्या वागण्यामुळें स्वतः व त्याच्या बरोबरील इतर असें सगळे सुखी होतात. म्हणून माणसाने पाप करण्यापासून दूर रहावे. पापात रमणाऱ्याचा विवेक नष्ट होतो. विवेक नष्ट झाल्यामुळें तो पुन्हा पाप करत रहातो. त्याच्या नेमके विरुद्ध पुण्य करण्याचे असते. तो अधिकाधिक शुद्धबुद्धी होत जातो. त्याला उत्तम गती प्राप्त होते. क्रौर्य, भांडखोरपणा, लुच्चेगिरी, असें करणारा त्याच्या त्या पापकर्मात स्वतः अडकत जातो. त्यातून तो बाहेर येऊ शकत नाही. शहाणा माणूस त्यात पडत नाही. अरे माझ्या भावा, तू हे सगळे पाळलेस तर तुला चिंता करावी लागणार नाही व तू सुखाने झोपू शकशिल. कारण कीं, तू व तुझे चिरंजीव पुण्याच्या मार्गापासून दूर गेला आहात तुझा आत्मा तुला सतावत आहे व म्हणून तू बेचैन झाला आहेस. तुझे मन तुला खात आहे कारण आत्मा कधीही पापाला स्वीकारत नाही. तो पापी लोकांना सतत बेचैनीत ठेवतो जे तुझ्याबाबत होत आहे. तुला माहीत आहे कीं, तू व तुझी मुलं पंडुच्या मुलांवर अन्याय करत आहात म्हणून तू शांतपणे झोपू शकत नाही.

कारण ते पाप तुला खात आहे. तुझे तुझ्या मुलांवर प्रेम आहे त्यामुळें त्यांचे भवितव्य धोक्यात आहे व त्याला तू जबाबदार आहेस ह्या गोष्टी तुला सतावत आहेत. ते सगळे तूंच केले आहेस, वेळीच दुर्योधनाला आवरले असतेस व त्या शकूनी आणि कर्णाला चाप लावला असतांस तर हे दिवस आले नसते. शेवटी सगळयाचा हिशोब यम करणार आहे तेव्हां तू काय जाब देशिल तेथे? खरा राजा तो जो अन्याय कोणावरही करत नाही. असा राजा पृथ्वीवर राज्य करतो. त्याला सगळे मानतात. तू त्या योग्यतेचा राहिला नाहीस.

तुझ्या राज्याची मदार तू दुर्योधन, दुःशासन, शकूनी आणि कर्ण अशांच्या हातात दिली आहेस जे फक्त पाप करत आहेत मग तुला शाती कशी मिळणार, अरे राजा, तुझ्या मुलांच्या व त्यांच्या दोस्तांच्या पापाची शिक्षा तू भोगणार आहेस कारण तू त्यात भागिदार झाला आहेस. हे केव्हां तुझ्या लक्षात येणार? पांडव तुला त्यांच्या पित्याच्या जागी पहात आहेत ते तू कां समजत नाहीस? त्यांच्यावर अन्याय तू केला आहेस त्याची तुला भिती वाटत आहे. त्यातून बाहेर येण्यासाठी तू त्यांना न्याय दे, हा एकच मार्ग आहे.

अशारितीने प्रजागर पर्व भाग पस्तीसावा संपला.

# प्रजागर पर्व

## भाग छत्तीसावा

विदूर पुढे सांगतो, ह्या संदर्भात मी फार प्राचीन काळी झालेले एक संभाषण, अत्री आणि साध्य देवतेत, त्याचा दाखला देत आहे. साध्य देवता ऋषी अत्रेयाला प्रश्न विचारते, जेव्हां तो व्रतस्थ ऋषी भिक्षूकाच्या रुपात भटकत होता. साध्य देवता ऋषीला विचारते, "आम्ही साध्य देवता म्हणून समजल्या जातो, परंतु, आम्हाला समजत नाही आपण कोण आहात? आम्हाला असें वाटते, कीं, आपण संयमी व बुद्धीमान आहात कारण आपण वेदांचा अभ्यास केला आहे. तेव्हां जर आपण आपले वेदाचे ज्ञान आम्हाला द्याल तर बरे होईल". ते ऐकल्यावर अत्री ऋषी त्या देवतांना सांगतात, "अहो अमर देवतांनो, सगळया वासनांना काबूत ठेवून मनाचा निश्र्चय करून आणि धर्माचे पालन करून सगळे प्रिय आणि अप्रिय एकाच योग्यतेचे ठरवून जगणे, त्याशिवाय दुसऱ्यांचा अपमान न करता, दुसऱ्याला पिडा न देता, पुण्य कर्मात व्यस्त राहून, इतरानी केलेल्या अपमानाकडे दुर्लक्ष करून जो भांडणतंटा न करता, मनाचा तोल जाऊ न देता, असा रहातो कीं, त्याच्या संगतीत कोणी ते दोष असलेला नसेल, नम्रता पूर्वक, क्रोध आवरून, गोड शब्दात बोलणारा, जो माणूस वेदाचा ज्ञानी समजावा. ज्याच्यात हे सगळे गुण आले आहेत तो बैरागी समजावा कारण तो कशानेही विचलित होत नाही. अशारितीने रहाणाऱ्यावर जे आरोप, टीका, अपमान, दुःखदायक प्रसंग, छळ कोणी केले ते सगळे त्यांनाच परत जातात व हा मात्र त्या सगळया पिडांपासून मुक्त रहातो. अपमान करणाऱ्याला पाप लागते ज्याचा अपमान झाला त्याला कांहींच दोष लागत नाही. त्याला वेदाचा अभ्यासक समजले जाते. अशा माणसावर लक्ष्मी प्रसन्न होते (अध्यात्मिक उर्जा वाढते) व देव त्याच्याशी मैत्री करण्याचा प्रयत्न करतात. असा माणूस मौन धरतो कारण बोलण्यापेक्षा मौन जास्त हितकारक असते.

असा माणूस सगळ्या दुःखापासून मुक्त होतो. असा माणूस कोणाला हरवत नाही व कोणाकडून हरत नाही. त्याला कौतुक बाधत नाही व टीकासुद्धा बाधत नाही. तो दुसऱ्यांचे दुःख समजतो, तो खरे बोलतो, त्याचा आवाज कधी चढत नाही, ज्याच्या रोमारोमातून फक्त चांगुलपणा आढळतो, जो दुसऱ्याच्या कमजोरीचा गैरफायदा उठवत नाही. जो सगळयांच्या भल्याचा विचार करतो. असे असतात वेदाच्या शिकवणूकाचा उपयोग करणारे. आता सांगतो, वेदाची शिकवणूक न मानणाऱ्याचे वर्तन कसे असते. त्याचा स्वताच्या वासनांवर संयम नसतो, राग आवरत नाही, कृतघ्न असतो, पोटात पाप असते, सदैव असमाधानी असतो, संशयी असतो, विश्र्वासघात करतो, खोटे बोलतो बिनदिक्कतपणे, स्वार्थाने सगळी काम करतो, फायद्यासाठी दोस्ती करतो, वाईट लोकांशी दोस्ती करतो, पाप मार्गाने धन संपत्ती मिळवतो, तो बहुधा हलक्या कुळात जन्मलेला असतो, अशा माणसाला तामसी मनुष्य समजतात. त्याची अध्यात्मिक उर्जा नीचावस्थेत असते".

ते ऐकल्यावर धृतराष्ट्र विदूराला विचारतो, "देव पुण्य आणि हित दोनही प्राप्त करतात. ते ज्ञानी असतात, ते उच्च कुळात जन्म घेणे पसंत करतात, तेव्हां मला सांग विदूरा, उच्च कुळ कशाला म्हणावयाचे"?

विदूर बोलतो, "ज्या कुटूंबात वैराग्य प्रवृत्ती आहे, ज्या कुटूंबातील सदस्य संयमित जीवन जगतात, त्यांच्या घरात वेदांचा अभ्यास होत असतो, जे सत्याचा आग्रह धरतात, जे स्वाभिमानामुळे वाईट कर्मात रमत नाहीत, जे त्यांच्या पितरांची पुजा करतात, श्राद्धविधी न चुकता करतात, जो त्यांच्या सारख्या समगुणी लोकांशी नातेसंबंध पसंत करतात. जे त्यांच्या कुळातील पूर्वजानी केलेल्या चांगल्या कामाची आठवण करून त्याप्रमाणे वागतात, ज्यांच्यात खोटेपणा नसतो, अशा कुटूंबाना उच्च कुळ समजले जाते. परंतु, जर ते यज्ञ करण्याचे विसरले, हलक्या कुळात लग्न करतील, तर ते त्यांचे उच्चपण

घालवून बसतात. चांगली वागणूक, प्रामाणिकपणा, संपन्नतेपेक्षा उत्तम गुणांची चाड असलेले उच्च ठरतात. त्यांची त्या गुणांमुळें ख्याती सगळीकडे होते. केवळ धनदौलत, पशुधन आहे म्हणून ते कुटूंब उच्च ठरत नाही. ज्या गोष्टी भाग्याने प्राप्त होतात त्यापेक्षा कर्तृत्वाने जे प्राप्त केले आहे ते त्या कुटूंबाची उच्चता ठरवण्यात कारणीभूत होत असते. आपल्या समाजात जे ब्राह्मणांचा अपमान करतात, त्यांची हत्त्या करतात ते उच्च कुळिन समजले जात नाहीत. उच्च कुलिन लोक कधी कोणाचा अपमान करत नाहीत. त्यांच्या वागण्यात इतरांबद्दल सन्मानाची भावना आढळून येते. ते तसे न वागणाऱ्यांशी संबंध ठेवत नाहीत. त्यांचा राग संयमित असतो. त्याचे लोभ, मोह सुद्धा मर्यादीत असतात. ते लोक स्त्रीयांशी अदबीने वागतात. लहान मुलांचा अपमान करत नाहीत. त्याचा आवाज क्वचितच वाढतो. ते स्वताचा अपमान सहन करत नाहीत. माणूसकी, चांगुलपणा आणि भूतदया हे त्यांचे स्वभाव असतात. त्यांचे बोलणे, चालणे व सगळे वागणे शिष्टाचाराला धरून असते. मना विरुद्ध कांहीं झाले म्हणून ते चटकन रागावत नाहीत परंतु, त्या मागील कारण शोधून त्या प्रमाणे त्यांची प्रतिक्रीया देतात.

माणसात दुःखामुळें बरेच बदल होतात ते सांगतो, त्यामुळे तो कमजोर होतो. त्याची सद्सद बुद्धी काम करेनाशी होते. त्याचे तेज नाहीसे होते, त्याला आजारपण येऊ शकते, अशा माणसाचे वैरी त्यामुळें आनंदी होतात. मित्र दुःखी होतात. म्हणून अरे राजा तू दुःखाच्या भावने पासून दूर रहा.

माणसें पुन्हा पुनः जन्मतात व मरतात, मोठे होतात अथवा लहान होतात, मदत मांगतात व मदत दुसऱ्याला देतात, जीवनात हे सगळे येतच असतात त्यावर जास्त विचार करू नकोस. परंतु तुझं जे दुःख आहे ते तुझ्या अपराधीपणातून उत्पन्न झालेले आहे. आपली सहा ज्ञानेंद्रीये सदैव अस्वस्थ असतात. कारण त्यांचे समाधान होत नसते.

धृतराष्ट्र विदूराला विचारतो, "राजा युधिष्ठीर अग्नीसारखा तेजस्वी आहे, त्याला मी, त्याच्या काकांने फसवले आहे, तो निश्चितपणे माझ्या कुळाचा युद्धात सर्वनाश करू शकतो. मला सगळीकडे फक्त धोका दिसत आहे. माझी मुलं माझ्या अदूरदृष्टीमुळें मारली जाणार आहेत ह्या विचारांने मी सतत काळजी करत असतो. त्यामुळें मला झोप लागत नाही. माझी बुद्धी काम करानाशी झाली आहे. तू खूप हुशार आहेस मला त्यावर काय उपाय आहे ते सांग".

विदूर त्याला बोलतो, "अहो निष्पाप राजा, तुझे कल्याण तीन गोष्टींत मला दिसते, त्या अशा, तू वैराग्य धारण करावेस, तू तुझ्या वासनांवर नियंत्रण ठेवावेस, तू लोभीपणाचा त्याग करावास. ज्ञानाने भिती नाहीशी होते, वैराग्य वृत्तीने गोष्टींचे मुल्य समजते, ब्राह्मणांच्या सानिध्याने शहाणपण मिळते, संयमाने मनःशांती प्राप्त होते. ज्याना यज्ञ करावयाचे नाहीत, जे मोक्ष प्राप्त करू इच्छितात, परंतु, वेदाभ्यास करू शकत नाहीत, दान धर्म करत नाहीत, परंतु ते क्रोधावर काबू ठेवू शकतात, ते इंद्रीय संयमाने ते साध्य करू शकतात. जे निष्काम बुद्धीने कर्तव्य म्हणून युद्ध करतात, जे मारतांना शत्रूबद्दल दया भावना बाळगतात, त्यांना मृत्यूनंतर चिरशांती प्राप्त होते.

जे त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या आप्तांना धोका देतात, त्यांना शांतपणे झोप लागू शकत नाही. त्यांचा आत्मा त्यांना सतत प्रक्ष्न विचारत रहातो ज्याचे उत्तर त्यांच्या कडे नसते. जे बायकांत रमतात, ज्यांना स्वताची स्तुती ऐकावयाला आवडते, ते कधीही अध्यात्मिक उर्जा वाढवू शकत नाहीत. अशा लोकांचा नाश लवकर होतो.

ज्यांच्या वागण्यामुळें कुटूंबाची एकी नष्ट होते ते त्यांच्या हातांने त्यांच्या नाशाचा होम पेटवतात. तुझ्या कडून ती चूक होत आहे, धृतराष्ट्रा. जो ब्राह्मण, बायका, पशुधन, नातेवाईक ह्यांची पर्वा करत नाही ते स्वताच्या

मूर्खपणामुळें संपतात. एका धाग्या पेक्षा अनेक धाग्यांचा दोरखंड जास्त मजबूत असतो, एकेकटे झाड वादळात कोसळते पण एकत्र वाढलेल्या झाडांचा समुह वादळाच्या वाऱ्याला दाद देत नाहीत. म्हणून संघ शक्तीचा अव्हेर तुझी मुलं करत आहेत त्यामुळें त्यांचे राज्य संपुष्टात येणार हे निश्चित. अल्पमती लोक मामुली मतभेदांना वाढवून एकी मोडतात ते त्या कुळाच्या नाशास कारणीभूत असतात. धनाशिवाय माणसाला शोभा नसते. परंतु जर तुम्ही आरोग्य संपन्न असाल तर धनसुद्धा मिळवू शकता म्हणून पहिली संपत्ती आरोग्य, दुसरी संपत्ती बुद्धी, तिसरी संपत्ती धनदौलत, चौथी संपत्ती अध्यात्मिक उर्जा असते. शेवटची संपत्ती माणसाच्या आत्म्या बरोबर मृत्यूनंतर असते. इतर संपत्ती त्याच्या मृत्यूनंतर त्याला सोडून देतात म्हणून माणसांने अध्यात्मिक उर्जा संपादन करणे हेंच श्रेयस्कर असते.

"द्युतात जेव्हां दुर्योधन द्रौपदीला जिंकतो तेव्हांच मी तो खेळ थांबावयास सांगितले होते. पण तू तो खेळ तसांच चालू ठेवलास. कां तसे केलेस सांगू शकशिल? त्यात तू कोणता आनंद मिळवत होतास? तुला त्यावेळी आपल्या कुळाची इभ्रत चवाठ्यावर येत आहे हे समजले कां नाही? आता झोप लागत नाही असें बोलण्यात कोणते शहाणपण आहे? पाप करतांना मजा वाटते, त्या मजे नंतर मोठे गंडांतर येते ते तुला नाही समजले"?

म्हणून मी सांगतो ते ऐक, पांडवांत व कौरवात समेट घडवणे फक्त तुला शक्य आहे त्या करतां तुला तो तुझा शकूनी आणि तो राधेय कर्ण ह्यांना दुर्योधनापासून वेगळे करावे लागेल. जे तू एका आज्ञेने करू शकशिल. जर कौरव आणि पांडव एकत्र आले तर कुरुवंशाची संपत्ती कितीतरीपट वाढेल आणि सगळे सुखात राहू शकतील. कुटूंबात शांती, प्रेम, सलोखा व आनंद खेळू लागेल. हे फक्त तूंच करू शकतोस. कारण दुर्योधन तुझ्या आज्ञे बाहेर जाणार नाही.

तुझी ख्याती वाढेल. तुझ्या शत्रूंना वचक बसेल. दुर्योधनाला त्या दोघांपासून दूर कर कारण, ते दोघे शकूनी आणि कर्ण दुर्योधनाचे सतत कान भरत असतात.

अशारितीने प्रजागर पर्व भाग छत्तीसावा संपला.

# प्रजागर पर्व

## भाग सदोतीसावा

विदूर बोलतो, अरे विचित्रवीर्याच्या पुत्रा, मनू जो स्वयंभूचा मुलगा आहे, तो सात व दहा प्रकारच्या माणसांबद्दल सांगत होता. जे हवेत वार करतात. इंद्रधनुष्य उचलण्याच्या गप्पा मारतात. सूर्याचे किरण पकडण्याच्या गोष्टी करत असतात. ते मूर्ख लोक कोण ते सांगतो, जे अशक्य गोष्टी करण्याच्या वल्गना करतात, जो समाधानी असतो, जो शत्रूला सामील होतो, जो बायकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो, जो अशांकडे दान मागतो ज्यांच्याकडे कधी दान मांगावयाचे नसते, जो कांहीं न करता मोठ्या मोठ्या बाता मारतो, जो उच्च कुळात जन्मला तरी हलक्या कुळांशी संबंध ठेवतो, जो कमजोर असूनही बलवानांना आव्हान देतो, तो गंभीर बाब हसण्यावरी नेतो, जे अशक्य आहे ते मिळावे म्हणून इच्छा धरतो, तो सासरा आपल्या सुनेवर नजर ठेवतो, जो दुसऱ्याच्या शेतात लावणी करतो, जो सुनेला घाबरतो, जो आपल्या कुटूंबातील लोकांची निंदा बाहेर करतो, जो दुसऱ्याने केलेले उपकार विसरतो, जो दिलेले वचन मोडतो हसण्यावर नेतो, जो खोट्या गोष्टीला प्रोत्साहन देतो असें कीं ते खरे आहे, जो खऱ्या गोष्टी खोट्या आहेत असे सांगतो, अशा माणसांना यमाचे सेवक त्यांच्या फाशात पकडून थेट नरकात फेकून देतात.

जो इतरांशी तसा वागतो जसे ते त्याच्याशी वागावेत अशी त्याची अपेक्षा असते. समाजातील विविध थरातील लोक एकमेकांशी अनादर न करता वागतात तो समाज सात्त्विक समजला जातो. रजोगुणी माणसे जशास तसे असे वागतात. म्हणजे चांगल्याशी चांगले व वाईटाशी वाईट. म्हातारपणामुळें माणसाची कार्यक्षमता लयास जाते. त्याचे धैर्य कमी होते, तो वासना असूनही शरीराची साथ नसल्याने अस्वस्थ होतो.

वाईट लोकांच्या सानिध्यामुळें पापप्रवृत्ती वाढते आणि अध्यात्मिक उर्जा कमी होऊ लागते. त्यामुळे पत प्रतिष्ठा संपुष्टात येते.

धृतराष्ट्र विचारतो, "वेदात माणसाचे आयुष्य शंभर वर्षे सांगितले आहे. परंतु, फार थोडे जण तितके जगतात असें कां होते"?

विदूर उत्तर देतो, वासनांध जीवन, घमेंडखोरी, जास्त व अपशब्द बोलण्याची सवय, जास्त खाणे आणि क्रोध ह्यापैकी कांही किंवा सगळें त्याचे आयुष्य कमी करतात. ह्या सवयी त्याला मारतात, यमाचे दूत नाही मारत.

जो विश्र्वासघात करतो, जो आपल्या गुरूच्या बायको बरोबर झोपतो, जो ब्राह्मण शुद्र बाईछी लग्न करतो, मद्य प्राशन करतो, जो दुसऱ्याची कसलेली जमीन हडपतो ते सगळे ब्रह्म हत्त्येचे पातक केल्या प्रमाणे नरकात जातात.

वेद सांगतात कीं, जो चांगले शिक्षण घेतो, जो नितीनियम आचरण्यात आणतो, जो दुसऱ्यांवर विनाकारण दबाव आणत नाही, जो देव आणि पितरांची पुजा करतो, जो द्वेष करत नाही, जो कोणाला पिडा देत नाही, जो कृतकृत्य होतो, जो उपकार विसरत नाही, असा माणूस स्वर्गात जातो त्याच्या मृत्यू नंतर.

हितकारक सल्ला नेहमी आवडण्यासारखा नसतो, परंतु, तो औषधासारखा उपयोगी असतो म्हणून तसा सल्ला देणाऱ्याला जो मान देतो तो यशस्वी होतो. गोड बोलणारे आवडतात पण ते बहुधा अहितकारक असतात, त्यासाठी गोड बोलणाऱ्यांपासून राजाने सावध असले पाहिजे.

कुटूंबाच्या भल्यासाठी त्यातील एका व्यक्तीचा त्याग करणे उचित समजले जाते. गांवाच्या हितासाठी एका कुटूंबाचा त्याग करावयाची परवानगी असते, राज्याचे हित राखण्यासाठी एका गांवाचा बळी देण्याची संमती असते. परंतु, एका आत्म्याच्या उद्धारासाठी त्याने सगळया पृथ्वीच्या सुखांचा त्याग

करावयाचा असतो. भविष्यात येऊ शकणाऱ्या आपत्ती पासून संरक्षण म्हणून कोणी संपत्ती साठवू शकतो. त्या संपत्तीने तो त्याच्या परिवाराचे संरक्षण करू शकतो, तो स्वताच्या भल्यासाठी त्याची संपत्ती आणि पत्नी दोघांचा त्याग करू शकतो. फार प्राचीन काळापासून असें दिसते कीं, द्युतामुळें झगडे होतात. म्हणून शहाणा इसम द्युत गंमत म्हणून सुद्धा कधी खेळत नाही. म्हणून अरे प्रतिपाच्या पुत्रा, मी तुला त्यावेळीच सांगितले होते कीं, हा डाव आपल्या घरात नको पण तू ऐकले नाहीस, माझे ते हितकारक बोलणे कटू वाटले. तुला तुझ्या पुतण्यांचा ऱ्हास करावयाचा होता, त्यांचे प्रज्वलित यश, त्यांचा राजसुय यज्ञ तुला बघवले नाहीत, जे पवित्र होते व तू तुझ्या कोल्ह्या सारख्या दुर्योधनाच्या बोलण्यात आलास, त्याचे परिणाम आता तुम्ही सगळयांना भोगावयाचे आहेत. जेव्हां युद्ध होईल तेव्हां तुला फक्त दुःख करण्याशिवाय कांहीं उरणार नाही. जो त्याच्या खऱ्या हितचिंतकांचे एकत नाही तो नेहमी अरिष्टात अडकत असतो. हिरकारक परंतु, कटू सल्ला देणाऱ्या नोकराला जो सजा करतो तो अंती नाश पावतो. तशा वागण्याने त्या राजाभोवती फक्त खोटे गोड बोलणारे जमा होतात जे त्याचा नाश करतात. प्रामाणिक सेवकांचा मान राखणारा राजा यशस्वी होतो. चांगले दोस्त राजे जमवणे शहाण्या राजासाठी आवश्यक असते. राज्याची कुवत बरोबर ओळखून जो मंत्री राजाला सल्ला देतो तो राजाचा दुसरा हात समजावा. जो मंत्री त्याच्या मर्जीने वागतो त्याला राजा त्वरित कामावरून काढून टाकतो नाहीतर राज्याचे तो नुकसान करू शकतो. चांगला नोकर कसा असावा त्याबद्दल जाणकार सांगतात, तो दुरभिमानी नसावा, नम्र असावा, उलट न बोलणारा, नीटनेटका असावा, भ्रष्ट नसावा, मुद्याला धरून बोलणारा असावा.

शत्रूच्या घरात शहामा माणूस रात्री जात नाही. दुसऱ्याच्या घरात डोकावणे शिष्टाचाराला धरून नसते. ज्या बाईवर राजा प्रेम करतो त्या बाईच्या प्रेमात पडू नये. हलक्या कानाच्या माणसाच्या विचारांची दखल घेऊ नये. राजाला कधी सांगू नये कीं, तुम्ही त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत

नाही. व्यभिचारी बाई, राजाचा नोकर, बंधू, लहान बाळ असलेली माता, सैनिक, नुकताच नुकसानीने वैतागलेला अशांशी कधी पैशांचे व्यवहार करू नयेत.

ही आठ लक्षणं माणसाची योग्यता दाखवतात, त्याचे शहाणपण, कुळ, वेदाचा अभ्यास, संयमीपणा, हिम्मत, बोलण्याची तऱ्हा, दान करण्याची क्षमता, कृघ्नता. अशा गुणांची माणसे राजा भेटी देऊन आपलीशी करू शकतो. जेव्हां राजा एकाद्यावर कृपा करतो, त्या माणसाचे भाग्य उजळून निघते. जो अर्घ्य देतो, त्याला मनाची ताकद, सौंदर्य, स्वच्छ आवाज, सगळी मुळाक्षर तो उच्चारू शकतो, सुगंध, स्पर्शसुख, मार्दव, अशा त्याच्या गोष्टीत सुधारणा होते.

जो मनुष्य मिताहारी आहे त्याचे आरोग्य चांगले रहाते, दीर्घायुषी होतो, त्याची मुलबाळ सुद्धा निरोगी होतात. त्याच्या खाण्यावरून त्याची कोणी गंमत करत नाही.

ह्या लोकांना घरात थारा देऊ नये ज्याची वर्तणूक वाईट आहे, ज्याचा सगळे द्वेष करतात. जो चोर आहे, जो क्रूर आहे, जो मूर्ख आहे, ज्याला समय प्रसंग ह्याचे भान नसते. जो व्यवस्थित रहात नाही.

स्वाभिमानी माणूस कितीही वाईट परिस्थिती आली त्याने कंजूष माणसापुढे लाचार होऊ नये. ज्याचा शास्त्राचा अभ्यास नाही त्याच्याशी संगत करणे धोक्याचे होऊ शकते. रानटी, धूर्त, बेपर्वाई करणारा, दूष्ट, कृतघ्न, अशांपासून सांभाळून रहावे.

त्या सहा प्रकारच्या लोकांवर विसंबून राहू नये, शत्रू, चुका करणारा, खोटेपणात रमलेला, देव न मानणारा, जो स्वताला फार शहाणा समजतो, निर्दय.

कार्य व त्याचा परिणाम एकमेकांवर विसंबून असतात.

मुलांना जन्म दिल्यावर त्यांना मोठे करावे व आपण संन्यासाश्रमात जावे हेंच योग्य असते. विधात्याची कृपा पाहिजे असेल तर सगळयाचे भले करावे व त्यापासून कोठलीही अपेक्षा करू नये. यश ते जे विधाता मानतो. माणसे कांहींही मानतील पण त्यात तथ्य नसते. आपल्या अहंकारामुळें अरे धृतराष्ट्रा तुझे असें झाले आहे. तू देवाला खऱ्या अर्थाने मानत नाहीस.

ज्याच्या कडे बुद्धीमत्ता आहे, सामर्थ्य आहे, हिम्मत आहे, ताकद आहे, सावधपणा आहे आणि चिकाटी आहे त्याला सगळया अडचणींवर मात करता येते.

पांडवांचे दुःख पाहून इंद्र हैराण झाला आहे, त्याचे कारण तुझे मुलगे पांडवांशी विनाकारण वैर करत आहेत. तू सतत काळजी करत असतोस आणि सगळया राज वंशांत कुरु घराण्याची छीःथूः झाली आहे. ह्या सगळयांमुळें तुझ्या खऱ्या शत्रूंना फार आनंद होत आहे. त्याचा परिणाम म्हणून युधिष्ठीर सगळे कौरव मारून टाकणार आहे. कारण केल्या कर्माचे परिणाम भोगावेच लागतात. जर तू मनात आणलेस तर तुझे शंभर पुत्र, पंडुचे पांच आणि कर्म असें मिळून सगळया तिनही जगांवर राज्य करू शकता.

अशी कल्पना कर, तू म्हणजे एक वन आहे, त्यांत पांडव सिंह आहेत, ते वन तोडू नकोस कारण त्यातील सिंह तुला भारी जातील. सिंहाशिवाय वन आणि वनाशिवाय सिंह असू शकत नाहीत. जे पापी आहेत त्यांना दुसऱ्यांचे चांगले गुण समजत नाहीत. ज्यांना अतिम यश पाहिजे ते पुण्याचाच मार्ग धरतात. खरे यश ते जे विधाता आपल्यावर खूष होऊन आपल्याला देतो. ज्याने क्रोध, लोभ ह्यांना आवरले तो कधी अडचणीत येत नाही.

असें सांगतात, माणसाच्या पांच ताकदी आहेत, त्यातील शरीराची सर्वात कमी महत्वाची असते, चांगले सल्लागार ही दुसरी ताकद, वास्तविक संपत्ती तिसरी उच्च कुळात जन्म चौथी संस्कार जे त्याला त्या घरात मिळतात.

असा कोणी वैद्य नाही कीं कोणी मांत्रिक नाही कीं कोणी अथर्ववेदातील मंत्र जे तुला उपयोगी येतील.

अशारितीने प्रजागर पर्व भाग सदोतिसावा संपला.

# प्रजागर पर्व

## भाग अडोतिसावा

विदूर पुढे सांगत असतो, सुसंस्कृत तरूण माणसाला फार संतोष होतो जेव्हा एकादा वयस्कर माणूस त्याच्याकडे अतिथी म्हणून येतो. तो त्याचे स्वागत करतो, त्यांना बसण्यासाठी आसन देतो, त्याला पाय धुण्यासाठी पाणी देतो, त्याबरोबर त्यांचे क्षेमकुशल विचारतो, त्यानंतर स्वताचे सांगतो, त्या बोलण्यानंतर तो त्या अतिथीला जेवायला देतो. शहाणे समजतात कीं, माणूस त्याच्या भ्रमात असतो कीं, त्याने दिलेले पाय धुण्याचे पाणी व इतर भेटी मंत्रशास्त्र शिकलेला ब्राह्मण स्वीकारणार नाही. त्या भेटवस्तुंबद्दल तो शंका घेईल. पण तसे नेहमी होत नाही.

वैद्य, बाण बनवणारा शिकलगार, ब्रह्मचर्याचे व्रत सोडलेला, चोर, वाईट प्रवृत्तीचा माणूस, दारु पिणारा ब्राह्मण, गर्भपात करणारा, सैनिक, तो जो वेदाचा अभ्यास पैसे घेऊन शिकवतो असे कोणीही आले तरी त्यांना पाय धुण्यासाठी देणे चांगले असते. वेदाभ्यास करणाऱ्या ब्राह्मणांने मिठ विकू नये. शिजलेले अन्न, दही, दूध, मध, खाण्याचे तेल, पालेभाज्या, रंगवलेले कपडे, अत्तरं, इत्यादीचा व्यापार करू नये.

जो कधीही रागवत नाही, ज्याला कधी दुःख होत नाही, ज्याला मित्र असावेसे वाट नाही, जो कधी वाद तंटा करत नाही, ज्याला स्तुती व टीका सारखीच असते, अशा वास्तविक विकारांपासून मुक्त असतो त्याला खरा योगी समजले जाते. असा जो वनात उगवलेले कंदमुळं, भाज्या, वनात नैसर्गिकरित्या उगवलेला भात असें खातो तशा माणसाला अतिथी म्हणून स्वीकारण्यात मोठे पुण्य प्राप्त होते. एकाद्याचे नुकसान केले तर त्या माणसाच्या पासून दूर रहाणे चांगले असते. माहीत नसलेल्या माणसांवर भरवसा करणे जुगार खेळण्यासारखे असते. ज्याची खात्री आहे त्यावरच विसंबून रहावे.

पत्नीशी कधीही अपमान जनक भाषा वापरू नये. पण तिचा गुलाम बनून राहू सुद्धा नये. असें सांगतात, ज्या बायका सात्त्विक असतात त्या पुजनीय असतात. त्यांत त्या घरची वैभव देवता वास करत असते. म्हणून त्यांचा विशेष मान राखला गेला पाहिजे. मातापित्यांची काळजी घेणे हे त्या सज्जनाचे कर्तव्य असते. आपल्या पशुंची त्याने तितक्याच आत्मियतेने काळजी घेतली पाहिजे जितकी तो स्वताची घेतो. शेती त्यांने स्वतः केली पाहिजे. वैश्याचे नोकर त्याच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांची देखभाल करतील. ब्राह्मणांकडील पाहुण्याची देखभेल त्याचे मुलगे घेतील. अग्नीचा उगम पाण्यात आहे. क्षत्रियांचा, ब्राह्मणांचा व लोखंडाचा उगम दगडातून होतो. त्यांची उर्जा सगळयांना भारी जाते. अग्नी लाकडात लपून बसलेला असतो.

उच्च कुलिन माणसे त्यांच्या मनातील गोष्टी उघडपणे सांगत नाहीत. ते कमी बोलतात. त्यांच्या गोष्टी कोणाला समजत नसल्या तरी त्याला इतरांच्या गोष्टी त्याच्या खबऱ्यांच्या मदतीने समजत असतात. शहाणा माणूस त्याच्या योजना दुसऱ्यांना सांगत नाही. पुण्य, हित आणि इच्छा ह्यांचा मेळ तो बरोबर घालतो त्याची भणकसुद्धा तो कोणाला लागू देत नाही. गोष्टींची गुप्तता राखण्यात तिचे महत्व असते. कोणतेही अवघड काम करण्या आधी तो त्याच्या खास सल्लागाराचे मत घेईल. ज्याचा स्वताच्या जिभेवर ताबा नाही व जो व्यसनी आहे त्याच्या बरोबर कोणतेही गुपीत बोलू नये. मंत्र्याची नेमणूक करतांना त्याची चांगली पडताळणी करावी. कारण, राजाचे अस्तित्व त्यांच्यावर अवलंबून असते. जो राजा मोठा होतो ज्याचे मंत्री त्याच्या खास गोष्टी सांभाळून ठेवतात. जो राजा अनवधानाने चुका करतो तो त्याचे परिणाम भोगतो. म्हणून राजाला कधीच बेसावध रहाता येत नाही. कौतुकास्पद कार्य करणे चांगले असते. ते न करण्याने राजाला पश्चात्ताप करावा लागतो. जसें अशिक्षित ब्राह्मणाने श्राद्ध घालू नये, ज्याने मुत्सद्देगिरीचे शिक्षण घेतलेले नाही त्याला शासकीय कामात घेऊ नये. ज्या राजाला राज्य कारभारातील चढ उतार ह्यांची कल्पना असते, ज्याला राज्य कारभाराचे शिक्षण झाले आहे, तो सगळया

पृथ्वीवर राज्य करू शकतो. जो त्याच्या सगळया कामांवर चांगले लक्ष देऊन असतो, ज्याचा खजिना त्याच्या हातात असतो, त्याला कोणी हरवू शकत नाही. राजाला त्याच्या प्रसिद्धीची व त्याच्या डोक्यावर धरलेल्या छत्रीचा अभिमान असला पाहिजे. परंतु, त्याच्या कार्यात सहभागी असलेल्यांना जो विसरतो त्याचा नाश नजिक आला असें समजावे. ज्या शत्रूचा नाश करणे पुण्याचे व हिताचे आहे त्याला कधीच माफी देऊ नये. कमजोर राजा त्याच्यापेक्षा बलवान राजाला शगण गेला तरी जसा तो बलवान होईल त्याने त्या माफी देणाऱ्या राजाला माफ करू नये. तसें न केल्यास त्याच्या कडून धोका संभवतो. राजा त्याच्या रागावर काबू ठेवेल. देवांशी, इतर राजांशी, ब्राह्मणांशी वृद्ध माणसांशी, लहान मुलांशी, गरीब लोकांशी वागताना. शहाणा फालतु मुद्द्यांवर वाद करणार नाही. त्यात जिंकणे अथवा हरणे निरर्थक असते. असे वागण्याऱ्या राजाची ख्याती सगळीकडे पसरते. ज्याला त्याचा क्रोध आवरता येतो तो सगळयांना आवडतो. सतत संतापणारा माणूस कोणालाही आवडत नाही. विशेषकरून बायकांना तसा माणूस अजिबात आवडत नाही. नामर्द बायकांना आवडत नाही. संपत्ती जमवण्यासाठी बुद्धीमत्ते पेक्षा धूर्तता आवश्यक असते, आळसामुळें संकट येऊ शकतात. सगळयांशी कपटीपणा करणाऱ्यांना केव्हातरी संकटांना सामोरे जावे लागते. दुसऱ्यांचा अपमान करणारे जेव्हां संकटात सापडतात त्यांना कोणी मदत करण्यास येत नाही. जो सदैव प्रामाणिकपणे वागतो तो सावकाशपणे वृद्धींगत होत जातो. त्याला मदत करण्यासाठी सगळे येतात. खरे मित्र, सल्लागार, प्रामाणिक नोकर, स्वताची बुद्धीमत्ता, शांतपणे काम करण्याची क्षमता, संयम, पुण्यप्रभाव, मधूवाचा, मित्रांना दुखवण्यासारखे न करणारा, अशा माणूस यशस्वी होतो. खोटी आश्वासन देणारा, कृतघ्न, निर्लज्ज अशा माणसावर अवलंबून राहू नकोस. जो दोषी आहे हे जाणतो त्याला झोप येत नाही कारण त्याचा आत्मा त्याला शांतता देत नाही. अपराधी मनाला शांती मिळत नाही. अहो धृतराष्ट्र, ज्याच्या क्रोधामुळें आपल्या अस्तित्वाला धोका होऊ शकतो त्याला देवा प्रमाणे जपावे.

जो बायकांवर, बेजबाबदार, जातीतून टाकलेला, लुच्चा अशांवर विसंबून रहातो तो कधीच यशस्वी होत नाही. ज्या कामाचा अनुभव आहे त्या कामासाठी त्याला लावावयाचे असते. एरवी ते काम बिघडू शकते. तू अरे राजा चांगल्या कार्यक्षम पांडवांना सोडून तुझ्या मुलांवर विसंबून आहेस कारण ती तुझी मुलं आहेत हे प्रशासनाच्या नियमा विरुद्ध आहे. अशा नियोजनामुळें तुझे राज्य तू येत्या युद्धात घालवणार आहेस.

अशारितीने प्रजागर पर्व भाग अडोतिसावा संपला.

# प्रजागर पर्व

## भाग एकोणचाळिसावा

धृतराष्ट्र विदूराला बोलतो, माणूस त्याच्या भाग्याचा चालक नसतो. त्याच्या सगळयां नाड्या विधात्याच्या हातात असतात. त्या विषयावर मला तुझ्याकडून ऐकावयाचे आहे. विदूर सांगू लागतो, मर्यादा सांभाळून न बोलल्याने बृहस्पतीला सुद्धा नाराजीचा सामना करावा लागला होता. तरी मी जे हितकारक आहे तेंच बोलणार आहे जरी तू माझ्यावर रागावलास तरी. कोणी भेटी दिल्याने राजी होतात, कोणी गोड बोलण्यामुळें, कोणी नशापाणी दिल्यामुळें. परंतु, जो स्वभावतः चांगला आहे, ते सगळयांना पसंत पडतो. जो द्वेष करतो तो त्याच्यावर कधीच विश्र्वास ठेवणार नाही. जो प्रेम करतो त्याला त्याचे सगळेच चांगले वाटत असते. तुला आठवते कां"? जेव्हां दुर्योधन जन्मला तेव्हां मी तुला सांगितले होते कीं, ह्याचा एकाचा त्याग कर म्हणजे इतर शंभर मुलं तुझी वाचतील. ज्या त्यागामुळें मोठे भाग्य प्राप्त होणार असते तो त्याग हितकारक असतो. त्या त्यागाला त्याग समजूच नये. वस्तुतः तो त्याग उत्तम त्याग समजला जातो. परंतु, जर तो हितकारक त्याग नाही केला तर यथावकाश खूप मोठा त्याग करावा लागतो. तुला त्याचा अनुभव लवकरच येणार आहे.

कांहीं त्यांच्या सद्गुणामुळें पुढे येतात, कांहीं त्यांच्या धनामुळें, धृतराष्ट्रा धनाने येणाऱ्यां पेक्षा गुणाने येणारे तू स्वीकारावेस असे मी तुला नेहमी सांगत आलो आहे.

धृतराष्ट्र ते ऐकल्यावर विदूराला सांगतो, अरे तू जे सांगतोस ते मला सगळे मान्य आहे पण, मी दुर्योधनाचा त्याग करू शकत नाही. मला माहीत आहे, कीं, जेथे चांगुलपणा, भूतदया आणि न्याय असतो तेंच अखेरीस विजयी होते.

विदूर त्याला बोलतो, खरा सात्त्विक मनुष्य इतरांचे सुक्ष्मसे दुःखसुद्धा नजर अंदाज करू शकत नाही. परंतु, जे तमोगुणी आहेत ते दुसऱ्याचे वाईट करण्याचीच भाषा करत असतात. त्यांच्या प्रत्येक कृत्यातून इतरांना फक्त पिडा अनुभवास येत असते.

जे भांडखोर आहेत, आधाशी आहेत, ज्यांचे कधी समाधान होत नाही, जे निर्लज्ज आहेत, फसवणूक करणारे, अशांना चांगुलपणा नसलेले असे समजले जाते त्यांच्याशी व्यवहार करणे टाळावे. त्यांची दोस्ती माणसाला संकटात टाकते. अशांशी कदाचित कामा पुरते संबंध ठेवावेत व काम झाल्यावर त्यांची दोस्ती सोडावी. कारण असें लोक तुम्हाला मदत करण्याचे सांगून तुमचे नांव खराब करत असतात.

जो गरीब असहाय लोकांना मदत कांहीं अपेक्षा न ठेवता करत असतो त्याच्यावर विधाता संतुष्ट होतो व त्याचे नंतरच्या जन्मात भले होते. ह्या जन्मात आपण नंतरच्या जन्माचे दैव लिहीत असतो. जे चांगले काम करतो व जे चांगले विचार मनात ठेवतो त्यामुळें पुढच्या जन्मात चांगले दैव प्राप्त होते. व जे वाईट करतो त्याचे त्या प्रमाणे वाईट दुर्भाग्यपूर्ण असें परिणाम तो भोगत असतो. म्हणून अरे राजा, जे तू आज भोगत आहेस त्याचे कारण तुझे गत जन्माचे कुकर्म आहे हे लक्षात ठेव. ह्या जन्मात कोणतेही कार्य, विचार करतांना त्याचे नंतरच्या जन्मात कोणते परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत त्याचे भान ठेवून जो ते सगळे करतो तो जन्माजन्मात सदैव सुखी रहातो. जो आपल्या वंशाचे संरक्षण करतो तो त्याच वंशात पुन्हा जन्म घेतो. आपल्या दुर्दैवी नातेवाईकांचे जो मदत करतो त्याला पुढच्या जन्मा सगळे मदत करण्यासाठी येतात व जो कसे करत नाही त्याला त्याच्या पुढच्या जन्मी कोणी मदत करत नाही. म्हणून तू तुझ्या दुर्भाग्यवश पुतण्यांना कांहीं गांव देऊन हा प्रश्न निकालात काढ म्हणजे, तुझ्या पुढच्या जन्मी तुझ्यावर असा प्रसंग येणार नाही ज्यातून आज पांडव जात आहेत. ह्यालाच यमाचा न्याय असें समजले

जाते. त्याशिवाय ह्या जन्मा तुझी किर्ती जगभर होईल. आपले नातेवाईक हे पुनः पुन्हा जन्मजन्मांतरी एकत्र येत असतात म्हणून त्यांना जपणे चांगले असते. मतभेद व मत्यैक्य ह्यांचा मेळ घालण्याचे ज्याला जमले तो त्याच्या व्यावहारिक जीवनात सुखी होतो. टाळी दोन हाताने वाजते, ह्या न्यायाने चांगुलपणा हा सुद्धा एकतर्फी असून चालत नाही, तोसुद्धा दोनही बाजूने असावा लागतो. जेव्हां ते जमते तेव्हां तेथे आनंद नांदतो. चांगुलपणामुळें माणूस अनेक दुर्दैवी प्रसंगातून वाचत असतो. ज्याच्यात तो नाही त्याला अनेक संकटांना सामोरी जावे लागते. अरे राजा, असें समजले जाते कीं, प्रजेच्या पापाचा भागिदार राजा असतो. तसेंच प्रजेच्या पुण्य कर्माचासुद्धा राजा भागिदार असतो. म्हणून राजाने प्रजेत पुण्यप्रभाव वाढेल असे केले पाहिजे. जर तू तसे केले नाहीस तर भविष्यात तुला तुझ्या मुलांच्या मृत्यूच्या अथवा पांडवांच्या मृत्यूच्या वार्ता ऐकाव्या लागतील. नैतिकतेचे हे नियम, जे भार्गवाने लिहीले, जो मोडतो तो त्याचे दुष्परिणाम भोगत रहातो. दुर्योधनाने पांडवांच्यावर अन्याय करण्याचा घाट घातला तर तो मोडून टाकण्याचे काम फक्त तू करू शकतोस कारण तूंच आता ह्या घराण्याचा ज्येष्ठ आहेस. जर तसे नाही झाले तर तू सुद्धा दुर्योधनाच्या पापात सामील झाला असें होईल. कोणतेही शहाणपणाचे निर्णय विशिष्ट संदर्भात पहावे लागतात. तसें न केल्यास अगदी शहाणा निर्णय सुद्धा चुकीचा ठरू शकतो. जे निर्णय त्या सहा परिस्थितीत घेतले जातात ते हानिकारक असू शकतात. त्या सहा परिस्थिती अशा, नशेच्या प्रभावत घेतलेला निर्णय, झोपेच्या प्रभावात, पुरेशी माहीती नसतांना घेतलेला, ऐकीव माहीतीवर आधारीत, तमोगुणी माणसाच्या सांगण्यावरून, अननुभवी मदतनीसाच्या सांगण्यावरून.

जो हे टाळतो त्याच्या यशाची खात्री देता येते. जुने अनुभवी आणि खरे हितचिंतक ह्यांच्या सल्ल्याने जो निर्णय घेतला जातो त्यामुळे यशाची खात्र सांगता येते.

समुद्रात टाकलेली गोष्ट कायमची हरवली असें समजतात. जे प्रवचन झोपलेल्या पुढे केले ते फुकट गेले असें समजतात, ज्याचा स्वतावर ताबा नाही अशाला दिलेले शहाणपण व्यर्थ गेले असें समजतात. जळून गेलेल्या राखेवर तुप घालून अग्नी पेटत नाही.

शहाणा माणूस शहाण्या माणसाबरोबरच मैत्री करतो. माणसाची पारख करण्याशिवाय जो त्याच्यावर विश्वास ठेवतो तो जुगार खेळत असतो असों समजावे, आणि जर त्याचे भाग्य असेल तर त्या जुगारात तो यशस्वी होऊ शकतो परंतु, राजाने असें जुगार खेळावयाचे नसतात. माणसाची पारख करण्यासाठी तो शहाणा माणूस त्याची ज्ञानेंद्रिये वापरतो. कोणी कोणीचे दैव चोरू शकत नाही. ते ज्याचे त्याच्याबरोबर चिकटलेले असते. दुर्योधन व त्याचे दोस्त पांडवांचे धन, राज्य, वैभव बळकावू शकले पण त्याचे भाग्य अजून त्यांच्या बरोबर आहे ते पुन्हा त्यांना त्यांचे गेलेले सगळे मिळवून देणार आहे त्या उलट दुर्योधनचे होणार आहे. सातत्याने जाणून बुजून केलेल्या कुकर्माचे परिणाम त्याची भविष्यात वाट पहात आहेत. ते त्याला जेव्हां प्राप्त होतील तेव्हां त्याला कोणी वाचवू शकणार नाही. दैवतांच्या स्मरणाने येणाऱ्या अनेक संकटांची तीव्रता कमी होते. रागावण्यापेक्षा किंव करणे जास्त हितकारक असते. कारण रागावण्याने ज्याच्यावर रागावला त्याला कांहीं फरक पडत नाही पण रागावणाऱ्याचे रक्त जळते व त्याचा घातक परिणाम त्याला भोगावा लागतो, आरोग्य बिघडण्यामुळें. माणसाची योग्यता (सात्त्विक, रजोगुणी, तमोगुणी) त्याच्या मनोरंजनाच्या गोष्टींवरून समजते. त्याची खाण्याची आवड, कपड्यांची आवड, वागणे ह्यावरून त्याची योग्यता समजते. त्याचे जन्म कुळ त्याची योग्यता दाखवते. मनोरंजन ज्ञानी माणसाला सुद्धा आवश्यक असते कारण ती त्याच्या देहाची गरज असते. आत्म्याने त्यात लक्ष घालावयाचे नसते. तो त्याच्या योगक्षेमाचा (देहाच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी जे कांहीं केले जाते ते सगळे) भाग असतो. जो पुण्यवंत आहे, ज्याच्या वागण्यात चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया आहे तो शंभर उच्च कुलीन पण गुणहीन माणसांपेक्षा

जास्त योग्य समजावा सल्लागार म्हणून. दुराभिमानी, मूर्ख, खुनशी, उनाड, भूतदया नसलेला अशा चांगुलपणा नसलेल्या माणसाशी दोस्ती करू नये.

उपकार न विसरणारा, पुण्यवंत, प्रामाणिक, दयाळू, श्रद्धावान असा मित्र असावा. भोगेंद्रीयांत जास्त रमणारा त्याची अध्यात्मिक उर्जा खर्च करत असतो, म्हणून तो यथावकाश त्याचे भाग्यसुद्धा घालवून बसतो. त्याला देव विसरतात.

अपयशाने खच्ची न होता व न कंटाळता जो सतत प्रयत्न करत रहातो त्याला पुरूष समजले जाते. अपयशाची कारणे अशी असतात, प्रयत्नाची कमी, त्यासाठी जे ज्ञान पाहिजे ते नसतांना त्यात जाणे, साधन सामुग्री नसणे, सहाय्यक नसणे, त्यासाठी जो अनुभव पाहिजे तो नसणे आणि दैव अनुकूल नसणे अशी सहा कारणे असतात. त्यासाठी योग्य नियोजनाची गरज असते, प्रयत्न वाढवणे, ज्ञान मिळवणे, साधनसामुग्री जमवणे, त्याकामात उपयोगी येतील असें दोस्त करणे, अनुभव वाढवणे असे कर्मयोगाचे उपाय आहेत. दैव अनुकूल नसल्यास दैव ज्याचे जोरदार आहे असा भागिदार मिळवणे असें दैवयोगाचे उपाय आहेत. कर्मयोगात सफल होण्यासाठी मधूर वाणी, समजूतदारपणा, प्रामाणिकपणा, संयम, चिकाटी, सावधानता, धैर्य, कष्ट करण्याची तयारी असें गुण अंगिकारावे लागतात. असें साध्य झाल्यास तो समृद्ध होतो. हताश न होता प्रयत्न करत रहाणे (चिकाटी) हा यशाचा एकमेव मार्ग आहे. देवांना सुद्धा त्याचा अवलंब करावा लागतो. कारण सृष्टीचे नियम सगळयांना सारखेच लागू असतात. मग तो माणूस असो अगर देव. क्षमाशिल स्वभाव माणसाचे अध्यात्मिक बळ वाढवतो त्यामुळें लोकपाल देवतां त्याला अनुकूल होतात. लोकपाल देवता अनुकूल झाल्याने दैव उजळते, त्यामुळें यशाची खात्री होते. सात्त्विक माणूस सत्पात्र नेहमीच क्षमाशिल असतो. मतलबी (रजोगुणी) सोयिस्कर पणे क्षमाशिलता दाखवतो, कमजोर नेहमीच सगळयांशी क्षमाशिल असतो.

ज्या प्रकारच्या सुख मिळवण्याने पाप होत नाही ते उत्तम सुख आहे. जे सुख शरीराच्या गरजाप्रमाणे आवश्यक असते ते हितकारक समजले जाते. त्या पेक्षा जास्त त्यात रमण्याने त्या प्रकारच्या सुखाचे व्यसन लागते. व्यसन कोणतेही अंती दुःख दायक असते म्हणून त्या पासून सावध असावे असें भार्गव सांगतात. ती सुखभोगाची मर्यादा समजावी. ज्याला दुःख करण्याचे व्यसन लागले तो सधी समृद्ध होत नाही.

माणसाने त्याच्या ध्येयासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे असें सांगितले आहे परंतु, त्यापासून फळप्राप्ती ताबडतोब झाली पाहिजे अशी त्याला अपेक्षा करता येत नाही कारण, त्याच्या कर्माचा हिशेब अनेक जन्माच्या कर्मविपाकाने बांधलेला असतो. त्याच्या त्या कर्माचे फळ कदाचित त्याला पुढच्या जन्मात मिळणार असेल. माणसाच्या कर्माच्या हिशोबाचे नियम असें सांगतात म्हणून आपण आपले कर्तव्य करत रहावे कारण त्याचे फळ त्याला केव्हातरी निश्चितपणे मिळते. विधात्याच्या कामात अन्याय कदापीही होत नाही.

माणसाच्या चांगल्या गुणाबद्दल गैरसमज रजोगुणी व तमोगुणी माणसे नेहमी करतात व त्याला कमजोर समजतात. त्यामुळें ते अंती पश्चात्ताप करतात जे तुझ्या कौरवांच्या नशिबी लिहीलेले आहे.

समृद्धीचा माणसाच्या त्या जन्मातील गुणांशी कांहीं संबंध नसतो कारण तो त्याच्या गेल्या जन्माचा प्रभाव असतो. आपले ह्या जन्मातील कार्य आपला पुढचा जन्म कसा असेल ते ठरवत असतात. माणसाच्या हातीवरील रेषा त्यानेच त्याच्या गेल्या जन्मा लिहीलेल्या असतात. म्हणून दुर्भाग्या बद्दल देवाला दोष देणारे मूर्ख असतात.

कांहीं माणसे दैवतांच्या मदतीने आपले भाग्य सुधारण्याचा प्रयत्न करतात व तो एक मार्ग आहे. परंतु, त्यासाठी त्या याचकाला देवता तिच्या अध्यात्मिक उर्जेचे कर्ज देत असते. त्यामुळें तेया याचकाला ते कर्ज त्या दैवताला

परत करावे लागत असते. त्यासाठी अशारितीने जो दैवतांकडून कर्ज काढतो तो ते फेडण्यासाठी ध्यान मार्गाचा अवलंब करील अथवा कर्मयोगांने (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया) ते कर्ज तो फेडतो. जर हे त्यांने केले नाही कर तो अधोगतीला जातो. पापमार्गाने कमावलेली संपत्ती त्याचा पुढील जन्म दुःखमय करते. ह्या जन्मात मजा करतो परंतु, पुढच्या जन्मात सतत संकटात बुडलेला असतो. वैराग्य संन्याशाचे बळस्थान असते. पापी माणसाचे बळ कुकर्मात असते, गुणी माणसाचे बळ त्याच्या क्षमाशिलतेत असते.

जे मिळवण्यासाठी चांगुलपणा सोडावा लागतो ते नाही मिळाले तरी हरकत नसते. कारण अशा गोष्टी अंती विनाशाकडेच नेतात.

अज्ञानी माणसाची दया करावी, ज्या संभोगाने पुत्र प्राप्त होत नाही त्याची कींव करावी. ज्या राज्यात अन्न नाही त्याची कींव करावी.

अहो राजन, पाप ठरणारी तुझी इच्छा तू सोडून दे, त्यातच तुझे व तुझ्या मुलांचे भले आहे. तुझ्या इच्छा तुला ह्या जन्मातसुद्धा पुरेसे सुख देऊ शकणार नाहीत. परंतु, त्या तुझा पुढचा जन्म संकटमय करणार आहेत. कारण त्या पापावर आधारित आहेत. पापावर आधारित इच्छा सर्वनाशाचे कारण असते हे लक्षात घे. तुझ्यासाठी कारण की, तू कुरु घराचा मुख्य आहेस, पांडव आणि कौरव एकसारखे असले पाहिजेत, दुर्दैवाने आज तसे नाही म्हणून त्या तुझ्या इच्छा पापमय आहेत.

अशारितीने प्रजागर पर्व भाग एकोणचाळिसावा संपला.

***टीपः*** *चांगुलपणा, माणूसकी, भूतदया ह्या संज्ञांच्या व्याख्या सनत्कुमार ऋषी मिथिलेचा राजा जनक ह्यांच्या संवादात आल्या आहेत त्या येथे देतो म्हणजे माणसांने कसे वागावे समाजात त्याचा उलगडा होईल.*

*कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात.*

*मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात.*

*सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात.*

*जीवोजीवस्य जीवनं ह्या वैश्विक नियमानुसार आपले खाद्य ठरवावे लागते. कारण मनुष्य जे खातो ते सजीव असावे लागते. वनस्पती असो अगर प्राणी असो, खाण्यासाठी ते तयार करतांना अहिंसक पद्धतीने ते तयार करावे लागते. प्राणी अहिंसक पद्धतीने मारणे शक्य असते कारण त्याला बेहोष करून मारता येते. परंतु, वनस्पती बेहोष करता येत नसल्याने ती खातांना हिंसा अनिवार्य असते. म्हणून शाकाहार हा तुलनेने जास्त हिंसक असतो म्हणून त्याचे प्रमाण कमी ठेवावे असें सनत्कुमार ऋषी मिथिलेचा राजा जनक ह्याला सांगतात. त्याकरतां मिथिलेत शाकाहार किमान करण्याचे मानले जात होते.*

## प्रजागर पर्व संपले

## भाग चाळिसावा

विदूर पुढे सांगतो धृतराष्ट्राला, आपल्या मर्यादांचे भान ठेवून जो चांगला माणूस निरभिमानीपणे व चांगल्या उद्देशाने त्याचे उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करतो तो खात्रीने त्याच्या कामात यशस्वी होतो. इतर चांगली माणसं त्याला साथ देण्यासाठी पुढे होतात. जो एकादे काम चांगुलपणाच्या विरुद्ध आहे म्हणून करण्याचे नाकारतो तो मनाची शांती मिळाल्यामुळें सुखात झोपू शकतो. चुकीच्या मार्गाने मिळालेला विजय, राजाची फसवणूक करून मिळालेले यश आणि गुरूशी खोटे बोलणे ह्या तीन गोष्टी ब्राह्मणाचा वध करण्या इतक्या वाईट असतात.

सतत द्वेष करणे, घमेंड आणि मृत्यू ह्यामुळें समृद्धीचा नाश होतो. गुरूकडे दुर्लक्ष करणे, घाई करणे आणि स्वताला फार शहाणे समजणे ह्या तीन गोष्टी करणार्याला ज्ञान कमावणे अवघड जाते. विद्यार्थ्यामध्ये जर हे दोष असतील तर तो अभ्यास योग्य प्रकारे करू शकत नाही. त्या अशा आळस, गुरू शिकवतांना दुर्लक्ष करणे, मनात गोंधळ असणे, अस्वस्थता, वेळ फुकट घालवणे गप्पा मारण्यात, उद्धटपणा हे ते दुर्गुण आहेत. तुला माहीत नसेल परंतु, तुझी मुलं अशांत आपला वेळ घालवत होती जेव्हां ते गुरूकुलात होते. ज्यांना ज्ञान पाहिजे त्यांनी सुखाचा त्याग केला पाहिजे व ज्यांना सुख पाहिजे ते ज्ञानाचा त्याग करतात. दोनही एकाचवेळी मिळत नाहीत. समुद्राला त्याला मिळणाऱ्या नद्यांचा त्रास होत नाही. यमाला मरणाऱ्या लोकांचा कंटाळा वाटत नाही.

अरें राजन, तीव्र इच्छा माणसाची धीरोदात्तता संपूष्टात आणते. रागामुळें प्रगती थांबते, वर्ण व्यवस्थेमुळें विकास खोळंबतो, कंजुषीमुळें नांव बदनाम होते. एक रागावलेला ब्राह्मण सगळे राज्य बरबाद करू शकतो.

अरे राजन, कोणत्याही मोहापोटी चांगुलपणाचा, माणूसकीचा त्याग करण्याने त्या माणसाची अध्यात्मिक उर्जा ऱ्हास पावते. चांगुलपणामुळें जे सुख मिळते त्या सारखे चिरंतन सुख दुसरे नाही. आपली अध्यात्मिक उर्जा वाढवणे हा माणसाच्या जीवनाचा मुख्य उद्देश असतो ह्याचा विसर ज्याला पडला तो पाप करण्यास उद्युक्त होतो. शहाणा माणूस त्याचा विसर पडू देत नाही. सुखांत सात्त्विक माणसाची सुख, रजोगुणी माणसाची सुख आणि तमोगुणीची सुख ह्यात मोठा भेद असतो. ज्या गोष्टी करण्याने तमोगुणीला सुख मिळते त्यामुळें सात्त्विकाला दुःख होऊ शकते. म्हणजे त्रिगुणाच्या सुखाच्या संकल्पना भिन्न असतात. कौरव तमोगुणी आहेत म्हणून त्यांच्या सुखाबद्दलच्या कल्पना आणि पांडव जे सत्वगुणी आहेत त्यांच्या ह्यात मोठा फरक आहे.

माणसाबरोबर त्याचे पुण्य व पापकृत्याचे परिणाम सदैव असतात. बाकीच्या गोष्टी जसे धन दौलत, जमीन जुमला, मालमत्ता, पशुधन, वैभव हे सगळे वास्तविक येथेच रहाते ज्याचा त्या मरून जाणाऱ्याला कांहींच उपयोग नसतो. म्हणून ते जे त्याच्या बरोबर मृत्यूनंतर रहाते ती त्याची खरी मिळकत असते. त्या मिळकतीला ऋषीनी विष्णूचे अर्धांग समजले व तिला नांव दिले लक्ष्मी. ती खरी मिळकत आहे, त्या माणसांनी कमावलेली अध्यात्मिक उर्जा, हे लक्षात घे. ज्यानी अध्यात्मिक उर्जा वाढवली तो प्रकाशाकडे जातो व ज्याने ती त्याच्या कुकर्मामुळें घालवली तो अंधारीकडे मृत्यूनंतर जातो. त्यासाठी अरे राजा माणसांनी पुण्यवंत रहावयाचे असते. तो जर मोहाच्या आहारी गेला व चुकीच्या गोष्टीत रमला तर त्याला अंधारात जावे लागेल.

धृतराष्ट्र विदूराला विचारतो, अरे बंधू मला सांग माणसाला पुन्हा पुन्हा जन्म का घ्यावा लागतो?

विदूर सांगतो, सात्त्विकतेच्या उच्च स्थराला पोहोचणे हा माणसाच्या जन्मामागीत उद्देश असतो हे तुला माहीत आहे. जोपर्यंत त्या उच्च अवस्थेला तो

पोह्योचत नाही तो वर त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. हे एकादी घसरणारी शिडी चढण्यासारखे आहे. घसरणे म्हणजे वासनांच्या आहारी जाण्यासारखे आहे. त्या सहा वासना (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) ह्या त्या शिडीवरील घसरगुंड्या आहेत. जो सावधपणें त्यांना टाळून ती शिडी चढला तो मुक्त झाला पुनर्जन्माच्या विळख्यातून असें समज.

ज्याने त्याचे भान सदैव सावध ठेवले, चांगल्या मित्रांच्या बरोबर राहीला, आपल्या अध्यात्मिक उर्जेचे भान ठेवले तो पुनर्जन्मा पासून मुक्त होतो. परंतु, जो लोक तसे न करता त्यांच्या वासनांत रमून रहातात त्यांना पुनर्जन्म टाळता येत नाही.

वासनामय जीवनाच्या क्षण भंगूरपणाचे ध्यान ठेवून जो त्यांबद्दल औदासिन्य त्याच्या मनात उत्पन्न करू शकला, तोंच ह्या पुनर्जन्माच्या विळख्यातून बाहेर पडू शकतो. वेदाच्या अभ्यासाने ते शक्य होते. खरा तो ज्याने त्याचे जीवनाचे लक्ष्य अध्यात्मिक उर्जा वाढवणे असें ठेवले व वास्तविक सुखं शरीराची आहेत असे मनाने पक्के केले तो त्याचा योगक्षेम उत्तम रित्या करून वास्तविक आणि अद्यात्मिक असें दोनही साध्य करू शकतो. तसे करणाऱ्याला राजयोगी असें समजले जाते. आणखीन एक सांगतो, पांडवांचा मुख्य युधिष्ठीर त्याचे क्षत्रिय वर्णाचे कार्य पाहिजे तसे करत नाही, तो स्वताला ब्राह्मण समजू लागला आहे जे अयोग्य आहे, तेव्हां तू त्याला त्याच्या क्षत्रिय कृत्याच्या जबाबदारीची आछवण करून दे.

धृतराष्ट्र विदूराला बोलतो, "अरे विदूरा, तू जे सांगतोस ते सगळे मला पूर्णपणे पटते परंतु, माझा मुलगा दुर्योधन आला कीं, मला काय होते ते समजत नाही व मी त्याच्या कलाने वागू लागतो. हे असें कां होते ते सांगशिल कां"?

पुढे तो अंधराजा बोलतो, "मला वाटते, जे दैवात लिहीले आहे ते आपल्या विवेकापेक्षा जास्त प्रबळ असल्यामुळें तसे होत असावे. कदाचित, माझ्या मुलांचा नाश पांडवांच्या हातून होणार असें विधात्याने लिहीले असेल तर ते प्राक्तन कोण टाळू शकतो"?

अशारितीने प्रजागर पर्व भाग चाळिसावा संपला.

# - उद्योग पर्व संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रंथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळया नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या

आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात

रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक

नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त

असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून

आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा.